# मॉडर्न ९५-९६



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

## मॉडर्न महाविद्यालय, पुणे ४११ ००५.

# मॉडर्न' नियतकालिक
# १९९५–९६

**— संपादक समिती —**

- **अध्यक्ष,**
  प्रभारी प्राचार्य पी. डी. आपटे

- **संपादिका**
  डॉ. कांचनगंगा गंधे

- **सदस्य**
  डॉ. माधवी मित्र
  प्रा. बी. जी. वाणी
  प्रा. लीना पाटणकर
  प्रा. व्ही. बी अल्हाट
  प्रा. सी. टी. प्रधान
  प्रा. सुजाता गायतोंडे

# From IV

Statement about ownership and other particulars about

**PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE AND COMMERECE PUNE - 411 005.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Pune |
| 2. | Peridicity of its Publication | : | Annual |
| 3. | Printer's name | : | R. G. Marathe<br>Surya Printers,<br>727, Sadashiv Peth, Pune 30. |
| 4. | Publisher's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Prin. P. D. Apte<br>Modern College of Arts, Commerce and Science, Pune - 5. Indian |
| 5. | Editor's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Off. Prin. P. D. Apte<br>Modern College of Arts, Commerce and Science, Pune - 5. Indian |
| 6. | Name and address of individuals, who own the paper and partners | : | Modern College of Arts, Commerce and Science, Pune - 5. Indian |
| | or shareholders holding more than one percent of the total capital | : | Not applicable |

I, P. D. Apte hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**Off. Prin. P. D. Apte**
Signature of Publisher

# संपादकीय

**फुले वेचिता बहरू कळियासी आला.....**

महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवातील कार्यक्रमांचा, विविध क्षेत्रांत साध्य केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण पराक्रमांचा बहर ओसरण्यापूर्वीच नव्या पराक्रमांचा बहर सुरू झाला. जून १९९५ मध्ये महाविद्यालयीन वर्ष सुरू झालं ते दुहेरी पराक्रमाच्या वार्तेनं. शास्त्र विभागातली गिरिजा देव बारावीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत ११ वी आली तर दिप्ती देशपांडे जीवशास्त्र विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवून पहिली आली. ह्या दोघींनी आणि महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी, विद्यार्थीनींनी 'ज्ञानाला विज्ञानाची जोड असेल तरच शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट गाठता येते' हे रा. ना. दांडेकरांनी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या सुरवातीला काढलेले उद्‌गार खरे करून दाखविले. कला आणि वाणिज्य क्षेत्रांतही विद्यार्थी, विद्यार्थिनींनी उच्च यश मिळवून शास्त्र विभागातील पराक्रमी विद्यार्थ्यांना उत्तम साथ दिली.

अर्थात् आपल्या विद्यार्थ्यांचे यश केवळ परीक्षांपुरतेच मर्यादित राहिले नाही तर इतर क्षेत्रांतही त्यांनी मिळविलेले यश निश्चितच स्पृहणीय आहे. या वर्षी विविध स्पर्धांत, उपक्रमांत त्यांनी भाग घेऊन अनेक बक्षिसे मिळविली आणि 'प्रागतिक दृष्टिकोन' (Progressive Outlook) आणि 'आधुनिकतेचा स्पर्श' (Modern Touch) हे आपले परवलीचे शब्द खरे करून दाखविले. आय.आय.टी., पवई, मुंबई येथल्या 'रसायनशास्त्र प्रश्नमंजूषेमध्ये' योगेश महाजन आणि मंदार सरदेशपांडेने प्रथम क्रमांक मिळवून पुणे हेच अजूनही 'विद्येचे माहेरघर' आहे हे सिद्ध केले. तर विशाल सिंग, विश्वासनिल साठे, रोहित चौधरी आणि सिजय प्रकाशॉन यांनी आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या 'सुवर्णमहोत्सव प्रश्नमंजूषेत' प्रथम क्रमांकाचा करंडक मिळवला. शास्त्र संघटनेने 'विज्ञान दिनानिमित्त केलेले प्रदर्शनही वाखाणण्यासारखे होते. आपल्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती आणि नवीन काहीतरी करून दाखविण्याची जिद्द आहे हेच ह्या प्रदर्शनामुळे प्रकर्षाने जाणवले. सुलभा मनोळी, रूपाली पंडीत, मनाली घारपुरे आणि इतरही विद्यार्थी, विद्यार्थिनींनी क्रीडा क्षेत्रात भरघोस यश मिळविले. महाविद्यालयाला यशाची कमान चढविणाऱ्या, स्वतःच्या व्यक्तिमत्वातही भर घालणाऱ्या आणि त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनींचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. ह्या त्यांच्या यशापाठीमागे महाविद्यालयातल्या प्राध्यापकांचे, तसेच कर्मचारी वर्गाचे मार्गदर्शन आणि सहकार्य असतेच हे वेगळे सांगायला नकोच.

**सैनिक हो तुमच्यासाठी .....**

अंगात दुर्दम्य जिद्द आणि आत्मविश्वास असेल तर आज साधा वाटणारा विद्यार्थी उद्या राष्ट्राचे संरक्षण करण्यासाठी अधिकारपदापर्यंत पोहोचेल. आपल्या महाविद्यालयातला स्वप्नील त्रिभुवन आज 'आर्मी ऑफिसर' म्हणून निवडला गेला आणि आज तो राष्ट्राच्या संरक्षणाचे पुढील धडे डेहराडून येथे घेत आहे. महेश फडतरे, सुमेध इनामदार, भूपेश ठाकूर यांनीही स्वप्नीलचा कित्ता गिरवायला सुरूवात केली आहे. प्रजासत्ताक दिनादिवशी उपराष्ट्रपतींना दिलेल्या गार्ड ऑफ ऑनरचा कमांडर होण्याचा मान आपल्या महाविद्यालयाच्या महेश फडतरेने पटकावला. प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय कॅम्पमध्ये महाराष्ट्र एन.सी.सी. डिरेक्टोरेटने प्रथम क्रमांक आणि 'प्राईम मिनिस्टर बॅनर' मिळविले. ह्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या सर्वोत्कृष्ट बहुमानात आपल्याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सिंहाचा वाटा होता. महाविद्यालयाबरोबर आपल्या महाराष्ट्राचीही मान ह्या छात्रांनी उंचावली. त्या सर्वांना मानवंदना !

**सामाजिक बांधिलकी .....**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपले विद्यार्थी सामाजिक बांधिलकी विसरले नाहीत. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत रक्तदान, राष्ट्रीय पल्स पोलिओचे महत्व पटवून देणं, त्या मोहिमेत स्वयंसेवक म्हणून काम करणं, पथनाट्याद्वारे दारूबंदी, एड्स किती घातक आहेत हे दाखवून देणं, एकजुटीने श्रमदान केलं तर गावाचा कायापालट होऊ शकतो अशा अनेक गोष्टींत स्वतः हिरीरीने भाग घेऊन सामाजिक बांधिलकीचीही आम्हाला जाणीव आहे हे दाखवून दिले.

नियतकालिकाचे काम हे सांघिक स्वरूपाचे आहे. त्यातली मुख्य जबाबदारी संपादन समिती उचलतच असते. नियतकालिकाचे अध्यक्ष या नात्याने प्राचार्य पी. डी. आपटे यांनी मोलाचे मागदर्शन केले. त्यांच्या सहानुभूतीपूर्ण पाठिंब्यामुळे संपादक समितीला आपले काम निर्वेधपणे पार पाडता आले. त्याशिवाय उपप्राचार्य, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वर्ग यांच्या सहकार्यामुळे हे काम पूर्णत्वाला नेता आले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

नियतकालिकासाठी विद्यार्थ्यांनी अनेक लेख, कविता, चुटके पाठवले होते. मराठी ही आपली मातृभाषा आहे म्हणून की काय यंदाच्या वर्षी मराठीतल्या लेखांचा आणि कवितांचा उच्चांकच गाठला गेला होता. त्यामानाने हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषातील साहित्य विद्यार्थ्यांकडून कमी आले. नियतकालिकाचा दर्जा कायम राखण्यासाठी निवडक लेख, कविता घेणेच योग्य होते. ठराविक विद्यार्थ्यांचेच लेख, कविता छापायचे असा त्यात बिलकुल मानस नाही. शक्यतो सर्वांना संधी मिळावी

याकडे संपादन समिती काटेकोरपणे लक्ष देत असते. साहित्याचा दर्जा चांगला असेल तर ते साहित्य नियतकालिकात छापले गेले असेलच. यासाठी प्रा. लीना पाटणकर, प्रा. प्रधान, प्रा. वाणी आणि प्रा. डोईफोडे यांनी अनेक निकष लावले आणि लेखांची निवड केली. डॉ. माधवी मित्र, प्रा. सुजाता गायतोंडे, प्रा. आल्हाट यांनीही या कामात मोलाची मदत केली. ह्या सर्वांचे औपचारिकपणे आभार मानणे हे त्यांना आवडणार नाही परंतु तरीही ते माझे वैयक्तिक कर्तव्यच आहे असे वाटते. प्रा. प्रधान यांनी प्रुफे तपासण्याच्या जिकीरीच्या कामात खूपच हातभार लावल्याने संपादनाचे काम खूपच हलके झाले.

यंदाच्या वर्षीच्या सुरवातीलाच प्रा. सीताराम रायकर, प्रा. पद्माकर चिरपुटकर आणि डॉ. मुकुंद महाजन हे तीन प्राध्यापक सेवानिवृत्त झाले. नियतकालिकाचे काम करताना या तिघांचे नेहमीच सहकार्य लाभत असे. आणि त्यामुळे यावर्षी त्यांची उणीव आम्हाला प्रकर्षाने भासली हे येथे नमूद केलेच पाहिजे.

नियतकालिक मुखपृष्ठाचे रेखाटन आणि आतील चित्रे डॉ. रवींद्र गंधे यांनी काढलेली आहेत. आतील 'ग्रुप फोटो' श्री. दाते यांनी अचूकपणे टिपले आहेत. या अंकाचे मुद्रण सुबकपणे करून दिल्याबद्दल सूर्य प्रिंटर्सचे श्री. राजेंद्र मराठे यांचेही संपादक मंडळ आभारी आहे. कागदाचे भाव वाढूनही आपल्या 'बजेट' मध्ये काम करून देण्याचे त्यांनी कबूल केले आणि ते करूनही दाखविले या गोष्टीचा विशेष उल्लेख केला पाहिजे. काही महाविद्यालयीन आणि तांत्रिक अडचणींमुळे हा अंक प्रकाशित होण्यास थोडा विलंब होत आहे त्याबद्दल संपादक समिती दिलगीर आहे. हे नियतकालिक अधिकाधिक निर्दोष व्हावे म्हणून नियतकालिक समितीने प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. तरीसुद्धा काही त्रुटी, उणीवा राहिल्या असण्याची शक्यता आहेच. ह्या त्रुटींबद्दल उदार दृष्टिकोण ठेवून आपण या अंकाचे कौतुकाने स्वागत कराल असा आम्हाला विश्वास वाटतो.

महाविद्यालयात ज्ञानार्जनाचे काम केले जाते. आणि म्हणूनच हे संपादकीय संपवताना ज्ञानाची देवता सरस्वतीचे स्मरण करणे उचित ठरेल. पु. ल. देशपांडे 'ती फुलराणी' मध्ये सरस्वतीचे गीत लिहिताना म्हणतात.

'आत्मवेलिच्या स्फूर्तिफुलावर वसंत जे विकसती ।
बुद्धिचे वसंत जे विकसती
त्याच वसंता तदिय विकासा सरस्वती बोलती ।।'

— **डॉ. कांचनगंगा गंधे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| उमलत्या कळयांनो | प्रा. सुरेश मेहता | १ |
| उशिरा येण्याचे कारण (विनोद) | अनिता वैरागर | ३ |
| निरोप शाळेला — निरोप बाल्याला | सुजाता पवार | ४ |
| करे स्वर्ग सा यह संसार (कविता) | अखिला चमनशेख | ५ |
| निरोप शाळेला — निरोप बाल्याला | शितल गांधी | ६ |
| विनोद | रेणुका देवरमनी | ७ |
| पालकांकडून आमच्या अपेक्षा | सारिका दलाल | ८ |
| हुंडा (कविता) | सुनंदा कोतवाल | ९ |
| भेदभाव विधात्याचा (कविता) | सुनंदा कोतवाल | ९ |
| आजचे कॉलेज जीवन | अजय आडसुळ | १० |
| मैत्री | नीता जोगळेकर | ११ |
| चटई आयुष्याची (कविता) | विद्या झाडे | १२ |
| मैत्री | अर्चना वर्पे | १३ |
| मोका (विनोद) | मिनाक्षी माने | १३ |
| जीवनात गप्पांचे स्थान | अजय आडसुळ | १४ |
| संस्कृती | जबिना चमनशेख | १५ |
| चला माझ्या बरोबर (विनोद) | अनिता वैरागर | १५ |
| संस्कृती लोकगीतांची : भोंडला व भुलाबाई | चैत्राली माने | १६ |
| ज्ञानेश्वरी : एक अमृतकलश | नंदकिशोर लोंढे | १८ |
| तो माझा (कविता) | कांचन लोणकर | १९ |
| 'स्वर्ग—दारा' तील तारा : 'कुसुमाग्रज' | मनस्विनी प्रभुणे | २० |
| सी. डी. : एक असामान्य | निवेदिता देशमुख | २२ |
| भांडण (विनोद) | मिनाक्षी माने | २३ |
| जीवन आणि माणूस | अजित गाढवे | २४ |
| आजाराचे औषध (विनोद) | अनिता वैरागर | २५ |

| | | |
|---|---|---|
| मानवाचे भवितव्य एक मुक्तचिंतन | वैशाली जाधव | २६ |
| देवमाणूस | राहूल बोरकर | २७ |
| आसवांनो तुम्ही (कविता) | सुनंदा कोतवाल | २८ |
| एक अविस्मरणीय घटना | लीना घोडेकर | २९ |
| पर्व 'नाटयपर्वा' तील | मनस्विनी प्रभुणे | ३१ |
| जगणे कठीण होत आहे | अनघा बापट | ३३ |
| समाजातील वाढती गुन्हेगारी, कारणे व उपाय | सोपान गाडे | ३४ |
| विवाह पद्धती विषयी माझे विचार | शितल कुलकर्णी | ३७ |
| आन्तरजातीय विवाह : राष्ट्रीय एकात्मता | स्वाती आमोदे | ४० |
| भ्रमण (कविता) | बिपीन इनामदार | ४१ |
| वैदिक गणित—गणितच नव्हे तर एक नवा विचारही | आदित्य खेर, सचिन जाजू | ४२ |
| ते थडगं (कविता) | ललितगौरी बुवा | ४३ |
| विज्ञान युग की अंधार युग ? | निवेदिता देशमुख | ४४ |
| विशुध्दी पर्यावरण—आजची गरज | शितल कुलकर्णी | ४६ |
| इंधन बचत समस्या व उपाय | अजय आडसुळ | ४९ |
| जीवन म्हणजे काय ? (कविता) | ललितागौरी बुवा | ५० |
| एड्स : एक जीवघेणा रोग ! | अनिल पवार | ५१ |
| ऑटोमॅटिक (विनोद) | मिनाक्षी माने | ५२ |
| काटकसर (विनोद) | मिनाक्षी माने | ५२ |
| क्रिकेटमधील नवलाई | विशाल पाटील | ५३ |
| अगदी जरासंच दुखेल हं ....... | प्रा. राजीव कुलकर्णी | ५४ |
| पालवी | तुषार करमाळकर | ५६ |
| नाटय प्रशिक्षण शिबीर | महेश शिंदीकर | ५७ |
| राष्ट्रीय सेवा योजना—जिल्हा—स्तरीयशिबीर | राजेश अग्रवाल | ५९ |

| | | |
|---|---|---|
| ४.२.९६ रोजी संपन्न झालेले जाणीव–जागृती शिबीर | संजय पाटील | ६० |
| तो फिर जिये क्यों ?(कविता) | मिनाक्षी माने | ६५ |
| कली (कविता) | शुभांगी शिंदे | ६५ |
| मेरी दुनिया (कविता) | रमाकांत मांढरे | ६५ |
| हमें जहर दीजिए (कविता) | सोमनाथ कांबळे | ६६ |
| गमों का ताज (कविता) | सोमनाथ कांबळे | ६६ |
| दिल (कविता) | अनिल पवार | ६६ |
| उसी तरह (कविता) | जबिना चमनशेख | ६७ |
| आ देख (कविता) | हरप्रित चौधरी | ६७ |
| आपके लिए .......... ! (कविता) | अनिल पवार | ६७ |
| Fullerenes | Yogesh Mahajan | 68 |
| Pulsars | Vishwashil Sathe | 73 |
| Black Holes | Anuja Mulay | 78 |
| Searching for Life in Space | Siddharth Joshi | 79 |
| The Expanding Universe | Vinay Kakade | 81 |
| Diary-A multifaceted Book ! | Kalyani Sastry | 83 |
| Sacrifice | Sanjay Patil | 84 |
| Memories of an Outstanding Student | V.S.Sathe | 86 |
| Women in Politics | Smruti Shah | 88 |
| संस्कृतेन वदत न केवलं संस्कृत विषय | वासन्ती भागवत | ८९ |
| मोरपीस (कविता) | राहुल रासकर | ९० |
| रम्य गोवानगरं तत्र च रम्या संस्कृतभाषा! | कांचन देशपांडे | ९१ |
| गरम पाणी मिळाले नाही तर.........(विनोद) | अनिता वैरागर | ९२ |
| सूर्य की चंद्र (विनोद) | अनिता वैरागर | ९२ |
| अहवाल | | ९३ |

## पदाधिकारी



प्रा. पद्माकर आपटे
प्रभारी प्राचार्य



प्रा. गीताराम गायकवाड
उप—कार्यवाह प्रो.ए.सो.

## विशेष उल्लेखनीय यशाचे मानकरी



**गिरिजा देव**
१२वी बोर्डात गुणवत्ता यादीत



**JUO महेश फडतरे**
उपराष्ट्रपतींना सलामी



**स्वप्नील त्रिभुवन**
आय.एम.ए.डेहराडून निवड



**योगेश महाजन**
केमक्विझ — आय.आय.टी.
पवई. फर्स्ट रँक



**मंदार सरदेशपांडे**
केमक्विझ — आय.आय.टी.
पवई फर्स्ट रँक



**महेश शिंदीकर**
कलामंडळ शिष्यवृत्ती



राष्ट्रीय सेवा योजना



**कला मंडळ**



वादविवाद मंडळ



राष्ट्रीय छात्र सेना



जिमखाना



**कुंदन तांबट**

'मॉडर्न श्री'



**पंकज देव**
जिम्नॅस्ट — तृतीय क्रमांक



**विशाल धूत**
नेटबॉल — महाराष्ट्र संघ



**मिलींद गुळवणी**
'गोलकीपर' — आंतरविद्यापीठ हॉकी



**ऋषिकेष मद्रासी**
आंतरविद्यापीठ कबड्डी
विजेता कर्णधार



**पुष्कर कुलकर्णी**
रोलर स्केटींग स्पर्धा
उपविजेता



**भुषित रेगे**
नेटबॉल — महाराष्ट्र संघ
निवड



**सुलभा मनोळी**
आंतर जिल्हा मैदानी स्पर्धा
तृतीय क्रमांक



**रुपालीं पंडीत**
आंतर जिल्हा मैदानी स्पर्धा
तृतीय क्रमांक



**सरिता गोतारणे**
कबड्डी संघात सहभाग

# राष्ट्रीय सेवा योजना
# विविध शिबीरांमध्ये निवड झालेले विद्यार्थी



योगीता पिसाळ



शैलजा आरळकर



सुवर्णा सुकाळे



राजेश अग्रवाल



रमेश पाटील



नंदकिशोर लोंढे



अनिल पवार



अदिनाथ भवारी

# राष्ट्रीय छात्र सेना



**सपना भंटार**
एन.आय.सी.कँप उदयपूर



**योगेश नाडकर्णी**
एन.डी.कँप पूर्ण



**सतिश तिरवे**
एअर ॲटचमेंट कँप निवड



**दिनेश तशिलदार**
BUO of 36 MAH
BN



**राहूल मुंगीकर**
BLC कँप नकाशावाचन
नेतृत्व



**सागर पेटकर**
बेसिक माऊंटेनिअरिंग
कोर्स पूर्ण

# उमलत्या कळ्यांनो !

प्रा. सुरेश मेहता

तुमच्या जीवनवेलीवर यौवनाची कळी नुकतीच उमलू लागली आहे. ही कळी पूर्णपणे उमलून त्यातून एक प्रसन्न, पूर्ण विकसित, दुसऱ्यांना सुगंध देणारे फूल तुमच्या जीवनवेलीवर उमलावे म्हणून हा एक गोष्टीरूप छोटा पंक्तिप्रपंच. आणि तुमच्या मार्गक्रमणासाठी आमच्या अत्यंत हार्दिक, अनौपचारिक, मनःपूर्वक शुभेच्छादेखील.

एक सद्गृहस्थ दीर्घकालीन दौऱ्यावर होते. त्यामुळे त्यांची कुटुंबाशी नियमित भेट होत नसे. त्यांच्या मुलाने त्यांना खालीलप्रमाणे एक पत्र लिहिले.

"प्रिय बाबा, तुम्ही गावाला गेलेले खूप दिवस झाले. घरात सगळे मजेत आहेत. काल आई, मी, ताई प्राणिसंग्रहालयात गेलो होतो. तिथे एक माकड पाहिले. तुमची एकदम आठवण झाली. परवा शेजारच्या बंडूचा निकाल लागला. तो नापास झाला. आईने देवाला पेढे वाहिले."

पत्र वाचून बाबांना वाईट वाटले बाकींच्यांची मात्र करमणूक झाली. विचारांची गफलत, गलत केली की हास्यास्पद प्रसंग कसे उद्‌भवतात याचा हे पत्र अस्सल नमुना आहे. मतितार्थ असा की जीवनात वाटचाल करताना नुसता विचार करून चालत नाही, तर ते विचार सुसंगत आणि सुस्पष्ट असावे लागतात.

अटलबिहारी वाजपेयींनी सांगितलेला किस्सा. ते नवोदित राजकीय कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होते. भ्रष्टाचाराच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणाले, "खाओ मत. रुको." भाषेतील विरामचिन्हांचे महत्त्व न जाणणाऱ्या एका कार्यकर्त्याने हा संदेश खालीलप्रमाणे लिहून घेतला. "खाओ मत रुको." केवळ पूर्ण विरामाची जागा बदलल्यामुळे होणारा संदेशातील अनर्थ आपण समजू शकालच. हाच प्रकार काना, मात्रा, वेलांटी, उकार ह्यांबाबतही होऊ शकतो. शिला, शीला ह्या शब्दांमधील फरक भाषेचा जाणकारच समजू शकतो. तात्पर्य असे की, तुमचे विचार नुसते स्वयंस्पष्ट असून चालणार नाहीत तर ते तुम्हाला अर्थाचा अनर्थ न करता परिणामकारकरीत्या योग्य भाषेत लिहिता व मांडता आले पाहिजेत. यासाठी भाषा आणि भाषेचे व्याकरण ह्यांची चांगली ओळख तुम्ही घेतली पाहिजे.

विचारशक्ती प्रगट होण्यासाठी चांगल्या दर्जाचे वाचन करणे अत्यंत आवश्यक असते. सततचे वाचन आणि केलेले चिंतन, मनन आपल्या जीवनावर एक नवा प्रकाश टाकतात. स्वामी विवेकानंदासारखी आपणास सुपरिचित वंदनीय असणारी प्रगल्भ व्यक्तिमत्त्वे सततच्या चिंतनातून प्रभावी वक्ते म्हणून साऱ्या जगाच्या रंगभूमीवर चिरकालीन स्मृती ठेवूनच कालवश झालेली आहेत. स्पष्ट विचार आणि सोपी पण परिणामकारक भाषा आपल्याला आत्मविश्वास प्राप्त करून देतात. जीवनात येणाऱ्या अनेक संकटांशी सामना करण्यास हा आत्मविश्वास तुमच्या उपयोगी पडेल.

मला माझ्या अनुपस्थितीत जेव्हा वैयक्तिक, सामाजिक अगर व्यावसायिक कामासाठी कोणाचा दूरध्वनी येतो, तेव्हा त्याची नोंद ठेवण्याची व्यवस्था मी केलेली आहे. मी आल्यानंतर सर्व संबंधितांना त्यांच्याकडे

दूरध्वनि असेल तर उलट दूरध्वनी करण्याचा माझा प्रयत्न असतो. नेहमी संबंधात येणाऱ्या अनेकांच्या जन्म—दिनांकाची मी नोंद केलेली असून त्या दिवशी शक्यतो सकाळीच मी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्याचा प्रयत्न करतो. मला कोणी काही मदत केली तर अनौपचारिकपणे योग्य वेळी त्याचे आभार मानण्याची संधी मी घेतो. जगात वागण्याचा या अत्यंत साध्या पद्धतीतून स्वतःच्या अस्मितेला धक्का न लावताही मला आज अनेक चांगले मित्र, सहकारी आणि मार्गदर्शक लाभलेले आहेत. ही एक माझ्या जीवनातील जमेची फार मोठी आणि महत्त्वाची बाजू आहे. मुद्दा असा की खास वेळ, शक्ती आणि पैसा खर्च न करताही वागण्याच्या साध्या पद्धतीतून तुम्ही तुमचा जनसंपर्क प्रभावीपणे वाढवू शकता. आजच्या काळाची फार मोठी व्यावहारिक आणि वैयक्तिक गरज आहे. ती तुमच्या आयुष्यातील केव्हाही वापरता येण्याजोगी मर्मबंधातील ठेव आहे. MAN IS A SOCIAL ANIMAL हे आपण विसरू शकत नाही.

माझ्याकडे येणारा एक पक्षकार, सभ्य माणसाकडून अपेक्षित असणाऱ्या शिष्टाचारांचे खूप पालन करतो. त्याला भेटण्यासाठी बोलविलेल्या वेळे अगोदर दोन–चार मिनिटे तो आलेला असतो. वेळेचे महत्त्व तो जाणतो. "TIME IS MONEY" हे तत्त्व नुसते पुस्तकाच्या पानातून तो वाचत नाही, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्यावहारिक जीवनात करतो. काही कारणाने त्याला वेळेवर येणे जमणार नसेल तर तसा निरोपही अगोदर देतो. येताना साधे परंतु स्वच्छ आणि आकर्षक कपडे घालून येतो. केबिनमध्ये किंवा घरात शिरण्याआधी शिष्टाचार म्हणून दरवाजावर आगमनसूचक टक् टक् आवाज करून आत येण्याची परवानगी मागतो. (टक टक केलेल्या आवाजाने आतला मी पण सावध होतो) वरिष्ठांशी बोलताना अदबीने उभे राहूनच बोलतो. डोळ्यावरून गॉगल काढूनच चर्चा करतो. मनाचा तोल जाऊ न देता गंभीर प्रसंगीसुद्धा संयमाने वागतो. जनसंपर्काच्या तंत्रामध्ये सुचविल्याप्रमाणे त्या परिच्छेदातील काहीही खास श्रम न घेता, सुसंस्कृतपणाचे (नुसत्या सुशिक्षितपणाचे नव्हे) सर्व शिष्टाचार तो पाळत असल्यामुळे सर्वांना हवासा वाटतो. मलाही कधी ह्या गोष्टी अवघड, असह्य वाटल्या नाहीत. सवयीने त्या तुमच्याही जीवनाचा अतूट भाग होऊ शकतात.

अंगराज कर्ण महाभारतात दातृत्वाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून प्रसिद्ध असला, तरी त्याच्या दातृत्वापेक्षा मला त्याची मित्रनिष्ठा अधिक महत्त्वाची वाटते. कुरूक्षेत्रातील महायुद्धाच्या वेळी सहोदर पांडवांशी युद्ध न करण्याची त्याला केलेली विनंती मग ती जन्मदात्या मातेने—कुंतीने केलेली असो, श्रद्धेय कृष्णाने केलेली असो की पितामह भीष्मांनी केलेली असो. दुर्योधनाच्या मित्रनिष्ठेपोटी आणि दिलला शब्द पाळण्याच्या त्याच्या शिस्तीपोटी, युद्धाचा परिणाम ज्ञात असूनही त्याने ती विनंती मानली नाही. रचनात्मक अर्थाने तुम्ही तुमच्या कर्तव्यावर अशीच निष्ठा ठेवावी ही अपेक्षा. व्यावहारिक जगात हीच कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणा तुमच्या यशाचे बिजारोपण करतील.

एका राजाकडे दोन वेगवेगळे ज्योतिषी गेले. दोघेही भविष्यशास्त्रात पारंगत होते. राजा अल्पायुषी होता. हे त्या दोघांनीही, राजाची जन्मपत्रिका पाहिल्यावर ताडले. पहिल्या ज्योतिषाने सांगितले की, "तुमचा अंतकाळ आता अगदी जवळ आला आहे." हे ऐकताच राजाने ताबडतोब त्याची खासगी अंधारकोठडीत रवानगी केली. दुसरा ज्योतिषी ज्ञानी तसा व्यवहारीही होता. त्याने सत्य सांगताना राजाला सांगितले, "महाराज, लवकरच तुमच्या राजकुमारास राजयोग आहे." राजाने त्याचा यथोचित

सन्मान केला. सारांश असा की, जगात खरे तर बोलावेच (कारण काय खोटे बोललो होतो, हे लक्षात ठेवावे लागत नाही हा त्याचा मोठा फायदा आहे) पण त्याचबरोबर "सत्यं ब्रूयात, प्रियं ब्रूयात" हे व्यावहारिक तत्त्व लक्षात ठेवावे.

आता लवकरच तुम्ही तुमच्या व्यावसायिक जगात प्रवेश कराल. आजपर्यंत अनेक वेळा तुम्ही सामाजिक बांधिलकी, सामाजिक जबाबदारी ह्यासारखे शब्द पुन्हा पुन्हा ऐकले असतील. अर्थात् त्यांच्या अमर्याद आणि अनाठायी वापरामुळे आता ते शब्द झिजून त्यांचे परिणामकारक मूल्यच नाहीसे झाले आहे, हे सांगायला नको. ते काहीही असो, तुमच्या आजपर्यंतच्या वाटचालीत आणि जडणघडणीत तुमच्या आई-वडिलांच्या महत्त्वाच्या सहभागाबरोबर सारा समाज आणि आपला देश ह्यांचाही वाटा खारीचा असला तरीही श्रीकृष्ण तुलेतील रुक्मिणीचा तुळशीपत्राइतकाच महत्त्वाचा आहे आणि म्हणून हे सामाजिक ऋण फेडण्याची जबाबदारी तुम्ही आता उचलावयाची आहे. किमान वर्षातून दोनदा नाहीतर आपल्या वाढदिवसाला तरी न चुकता केलेले रक्तदान एका गरजूला जीवनदानच देते. नाहीतर त्यातून (खोल विचार केल्यास) आपण धर्म, जात, वंश ह्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय एकात्मताही साधत असतो. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी वाढदिवसाला एक झाड लावून आपण ते वाढवू शकतो. कचरा फक्त डब्यातच टाकून सारा परिसर स्वच्छ राखू शकतो. काही अपेक्षा शासनाकडून हक्क म्हणून करताना आपण जबाबदार नागरिक म्हणून आपली जबाबदारीही पार पाडू शकतो. अशा तऱ्हेने निरपेक्ष भावनेने, प्रसिद्धी पराङ्मुख वृत्तीने केलेली ही मातृऋणाची फेड तुमच्या अंतःकरणात कर्तव्यपूर्तीच्या समाधानाचा नंदादीप सतत तेवत ठेवेल, ह्याची मला पूर्ण खात्री आहे. प्रयत्न करा, यश आपलेच आहे आणि शेवटी कोणतेच सत्कृत्य करता आले नाही तर राष्ट्रसेवा म्हणून विध्वंसक कृत्य तरी करू नका.

महाभारतातील उदार कर्णाबरोबर योगेश्वर श्रीकृष्णही माझ्या मनावर खास ठसा उमटवून गेला आहे. पार्थ आणि श्रीकृष्णाच्या भेटीत श्रीकृष्णाने अर्जुनाला विश्वरूप दर्शन घडविले. जगात चालणाऱ्या मारामाऱ्या, युद्धे, दगाबाजी, दंगे यांचा परिचय करून दिला. एवढं सारं पाहून गोंधळलेल्या अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारलं, " मग सारे जग चालते तरी कसे ? " त्यावर अर्जुनाला मिळालेलं उत्तर अत्यंत समर्पक होते. श्रीकृष्ण म्हणतात, "ह्या जगात चार सद्विचारी, प्रामाणिक आणि सद्गुणी लोक असे असतात की, ज्यांच्या खांद्यावर जग तरते, 'तुम्हीही ह्या चार लोकांपैकी व्हायचा प्रयत्न करा.

व्यावहारिक जगात प्रवेश करताना अजून अनेक गोष्टी तुम्हाला शिकावयाच्या आहेत. आगामी मार्गक्रमणात येणाऱ्या अमूल्य अनुभवातून तुम्ही त्या शिकालही, फक्त तुमची वाटचाल सुलभतेने चालू व्हावी म्हणून हे काही महत्त्वाचे संकेत. शुभस्ते पंथानः।

❑

## उशिरा येण्याचे कारण

( दोन विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास उशीर झाला)

शिक्षक : राजू, तूला शाळेत येण्यास उशीर का झाला ?

राजू : सर, माझे पैसे हरविले होते. ते शोधत होतो.

शिक्षक : रमेश, तूला का उशीर झाला ?

रमेश : सर, मी त्याच्या पैशावर पाय ठेवून उभा होतो.

**अनिता वैरागर**

प्रथम वर्ष कला

# निरोप शाळेला–निरोप बाल्याला

**सुजाता पवार**
बारावी, शास्त्र

महाविद्यालयातील पहिले वर्ष अगदी अनोळखीपणाने संपले. शालेय जीवनापेक्षा नक्कीच ते वेगळे होते. यात अनेकदा शालेय जीवनातील आठवणी डोकावून गेल्या आणि आठवण झालीती शाळेला दिलेल्या निरोपाची ! शााळेचा निरोप नव्हता घेतला. शाळेतून 'रोप' घेतलेहोते.माझ्या व्यक्तिमत्वाचं ! छोटया कुंडीतून—मोठ्या जमिनीत लावण्यासाठी ! पण माझे बालपण मात्र त्या छोटया कुंडीनेच ठेऊन घेतल त्यामुळे निरोप दिला तो खरा बाल्याला .

'शाळा' माणसाला बरेच काही शिकवणारा गुरु! 'फूलपाखराच्या अंडयातून आळीची उत्पत्ती होते. ती स्वतःला कोषात गुरफटून घेते. पुन्हा बाहेर येण्यासाठी! निसर्गाची सुंदर कलाकृती फूलपाखराला जन्म देण्यासाठी ?........... पण या आळीने कोषातच गुरफटून राहायचे म्हटले तर, आळस केला तर—फुलपाखरु तयार होईल ?

तशीच अवस्था होते प्रयत्नांची कास सोडलेल्यांची ! आळसाचा कोष भेदून जर ते बाहेर पडले नाहीत तर त्याच्या उज्वल भवितव्याचे फुलपाखरू बागडू शकणर नाही. मुक्त विहार करु शकणार नाही, उज्वल भवितव्याच्या पूर्ततेसाठी लागतात प्रयत्न, जिद्द आणि चिकाटी आणि ते करण्याची चिकाटी दिली ती माझ्या शाळेनेच !

बालपण म्हणजे जीवनातील सकाळ, जीवनातील वसंत ऋतू साऱ्या जीवनाला जो प्रसन्न प्रफुल्लीत बनवतो.या वसंत ऋतूत प्रत्येक कळीला फुलायचा मोह होतोच! माझ्या जीवनाची कळीही अशीच जन्मली, उमलली आणि तिला सर्वात जास्त सहवास लाभला तो शाळेच्या आनंदापुरातच!

खरोखरच तिथे आनंदाचा पूर वाहत होता.

शाळेतील सखे सोबती आठवणींना अजून झोंबती ! रोज सकाळी आम्ही सर्व जण हातात हात घालून शाळेत जायचो. शिस्तीने थोडीशी चुणूक दाखवायला सुरुवात केली. कविता पठणाचे घोष, संस्कृत शब्दांचे पठण, पाढयांची आवर्तने ............ आठवते, रोजची राष्ट्रगीताची व शारदेची प्रार्थना, जणू अपवित्रं पवित्रं भवेत् ।' 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणतच संस्कारचे पाठ सुरु व्हायचे. आठवताना शिक्षकांचा प्रेमळ हात पाठीवरुन आजही फिरतोय असंच वाटतं. आणि आजही पटतय की, —

`Discipline must be based on love, must be controlled by love.'

वर्गात बाई नसताना हळूच मैत्रिणींच्या खोड्या काढणे, ऑफ तासांना गोष्टी सांगणे, ऐतिहासिक गोष्टी सांगताना हातात पट्ट्या धरुन तलवार असल्याप्रमाणे अनेक मोठमोठे पानिपत लढलो कधी कधी मोठ्या शत्रू पक्षाकडून म्हणजे हेडमास्तरांकडून मारही खावा लागला. त्यात मी पहिल्या नंबरचे सर्टिफिकेट दाखवून व अनेक साक्षीपुरावे जमवून हळूच त्यांच्या पट्टीखालून सुटायची.

शैशवातील आनंद काही आगळाच असतो. काहीही करत बसावे, हसावे, रुसावे, बडबडावे, खोडया काढाव्यात, छोट्या छोट्या कर्तृत्वावर मोठी बक्षिसे मिळवावीत. सहजीवन मी इथेच अनुभवले डबेच काय पण सुख आणि दुःखही वाटून घेतले. रुसवे—फुगवे, भांडणतंटे, कट्टीबट्टी , यांनी — चविष्ट केलं इथलं जीवन.................. आठवतात ती स्नेहसंमेलन ते नाटिका बसवणं, गाण्यांच्या तालमी, प्रदर्शनाचे तक्ते वक्तृत्व—स्पर्धा, क्रिडास्पर्धा .......... ते जिंकणं .......... ते हरणं ! बालपण

म्हणजे अवखळपणे वाहणारा निर्मळ झरा! बालपणी असेच सारे, निष्पाप, निरागस, हसतमुख असतात. विकरांनी आपल्या मनात घर केलेले नसते. त्यामुळेच,

'आनंदाचे डोही । आनंद तरंग ।

आनंदीचीरंग । आनंदाचे । अशी अवस्था असते.

शाळा म्हणजे ज्ञानाचा खजिना, खूप काही शिकलो, भौतिक शास्त्राची रुक्ष इमारत याच्याच सिध्दांतावर उभी आहे. झाडावरुन पडलेले फळ आम्हाला गुरुत्वाकर्षण शिकवून गेले तर चहाच्या कपात बिस्कीट बुडविल्यनंनर बाहेर पडलेला चहा तरणचा नियम शिकवून गेला. पुस्तकांतील मूलभूत तत्वांनी, धातूंनी वायूंनी रसायनशास्त्राचे पान अन पान सोनेरी केले. भूगोलाच्या तासाला वर्गात बसूनच जगाचा फेरफटका मारुन आलो.

"मातृदेवोभव । पितृदेवोभव । आचार्यदेवोभव। "आपल्या गुरुचे स्थान आपल्या आयुष्यात आई — वडिलांइतकेच श्रेष्ठ मानून ध्येयाकडे झेपावलो. एकच विचार मनाशी पक्का केला.

"अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा "शाळेतील काही गोष्टी कोणाला त्रासदायक वाटल्या तरी रम्य ती शाळा असाही बऱ्याच जणांचा अनुभव असतो म्हणून तर प्रथम रडत रडत शाळेत जाणारे विद्यार्थी नंतर शाळेत रमतात आणि शाळा सोडताना त्यांना रडू येते कारण शाळेत जीवाभावाचे सोबती जोडले ज़ातात, मातापित्यांची जागा शिक्षक घेतात.

"बाळपणीचा काळ सुखाचा आठवतो घडी घडी" असं म्हणता म्हणता,

'अहा ते सुंदर दिन हरपले,
मधुभावांचे वेड जयांनी जीवा लावले.'

अस म्हणण्याची पाळी आली. आज मी अशा वळणावर उभी आहे की जिथून विशाल भविष्यकाळाचं क्षितीज पसरलय, ज्याला कधी अंतच नाही. उच्च शिक्षण माझी वाट पाहत आहे. परंतु आज मात्र मला वाटतं की ते माझे शाळेतील दिवस म्हणजे माझ्या उज्वल भविष्यकाळाची एक सुंदर रम्य पहाट होती की जिच्यावर भीती आणि आनंद यांची मिश्रीत प्रभा फाकली होती. बालपणानंतर तरूणपण आलं, वृद्धत्वही डोकावू लागेल, परंतु जीवनातील वसंत ऋतू मात्र माझ्या हातातून निसटला आहे. कारण काळाची गती कोणाला रोखता आली आहे ? तो पुढे धावरणारच ! भूतकाळासाठी रडण्यापेक्षा वर्तमान काळाशी लढण्यात आणि भविष्याच्या शिखरावर चढण्यातच खरा पराक्रम ठरेल. मग आणि म्हणूनच प्रौढत्वातही शैशवाला जपणं, एवढंच आज माझ्या अन् तुमच्या हातात आहे. म्हणूनच आज मी म्हणेन —

Like a tree we each
must find a place
to grow and branch out
and that is our favourite school
& Childhood Nothing else !

---

**करे स्वर्ग सा यह संसार**

साधा जीवन, उच्च विचार
बने हमारा हृदय उदार ।।
तन हो स्वस्थ, भुजा में बल दो,
मन प्रसन्न हो, चित निर्मल हो
बने ज्ञान—गुण के आगार ।।
ऊँच—नीच का भेद भगावे
दीन—दलित को गले लगावे
करे मातृ—भू का उद्धार ।।
सेवा व्रत हो, सत्य धर्म हो,
ध्येय सदा कर्म हो
करे स्वर्गसा यह संसार
यही कामना बारबार ।।

**आखिला चमनशेख**, ग्यारहवीं, क्लास.

# निरोप शाळेला – निरोप बाल्याला

**शितल गांधी**
अकरावी, वाणिज्य

"बालपणीचा काळ सुखाचा । आठवतो घडो घडी।"

खरोखरच ! रम्य असा हा बालपणाचा काळ विसरता येणे कधीच शक्य नाही. बालपणं हा अवखळपणे वाहणारा निर्मळ झरा आहे. बालपणात भूतकाळातील, भविष्यातील कोणत्याच गोष्टींची चिंता नसते. का तर त्यावेळी आपल्या डोक्यावर आई–वडिलांच्या मायेचे प्रेमळ छत्र असते. आजी–आजोबा सारखे लाड करतात. एखाद्या वेळी आई जरी ओरडली तरी आजी प्रेमाने जवळ घेत म्हणते, "अगं ! जाऊ दे गं. अजून लहान आहे ती!" पाहिलंत ही अशी असते बालपणची किमया.

बालपण हा आपल्या जीवनातील वसंतऋतू असतो. या वसंत ऋतूचे आकर्षण सर्वांनाच असते. वसंत ऋतूत झाडाला नवीन पालवी फुटते. झाडाची वाढ होत होत मग त्याचा डेरेदार वृक्ष बनतो. त्याचप्रमाणे आपल्या बालपणात जीवन रोपट्यालाही पालवी फुटायला सुरूवात होते. हळूहळू आपली वाढ होत असते. अशा या बालपणाच्या रोपट्याला खत, पाणी घालण्याचे, त्याची जोपासना करण्याचे त्याला संरक्षण देण्याचे काम आई–वडिल आणि विशेषतः शाळा करते. तेव्हा कुठे अनुभवाच्या पार्श्वभूमीवर व्यक्तीमत्त्वाचा डेरेदार वृक्ष फुलतो.

आपल्याला घडवण्यात शाळेचा अमूल्य वाटा असतो. शाळेची इमारत म्हणजे काही नुसत्या चुना–विटांच्या खोल्या नसतात. या चार भिंतीत एक वेगळच विश्व असते. या चार भिंती या संस्कार, शिस्त, ज्ञान आणि प्रेम यांचे प्रतिक असतात. शाळेत प्रवेश करताना प्रथम आपल्याला तिची ओळख नसल्यामुळे मनात भिती असते. पण नंतर ही शाळा किमया करते आणि त्या भितीचे रूपांतर भक्तीत होते.

शाळेची सुरवातच राष्ट्रप्रेमाच्या धड्यापासून होते. शाळेत गेल्यावर आपण सुरवातीला राष्ट्रगीत व प्रतिज्ञा म्हणतो. त्यातून आपल्याला राष्ट्रभक्तीची प्रेरणा मिळते. शाळेत शारिरीक शिक्षण, गर्लगाईड, स्काऊट, आर.एस.पी. यासारख्या विषयामध्ये खेळातून मुलांना शिकवण दिली जाते. समाजसेवेसारखा विषय त्यांना समाजासाठी काही तरी करण्याची शिकवण देतो. अशाप्रकारे शाळा ही बालपणात मुलांचे शारिरीक व त्याचबरोबर मानसिक आरोग्य ही राखते. सहलींच्या माध्यमातून निसर्गप्रेम शिकवते.

अत्यंत आवश्यक अशी सहजीवनाची शिकवण मला शाळेनेच दिली. या शाळेच्या १०,१२ वर्षाच्या काळात मला अनेक मित्र–मैत्रिणी भेटल्या. मैत्रिणींच्या सहवासात मला खूप काही शिकायला मिळालं. सतत गप्पा मारणं, एकमेकांच्या खोड्या काढणं, मग रूसवे–फुगवे, भांडणतंटे, आणि कट्टीबट्टी सगळं काही आता हास्यास्पद वाटते. प्रतिनिधीत्वासाठीच्या चढाओढी, विविध प्रदर्शने स्पर्धा यामुळे बालपणाचा आनंद द्विगुणीत झाला.

शाळेत दरवर्षी स्नेहसंमेलने होत. आमच्या अंगच्या कलागुणांना यातून वाव मिळत होता. कधी एखादे नाटक तर कधी नाच, समूहगीते असे वेगवेगळे कार्यक्रम आम्ही दरवर्षी सादर करायचो. पंधरा दिवस

आधीपासूनच जणू काही कुणाचं लग्नच आहे. अशा उत्साहाने आम्ही नाटकाच्या, नाचाच्या तालमींना सुरवात करायचो. एवढी मेहनत घेऊन आमचा नंबर आला की मला जग जिंकल्यासारखा आनंद व्हायचा. पण कधी—कधी हरावंही लागायचं. हीच यश टिकवण्याची आणि अपयश आल्यास अपयश पचवण्याची अमोल शिकवण शाळेनेच मला दिली. शाळेने आमचे बालपण जोपासत आम्हाला ज्ञान दिले. बाल्य अवस्थेतील आमच्या कोवळ्या मनावर विविध संस्कार घडविले.

हे सर्व शिकता—शिकता ही दहा वर्ष कधी निघून गेली ते कळलेच नाही. शालांत परिक्षा झाली. आता या शाळेला निरोप द्यायचा. आता आमची क्षितीजे विस्तारातील, कुणी डॉक्टर, वकिल, इंजिनियर, होतील तर कुणी साहित्यिक, समाजसेवक, राजकारणी होतील. सगळे एकमेकांपासून दूर होतील. बरोबर राहतील त्या फक्त बालपणातील शाळेने दिलेल्या सुखद आठवणी. म्हणूनच 'बालपण हे रम्य असते' असे म्हणण्यापेक्षा 'शाळा ते बालपण रम्य बनवते' हे बोलणे अधिक सार्थ होईल.

आता शाळा संपली. महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा. आता आमच्या महाविद्यालयाकडून आणि अर्थातच महाविद्यालयाच्या आमच्याकडून विविध अपेक्षा असणार. आता ते एक आव्हान आमच्यापुढे आहे. पण आता बालपणाचा हा अमूल्य ठेवा आमच्यापासून काळ हिरावून नेतो आहे. शाळेप्रमाणेच बालपणालाही निरोप देऊ नये असे वाटते. पण आता काही चूक झाली तर आई देखील म्हणते, 'तू आता लहान राहीली नाहीस, चांगली कॉलेजात जातेस." याचाच अर्थ आई हेच सुचवत असते की,

"निरोप शाळेला—निरोप बाल्याला."

## विनोद

मी आणि आमचे हे (मिस्टर) प्रवासाला चाललो होतो तेव्हाचा एक प्रसंग.

आजी : अरे कंडक्टर, पंढरपूर आलं का ?

कंडक्टर : नाही हो आजी. आलं की सांगतो.

आजी : (थोड्यावेळाने) आहो कंडक्टर, पंढरपूर आलं का ?

कंडक्टर : नाही हो आजी. आलं की सांगतो.

(पंढरपूर येऊनही जातं पण कंडक्टर सांगायला विसरतो)

आजी : (बऱ्याचवेळाने) आहो कंडक्टर पंढरपूर आलं का ?

कंडक्टर : सॉरी आजी, पंढरपूर येऊन देखील गेलं पण मी .....

(मला व मिस्टरना समाजसेवेची आवड म्हणून गाडी मागे पंढरपूरला वळवली)

कंडक्टर : आजी, आता उतरा बरं तुमचं पंढरपूर आलं.

आजी : नाही रे बाबा, पंढरपूरला उतरायचं नव्हतं. माझ्या लेकानं पंढरपूर आलं की मला औषधाची गोळी घ्यायला सांगितली होता

**रेणुका देवरमनी**

# पालकांकडून आमच्या अपेक्षा

**सारिका दलाल**
अकरावी, शास्त्र

शेजारचा दादा डॉक्टर झाला. एम.बी.बी.एस. मध्ये तो प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आला. कौतुकाने त्याची आजी सुनेला म्हणाली, "जिंकलंस हो पोरी ! झाला तुझा लेक डॉक्टर!" खरंच त्या दिवशी त्याच्या आईला किती कृतकृत्य वाटत असेल!

दादाला विचारलं असता तो म्हणला, "मी डॉक्टर झाल्यापेक्षा मी आईचे स्वप्न पूर्ण केले याचा मला जास्त आनंद वाटतो." त्याचं हे उत्तर ऐकून सहजच माझ्या मनात एक विचार डोकावला. खरंच आईचे स्वप्न पूर्ण करताना दादांच्या स्वप्नांचे काय झाले ?' कदाचित त्याला इंजिनियरही व्हायचे असेल पण आईच्या स्वप्नपूर्तीसाठी त्याने आपली इच्छा तर दाबली नाही ना ?

प्रत्येक पालकाच्या मुलांकडून काही ना काही अपेक्षा असतात. त्यांच्या लहानपणी आर्थिक परिस्थितीमुळे किंवा इतर काही कारणांमुळे जे त्यांना करायला मिळाले नाही, ते मुलांनी करावे अशी त्यांची अपेक्षा असते. यात काही चूक आहे असे मी म्हणत नाही. परंतु स्वतःच्या स्वप्नपूर्तीच्या नादात मुलांचा कल कुठे आहे, त्यांना कशात गोडी आहे याकडे मात्र कळत नकळत दुर्लक्ष होते. लहानपणी मुलांना जोजावत असतानाच,

"मेरा नाम करेगा रोशन;
जग में मेरा राज दुलारा !"

अशी स्वप्ने आईबाबा पहात असतात.

मग दहावी—बारावीनंतर केवळ पालकांच्या इच्छेखातर मुलगा मेडिकलला / इंजिनियरिंगला जातो. तीन—चार वाऱ्या केल्यानंतर कसाबसा त्यातून सुटतो. पण त्यावेळी या स्पर्धेच्या जगात त्याची किंमत शून्य असते. त्याचे भविष्य अंधारात असते. "पुन्हा कार्ट्याला आमची किंमत नाही" असे म्हणून अपयशाचे खापर त्याच्याच माथी फोडले जाते. पण त्या वेळी असा विचार कोणीच करत नाही की, सर्व संधी सोई त्याला त्याच्या आवडीच्या क्षेत्रात उपलब्ध करून दिल्या असत्या तर त्याने नक्कीच आपले नाव 'रोशन' केले असते.

आजचा विद्यार्थी चौकस आहे. कुठलीही गोष्ट करायची झाली तर ती तशीच का करायची याची तो कारणे शोधत असतो. पण मोठ्यांना विचारले असता 'आम्ही सांगतो म्हणून करायचे'. त्याने ते ऐकले नाही की 'आजचा विद्यार्थी बेशिस्त आहे' असा शेरा आम्हा विद्यार्थ्यांच्या माथी येतो.

हल्ली 'लोकलमधून नीट जा', 'अंधार पडायच्या आत घरी या' अशा सूचना पालक देत असतात. या साऱ्या सूचना मुलांबद्दलच्या प्रेमापोटी, काळजीपोटीच असतात. परंतु खरंच आजच्या युगात हे शक्य आहे का ? याचा विचार किती पालक करतात? पालकांचे आंधळे प्रेम आम्हाला भित्रे बनवते.

आम्हाला पालकांच्या आंधळ्या प्रेमाच्या कुबड्या नकोत तर डोळस प्रेमाची गरज आहे.

याचा अर्थ असा नाही की पालकांनी आम्हाला काहीच सांगू नये. त्यांच्या अनुभवाची, त्यांच्या उपदेशाची आम्हाला वेळोवेळी गरंज भासणारच आहे. पालकांनी

भविष्याची सर्व दारे आम्हाला उघडून दाखवावीत. त्यातले खाचखळगे समजावून सांगावेतः पण हो अंतिम निर्णय मात्र आमच्या हाती द्यावा; अशी आम्हा सर्व विद्यार्थ्यांची अपेक्षा आहे.

महाभारतामध्ये श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धात मदत केली नाही; पण जिथे अर्जुन हतबल झाला; तिथे उपदेश करून, मार्गदर्शन करून श्रीकृष्णाने त्याला नवीन प्रेरणा दिली. आमच्याही पालकांनी आमच्या जीवन—संग्रामात श्रीकृष्णाची भूमिका बजवावी हीच आमची 'अपेक्षा' आहे. ❑

## हुंडा

ठरवले आहे पक्के मी,
हुंडा अजिबात घेणार नाही,
पण, स्वतःहून काही दिले तर,
नाही मात्र म्हणणार नाही.

सासरेबुवा तुम्ही काहीच,
देऊ नका माझ्यासाठी,
टी.व्ही., फ्रीज आणि गाडी,
लागेल ना तुमच्याच मुलीसाठी.

दोघेही आपण करू,
अर्धाअर्धा खर्च लग्नाचा,
खर्च करा तुम्ही जेवण, मानपानाचा,
उरलाच तर, मी बघतो बाकीचा.

घर माझे आहे खूपच लहान,
मुलीला तुमच्या आवडणार नाही,
म्हणूनच तर लग्नानंतर,
म्हणतोय मीही इथेच राहीन.

## भेदभाव विधात्याचा (?)

जन्म—मृत्यू खेळ असतो न्यारा,
विधात्याने रचलेला डाव असतो सारा.

जन्मानंतर एखाद्याच्या पेढे—बर्फी वाटले जातात,
पण, जन्मानंतर एखाद्याच्या मात्र शिव्याशाप देतात.

आयुष्यात एखादाच जगतो सुखाने,
पण एखाद्याचा प्राण मात्र तळमळतो भुकेने.

एखाद्यालाच मान मिळतो कुलदीपकाचा,
पण, एखाद्याला मात्र म्हटले जाते करंट्या कपाळाचा.

मृत्यूनंतर, एखाद्याच्या नशिबी शोभा असते लग्नाची,
पण, मृत्यूनंतर एखाद्याच्या साधी गाडीही नसते मनपाची.

जगात सारे ओरडून सांगतात, भेदभाव दूर सारा!
पण, विधात्याच्या भेदभावापुढे माणसाला काय थारा!

**सुनंदा कोतवाल**, द्वितीय वर्ष, वाणिज्य

# आजचे कॉलेज जीवन

**अजय आडसुळ**
तृतीय वर्ष, कला

खरंच दहावीनंतर विदयार्थी कॉलेजमध्ये प्रवेश करतात. सुरुवातीला त्यांना कॉलेज म्हणजे काहीतरी वेगळे असेल असे वाटत असते. परंतु कॉलेजचे जीवनही सर्वसामान्य असते. आपल्यापेक्षा मोठ्या मित्रांपासून त्यांना सांगितले जाते की कॉलेज म्हणजे ऐश करणे, जीवनाचा आनंद लुटणे, मजा करणे. 'सायन्स साइड' म्हणजे सर्व शास्त्रांचा अभ्यास, 'कॉमर्स' म्हणजे गणितं आणि 'आर्टस' म्हणजे इतिहास, भूगोल व इतर सामाजिक शास्त्राचा अभ्यास, अशा प्रकारे त्यांना कॉलेजची माहिती सांगितली जाते. परंतु आज जर आपण कॉलेजच्या जीवनाचा विचार केला तर काय आढळत ?

आज कॉलेजचे विद्यार्थी हे १२ वी पर्यंत शाळेची शिस्त असल्यामुळे प्राध्यापकांशी घाबरून वागतात, नियमित तासाला बसतात. परंतु १२ वी नंतर ह्या शिस्तीला मुरड घातली जाते. विद्यार्थी तास बुडवू लागतात, अभ्यासाकडे दुर्लक्ष करू लागतात आणि आपल्या भावी आयुष्याचा विचार करीत नाहीत. याच दरम्यान अनेक मित्र—मैत्रिणींशी तास बुडवून गप्पा मारण्यात वेळ घालविला जातो. काही जण प्रेमप्रकरणात पडतात. असे विद्यार्थी तर सतत हवेत उडत असतात. ती किंवा तो यास सर्वस्व मानतात व शिक्षणाकडे कानाडोळा करतात. त्यामुळे त्यानंतर 'ब्लॅक लॉग' पद्धतीनुसार परीक्षा देण्याची पाळी येते.

आज कॉलेजची अभ्यासिका (लायब्ररी) ही नेहमी ओस पडलेली दिसते. आजचा विद्यार्थी हा 'रोझ डे' 'हाय डे', 'सारी डे', 'ट्रॅडिशनल डे अशा अनेक कार्यक्रमामध्ये गुरफटला जातो. आजचा विद्यार्थी कॅन्टीन व चौकाच्या पायपट्टीवर वेळ घालविताना दिसतो. जेव्हा परीक्षा जवळ येतात, तेव्हा 'प्रगती' किंवा आयत्या नोट्सवर अभ्यास करून कशीबशी परीक्षा देतात. ह्या अपुऱ्या अभ्यासामुळे त्याच्या ज्ञानात काहीच भर पडत नाही. त्यामुळे त्याच्या शिक्षणामध्ये गुणवत्ता राहत नाही व याचमुळे पुढे 'डिगरी' होऊनही फिरावे (डिग्री) लागते. देशामध्ये अशा फक्त शिक्षित बेकारांची संख्या वाढत असताना आपणास दिसते.

माझे असे मत नाही की कॉलेजमधील सर्व विद्यार्थी असे वागतात. परंतु ज्यांना खरंच शिक्षणाची जाणीव आहे, असे किती विद्यार्थी आहेत ? असा विद्यार्थी वर्ग फार अल्प आढळतील. खरं म्हणजे आज विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची जाणीवच राहिली नाही. आपले आई—वडील पोटाला चिमटा घेऊन आपल्या मुलास शिकवितात, हे ते विसरून जातात. त्यांना त्यांच्या कष्टाची जाणीव दिसून येते का ?

आणि याच वेळी कॉलेजमध्ये N.C.C. व N.S.S. यासारखे महाविद्यालयीन पातळीवर उपक्रम राबविले जातात. N.C.C. मध्ये विद्यार्थ्यांना शिस्तीचे पालन शिकविले जाते व देशाविषयी व आपल्या बांधवांविषयी प्रेम शिकविले जाते. त्याचप्रमाणे N.S.S. मध्ये समाजसेवेतून सामाजिक जाणीव निर्माण केली जाते. समाजाचे प्रश्न व त्याकडे पाहण्याचा व काहीतरी करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. समाजामध्ये कसे वागावे, बोलावे याबद्दल विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते.

त्याचप्रमाणे कला मंडळ, वाद—विवाद मंडळ व जिमखाना विभाग यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले जाते. आजच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाची जाणीव ठेवून जर खऱ्या अर्थाने विद्यार्जन केले, तर आजचा विद्यार्थी हा यशस्वी होईल व आपली गुणवत्ता वाढवून तो या स्पर्धेच्या युगामध्ये आपले व देशाचे नाव उंचावू शकेल. ❑

# मैत्री

**नीता जोगळेकर**
द्वितीय वर्ष, शास्त्र

मनाच्या संवादातून निर्माण होणारी जवळीक, आपुलकी म्हणजेच मैत्री. मैत्री हे नातं आहे असं म्हणावं तर याला कोणत्याही नात्याची बंधने नसतात. किंबहुना जगाच्या चालीरीतींपासून वेगळे होऊन जेव्हा सूर जुळतात, तेव्हाच त्याला मैत्री म्हणतात. प्रत्येक नात्याची काहीना काहीतरी कर्तव्ये मानली गेली आहेत, अशा वेळेस एकमेकांकडून आपल्या काही ना काही अपेक्षा असतात. या अपेक्षांमधूनच सर्व नाती अखेर मर्यादित राहतात. मैत्रीचं मात्र असं नाही. एकमेकांकडून काहीही अपेक्षा न ठेवता जुळले गेलेले" हे संवाद, स्वतःमध्ये एक वेगळेपण निर्माण करतात. या निरपेक्ष बुद्धीने घडलेलं हे नातं, आणि तरीही सर्व अपेक्षा पूर्ण करणारं हे नातं खरोखरच अतिशय सुंदर असतं.

मैत्री हा शब्द तसा फार वरवरचा म्हणून वापरला जातो. जुजबी ओळखीतून तयार झालेल्या वरवरच्या नात्यालाही बहुतांशी याच नात्याने संबोधले जाते. मराठी भाषेत दोन शब्द सुरेख फार आहेत की जे आपण निष्काळजीपणे समानार्थी शब्द म्हणून वापरतो. मित्र आणि स्नेही. या त्या दोन शब्दांत तसं म्हटलं तर काहीच अंतर नाही. नाहीतर खूप फरक आहे. स्वतःचं असं काही तरी बाजूला ठेवून दुसऱ्यांच्या मनात खोलवर डोकावून न पाहता ठेवलेली ओळख हा स्नेह असतो. या नात्यात दोन्ही व्यक्तींनी स्वतःचे खरं व्यक्तित्व दुसऱ्यापासून लपवून ठेवलेले असते. मैत्रीमध्ये दोन्ही व्यक्तींचे विचार हे त्यांचे स्वतःचे विचार राहात नाहीत, ते परस्परातील आपुलकीतून निर्माण झालेले एकत्रित विचार असतात. 'मी' हा माणसाचा सर्वात मोठा शत्रू या नात्यामध्ये अडसर होत नाही.

अशा अर्थपूर्ण मैत्रीसंबंधात सर्वात महत्त्वाचा जो पैलू असतो तो म्हणजे, परस्परांवरचा नितांत विश्वास. स्वतःच्या डोळ्यांपेक्षा, कानांपेक्षाही मैत्रीवरचा गाढ विश्वास हे नातं अधिकाधिक सकस व अर्थपूर्ण बनवायला मदत करतो. अशा मैत्रीची ओढ वाटणं ही परस्परांनी एकाच वेळी अनुभवायची गोष्ट आहे. ते नातं असं 'म्युच्युअल' असेल तरच ते अर्थपूर्ण असतं. तुझी मला आहे त्यापेक्षा माझी तुला गरज अधिक आहे असं मानून स्वतःकडे वरिष्ठपणा घेणं किंवा आपल्याला जास्त गरज आहे असं मानून स्वतःला कमी मानणं, या दोन्हीही गोष्टी सच्च्या मैत्रीला घातक ठरू शकतात.

अशा नात्यात होणारी भांडणं ही बहुतेक वेळेस चहाच्या पेल्यातली वादळं असतात. या वादामागेही बहुतेक वेळा आपल्या मित्रमैत्रिणींबद्दलची ओढ, आपुलकीच कारणीभूत ठरते. मात्र काही वेळेस साध्या साध्या गोष्टीही दोन मित्रांना कायमचे दूर करून जातात. अशा जिवाभावाच्या नात्यामध्ये निर्माण होणारी तेढ महत्त्वाची असते. कारण ते मित्र किंवा मैत्रिणी अत्यंत मोलाच्या असतात. तेढ निर्माण झाल्यावरही कोणीतरी माघार घेणं फार आवश्यक आहे. अशी यशस्वी

माघारच पुन्हा एकदा मैत्रीची तुटलेली गाठ जोडू शकते. वेळेवर जर ही माघार घेतली गेली नाही, तर एका सच्च्या मैत्रीला कायमचं पारखं होण्याची वेळ येते. जेव्हा आपल्याला ह्याची जाणीव होते, तेव्हा ते मित्र किंवा मैत्रिणी इतके दूर गेलेले असतात की, आपण स्वतःला त्रास करून घेण्याशिवाय दुसरं काहीही करू शकत नाही. आपल्या मनात असूनही परमेश्वराने ही गोष्ट आपल्या आवाक्याबाहेर गेलेली असते.

मनातली खदखद आणि खळखळ व्यक्त करण्यासाठी मैत्रीसारखं सुंदर नातं नाही. आपण एकमेकांच्या स्वभावातल्या गुणदोषांसकट स्वीकारलेलं असतं. अशी मैत्री टिकविण्यासाठी आपल्या मैत्रिणीला हवा तसा भावनिक आधार द्यायला हवा आणि आपणही तितक्याच मोकळेपणानं, हक्कानं मागून घ्यायला हवा. हे नातं कायम बरोबरीचं असतं. खरा आनंद द्यावा तो मैत्रीनेच, खरी भांडणे व्हावीत ती मैत्रीमध्येच आणि खरं दुःख मिळावं तेही मैत्रीमुळेच.

ते नातं होतं मैत्रीची साक्ष देणारं
अमृताच्या कैफात धुंद करणारं
कल्पनेच्या क्षितिजावर झुलणारं
विश्वासाच्या पायावर उभं राहणारं
प्रत्येक कसोटीला खरं उतरणारं
कोणत्याही नात्यात न बसणारं
स्वार्थी जगापेक्षा जरासं वेगळं
असं ते नातं होतं मैत्रिची साक्ष देणारं!

अशा या अलौकिक नात्यातून जे काही आपण मिळवितो, त्याला या भौतिक जगाची जोड देता येणार नाही. परस्परांमधील विश्वासावर उभं राहणारं इतकं निखळ नातं दुसरं असू शकत नाही. ❐

## चटई आयुष्याची

चटई मी आयुष्याची
खूप तऱ्हेने विणली
काही रेशमी धाग्याने
तर काही जाड्याभरड्याने
रेशमी धागा मात्र
फार काळ टिकला नाही
जाड्याभरड्याने मात्र
आजही साथ सोडली नाही
थोडा काळ का होईना
त्याने सप्तस्वर्गीय सुख दिले
रेशमी धाग्याने मात्र आयुष्यभर
दुःखाचे विषच पाजले
नसेलही माझ्या आयुष्यात
रेशमी धाग्याची साथ
पण तेवढ्या कारणाने मी
होणार नाही उदास
पायी काटे रुतताना
ओठी हास्य आणायचे असते,
असे जीवन जगण्यात वेगळीच मौज असते.

**विद्या झाडे**

# मैत्री

**अर्चना वर्पे**
अकरावी, कला

आपल्या समाजात बहीण–भाऊ मानणे हा एक प्रकार आहे. अजूनही समाजात हा माझा मित्र आहे किंवा ही माझी मैत्रीण आहे, असं दिलखुलासपणे नैसर्गिकरीत्या, बोलूच शकत नाही. जर असे बोलले तर एकमेकांना अर्थपूर्ण नजर द्यावी लागेल, किंवा डोळे मिचकावे लागतील. एकूण काय, मैत्रीसारख्या निरोगी भावनेला आपण एकदाचे राखी बांधून भावाबहिणीच्या बुरख्याआड दडवलं की आपल्याला हायसे वाटतं.

भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांचा रोष पत्करूनसुद्धा मला हे सांगावेसे वाटतं की, अशा प्रकारची चलाखी बहुतेक द्रौपदी–कृष्ण यांच्यापासून सुरू झाली असावी. कृष्ण द्रौपदीला स्वयंवरातून जिंकायला गेला होता. तो काही भगिनीप्रेमामुळे नव्हे. जेव्हा त्याने पाहिलं की आपले आतेभाऊ पांडव यांना द्रुपदासारख्या समर्थ राजाच्या पाठबळाची गरज आहे, तेव्हा तो आपणहून स्वयंवरातून बाजूला झाला. म्हणून इलेक्ट्रिक स्विचप्रमाणे भावना ऑन किंवा ऑफ करता येतात का ? आणि समजा, जरी त्या कृष्णपरमात्म्याला हे भावनांचं उदात्तीकरण जमलं, तरी आज आपण त्याचे किती प्रचंड विकृतीकरण केले आहे ? अशा प्रकारच्या भावाबहिणीच्या नात्यापेक्षा मैत्रीची भावना अधिक निकोप नाही का ?

परंतु त्याच निरोगी नात्याचीच भारतीय समाजाला ॲलर्जी आहे. पती–पत्नी, भाऊ–बहीण, दीर–भावजय हे सर्व एकमेकांचे चांगले मित्र होऊ शकतात. त्यासाठी नात्याच्या जोखडापलीकडे जाण्याची गरज आहे. आपले लोकप्रिय चित्रपट व दूरदर्शन मालिका मात्र जुनाटपणालाच खतपाणी घालत असतात. 'भाऊजी', 'वहिनी', 'वन्स' ह्यांखेरीज त्यातील पात्रं बोलायलाच तयार नसतात.

करमणुकीची माध्यमं इतकी प्रभावी आहेत की, त्यांनी सध्या जिथे आहे त्याच्या दोन पावलं पुढची समाजस्थिती होकारात्मक दृष्टिकोनातून दाखविली पाहिजे. समाजाला पुढे नेण्याचा प्रयतन केला पाहिजे. त्याऐवजी ते नेहमी सुधारणा कशी वाईट, जुनाटपणाच कसा चांगला असे दाखवून, समाजाला मागे खेचत असतात. विनोदी चित्रपटांत किंवा साहित्यात याहून वेगळे नाही.

म्हणून मला असे सांगावेसे वाटते की, मैत्री असावी तर कोऱ्या कागदाप्रमाणे–तिला कधीही घड्या पडू देऊ नये. तरच मैत्रीतील मैत्री टिकून राहते. ❑

## मोका

नवरा : अग, नगरपालिकावाल्यांनी रस्त्यावर मोकाट जनावरांना पकडण्याची मोहीम हाती घेतलीय म्हणे !

बायको : अहो, म्हणूनच मी दररोज तुम्हाला म्हणते की रस्त्यावर जास्त फिरत जाऊ नका.

**मिनाक्षी माने,** अकरावी कला

# जीवनात गप्पांचे स्थान

**अजय आडसुळ**
तृतीय वर्ष, कला

एक प्रसिद्ध लेखक म्हणाले की मानव म्हणजे कोण ? 'जो मनन करतो तो मानव.' दुसरे लेखक म्हणाले, 'गाडी चालवतो तो मानव'. तिसरे म्हणाले 'एक द्वितियांश पायावर चालतो तो मानव'. चौथे म्हणाले. 'जगात हसणारा प्राणी म्हणजे मानव. मला कुणी मानवाची व्याख्या विचारली तर मी सांगेन की, ज्याच्या जीवनात गप्पांना महत्त्वाचे स्थान आहे तो मानव.

असो. काही विद्वान कपाळाला आठ्या घालून म्हणतील की गप्पा मारणे आणि माश्या मारणे यात फरक नाही.गप्पांमुळे काळाचा अपव्यय होतो. गप्पांमधून कुटाळक्या निर्माण होतात. कुटाळकी ही निंदेची जननी आहे. निंदेमुळे निष्कारण शत्रू निर्माण होतात व अशा शत्रूमुळे जीवनाचे स्मशान होते. व या स्मशानात गप्पा मारीत बसण्याची पाळी येते म्हणून मानवी जीवनात गप्पांना स्थान नाही.

परंतु अशा विद्वानांचे जीवन हे वैराण वाळवंटाप्रमाणे झालेले असते. त्यांचा स्वभाव एकलकोंडा असतो, म्हणून त्यांना गप्पांचे महत्त्व कळत नाही. गप्पा म्हणजे वाळवंटातील हिरवळ, जीवनाच्या अंधारात लुकलुकणाऱ्या तारका. खवळलेल्या सागरात जहाजाच्या कप्तानाला दूरवर दिसणारा दीपस्तंभ म्हणजे गप्पा. गप्पांचे महत्त्व ज्यांना समजले नाही, त्यांनी गप्पीदासांच्या आखाड्यात कान टवकारुन बसावे. आखाड्यातील गप्पांची मैफल संपल्यावर हे नीरस विद्वान लोक रसयुक्त गप्पा मारण्यास शिकतील, त्यांना जीवनातील गप्पांचे स्थान समजेल आणि त्यांच्या जीवनामध्ये टवटवीतपणा येईल.

माणूस हा समाजशील प्राणी आहे. व तो समूहाने राहण्याचे पसंत करतो. यावेळी आपल्या भोवतालच्या व्यक्तींशी विचार–विनिमय करण्यासाठी त्याला आपापसात गप्पा माराव्या लागतात. एकमेकांचे विचार समजण्यासाठी त्यांच्यामध्ये संवाद होणे आवश्यक असते व त्यासाठी गप्पा अनिवार्य आहेत. स्टेशनवरील वेटिंगरूम, 'रस्त्यातील चौक, बागेतील कोपरा, हौदावरील नळ, घरातील अडगळीची खोली, बसमध्ये आपल्या शेजारील प्रवासी ही गप्पा मारण्याची महत्त्वाची ठिकाणे आहेत.

कारागृहातील एकान्तवास आणि वनवासातील संकटे गप्पांच्या नादात सहन करता येतात. सावरकरांना अंदमानातील काळ राजबंद्यांबरोबर गप्पा मारता आल्यामुळे सुसह्य झाला. लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगामध्ये आचाऱ्याबरोबर सुपारी खाऊन गप्पा मारीत. गप्पांमुळे शिक्षेची सहा वर्षे भुर्रदिशी उडून गेली. पुराणकालातील रामचंद्राला चौदा वर्षे वनवास भोगावा लागला. त्या वनवासात लक्ष्मण व सीतादेवी यांच्याशी गप्पा मारताना रामाची चौदा वर्षे मायामृगाच्या चपळाईने निघून गेली. अशी प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतची अनेक उदाहरणे दिसतील.

गप्पा ह्या वेळ घालवण्याबरोबरच व्यक्ती–व्यक्तीमधील विचाराचे आदान–प्रदान होय. अनेक मोठमोठे प्रश्न हे चर्चा करून सोडविले जातात. म्हणजे 'चर्चा' हा सुद्धा गप्पांच्या व्याख्येमध्ये बसणारा आहे. गप्पा जर नसतील तर मानवाच्या जीवनामध्ये रस राहणार नाही, त्याचे जीवन उदासीन राहील व त्यामुळे मानवाची प्रगती खुंटली जाईल. म्हणून गप्पांना मानवाच्या जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. ❐

# संस्कृती

**जबिना चमनशेख**
अकरावी, कला

हा लेख मी मुद्दाम संस्कृतीवर लिहीत आहे. कारण की, ती वेळ आता आली आहे. संस्कृती म्हणजे आपल्या पूर्वजांनी केलेल्या चांगल्या कर्माचे, सभ्यतेचे, "साधी राहणी उत्तम विचार" या तत्त्वाचे आकलन करणे होय.

परंतु, याचा आपण आपल्या दिनचर्यात किती अवलंबन करतो आहोत, हे आजच्या युगात आपल्याला कळतेच आहे. आपण २१ व्या शतकात पदार्पण करत आहोत म्हणजे नक्की काय करत आहोत ? याचा आपण विचार केलात का ? आपली इतकी उच्च पौर्वात्य संस्कृती सोडून आपण पाश्चिमात्य संस्कृतीकडे वळत आहोत. याला जवळ जवळ निम्मा साथ देत आहे, आपला भारतीय सिनेमा. तिथे पाश्चिमात्य संस्कृती, अर्थहीन गीते, अनावश्चक दृश्चे. सध्याच्या नवतारका तर स्त्रीत्वाची मर्यादा सोडून फक्त पैसे कमविण्याच्या मागे धावत आहेत.. त्या तारकाही दूरच्या नसून महाराष्ट्रीयन आहेत हे बघून खूप दुःख व खंत वाटते. आपणच आपल्या पायावर कुऱ्हाडी मारून घेतो आहोत ह्यात नुकसान फक्त आपलेच आहे. कोण म्हणतं की, आपण स्वतंत्र आहोत ? आपण हळूहळू पारतंत्र्याकडे झुकतो आहोत, ते केवळ वरील सर्व कारणांमुळेच होय. म्हणून म्हणते, आपल्या युवा पिढीनेच हा संकल्प करायला पाहिजे की, किती योग्य प्रमाणात आपण पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करावा. आपण भारतीय इतिहासाचा अभ्यास करताना बघतो की, आपल्या संस्कृतीचा दर्जा किती मोठा आहे. सगळ्या जगात भारतीय संस्कृतीचा दर्जा किती मानाचा आहे पण आपलं काय ? काखेत कळसा आणि गावाला वळसा ! देशाच्या विकासासाठी आपणच कारणीभूत ठरणार आहोत. तसेच राष्ट्र घडवणाऱ्या घटकात आपण बघतोच की, संस्कृतीचा किती मोठा वाटा आहे. म्हणून म्हणते की देशाचा फक्त अभिमान असून चालत नाही तर त्याला शेवटपर्यंत तसे टिकविले पाहिजे. आपल्या देशातील गीता, महाभारत, रामायण हे महा ग्रंथ संपूर्ण जगात प्रसिद्ध आहेत. ज्याप्रमाणे नाण्याच्या दोन बाजू असतात त्याप्रमाणे आपल्या देशाचे ऐक्य व स्वातंत्र्य टिकविण्यासाठी देशाची संस्कृती आणि देशाभिमान या दोन गोष्टींचे कट्टर पुरस्कर्ते असले पाहिजेत.

मोठ्यांचा आदर, गुरुविषयी निष्ठा, उच्च महत्त्वाकांक्षा, ज्ञान मिळवण्याची इच्छा, संस्कृती टिकवून तिचे अवलंबन करणे, हे पाच गुण युवा पिढीत असलेच पाहिजेत, असे सुभाषितकार म्हणतात. ❐

## चला माझ्या बरोबर

एक भिकारी : साहेब, मला पैसे द्या.
साहेब : माझ्याकडे पैसेच नाहीत
भिकारी : तर, मग चला माझ्या बरोबर..

**अनिता वैरागर,**
प्रथम वर्ष, कला

# संस्कृती लोकगीतांची : भोंडला व भुलाबाई

**चैत्राली माने**
द्वितीय वर्ष, कला

सर्वसामान्य लोकांनी आपल्या बाळाच्या मनावार उत्तम प्रकारचे संस्कार घडविण्यासाठी लोकगीतकारांचे पाठबळ सदैव मानलेले आहे. त्यासाठी त्यांनी लोकगीतांची ही अपूर्वाईची दुनिया बारसे, मुंज, भोंडला, भुलाबाई, कृष्णदेवाचा आदर्श या विविध प्रसंगांनी आपल्या मुलांच्या जीवनात उभी केलेली आहे. आपले बाळ चारचौघात वाखाणले जावे, नावारुपाला यावे म्हणून मोठ्या शानदार व डौलदार रीतींनी आपल्या वाडवडिलार्जित संकृतींनी जोपासना केलेली आहे.

बारसे, मुंज, भोंडला, कृष्णदेव या विविध प्रसंगांपैकी येथे आपण भोंडला व भुलाबाई या दोन्ही मुलींच्या खेळाचा व लोकगीतांचा विचार करणार आहोत.

**भोंडला : हस्त हा दिनीयाचा राजा**

आपल्या मुसळधारीने जगाचे लक्ष वेधीत येणारा हस्ताचा पाऊस मोठा मानापानाचा. आश्विन मासाच्या वैभवाचा. तर ह्या वेळच्या वाजत गाजत दर्शन देणाऱ्या या पावसाची व त्या वेळच्या हस्त नक्षत्रांची पूजा घरोघरी मराठी मुलखात बांधली जाते. त्या पूजेचे मानकरी असतात त्या त्या घरच्या परकरी पोरीबाळी. ह्या पूजेसाठी समोरासमोर उभ्या असलेल्या हत्तींचे चित्र काढण्यात येते. ह्या हत्तींच्या सोंडेत फूलमाळा असते. भिंतीवर टांगलेला हा देखावा रंगीत खडूने अगर रंगाने काढण्यात येतो आणि अंगणातील हत्तीच्या चित्रासाठी पाटाची बैठक घेऊन त्यासाठी वापरली जाते रांगोळी. पूजेसाठी मग येतात झेंडू मखमलींची, कोरांटी—कारीयाळांची असली त्यावेळी येणारी फुले. आणि हत्तींच्या गळ्यात माळ घातली जाते ते वांगे, दोडका, घोसाळी, भेंडी, पडवळ, सीताफळं, कारलं, मिरची, काकडी इत्यादि फळांची.

रोज सायंकाळी ही पूजा मुली अनेक प्रकारची गीते गावून व फेर धरून, नाचून बांधतात. ह्या गीतांचे विषय असतात प्रामुख्याने बाळपणी, जुन्या काळी उपभोगलेल्या सासरमाहेरच्या सुखदुःखाचे. पण ते गीत संपले की, विसरता यावे म्हणून त्या वेळी मोठी कौशल्यपूर्ण योजना केलेली असते. ती रोज नव्याने तयार होणाऱ्या खिरापतींची खिरापत कुणाला ओळखता आली नसली पाहिजे या इर्षेने त्या त्या घरची सुगरण ती तयारी करीत असते. मोठ्या अक्कलहुषारीचे हे काम. पण ते बिनचूक पार पाडले जाते. मोठ्या हौसेने ते हातीही घेतले जाते. त्यामुळे ओळीने सोळा दिवस खेळला जाणार हा भोंडला मोठ्या उमेदीने व बहारीने सर्वत्र पार पडला जातो. त्यासाठी वडिलधाऱ्यांचे कौतुकही अमाप खर्ची पडते.

हस्त नक्षत्रंच्या पूजेसाठी जी गीते रोज नित्य नियमाने आळविली जातात आणि चढत्या दिवसाच्या संख्येने जी म्हटली जातात. त्यांची स्वररचना अपूर्वाईची असते. वर्णन केलेला गीतातील प्रसंग साग्रसंगीत नजरेसमोर यावा, अशा सुंदर चाली घेऊन ही गीते येतात. त्या कारणाने या दिवसातील घरोघरीचे अंगण मोठ्या नवलाईने शृंगारिले जाते. हस्ताचा पाऊस म्हणजे

वर्षभराचे पिण्याचे पाणी उभे करणारा पाऊस, या वेळच्या मुसळधारांमुळे मानवी जीवनात नवचैतन्य उभारले जाते. म्हणून या चैतन्यमयी जीवनाच्या स्वागताचीच जणू ही पूजा. अशा या भोंडल्यामधीलच हे एक गीत.

अक्कण माती चिक्कण माती
अशी माती सुरेख बाई ओटा तो करावा
अस्सा ओटा सुरेख बाई जातं ते रोवावं
अस्सं जातं सुरेख बाई शोजी ती काढावी
अश्शी शोजी सुरेख बाई करंज्या कराव्या
अश्शा करंज्या सुरेख बाई दुरड्या भराव्या
अश्शा दुरड्या सुरेख बाई शेल्यानं झाकाव्या
अस्सा शेला सुरेख बाई पालखी ठेवावी
अश्शी पालखी सुरेख बाई माहेरी धाडावी
अस्सं माहेर सुरेख बाई खेळाया धाडीतं
अस्सं सासर द्वाड बाई कोंडुनी मारीतं

अशा या भोंडल्याच्या लोकगीतातून सासुरवाशीण आपली हकीकत आपल्या मैत्रिणींना, देवाला सांगत असते.

**भुलाबाई : शंकर पार्वती**

पश्चिम महाराष्ट्रात जसा भोंडला तसा व्हाड–खानदेशात भुलाबाईचा मानपान. भादव्यातील पौर्णिमेपासून भुलाबाईची पूजा आश्विनी पौर्णिमेपर्यंत चालते हा तिचा विशेष.

शंकराला भोलानाथ–भुलोबा असे म्हणतात. म्हणून मग भुलाबाई म्हणजे पार्वती हे ओघानेच येतं. शंकरपार्वती म्हणजे कैलासाचे देव. दुनियेतील लोकांचे भलेबुरे पहाणे हा त्यांच्या मनाचा स्थायिभाव. उण्यापुऱ्यांचे ते मालक. अडल्यानडल्यांचे ते आश्रयदाते. गोरगरिबांचे ते वाली, म्हणून त्यांचे स्मरण करावयाचे. त्यांच्या छत्राखाली वावरावयाची संधी घ्यावयाची. ही या खेळामागची भूमिका असावी.

घरातील दिवाळीला –कोनाड्याला–चांगली आरास करावयाची, मखर बसवायचे आणि आत भुलोबा व भुलाबाई यांची मातीची चित्रे करून बसवायची. त्यांच्या आशीर्वादाने चांगले दिवस यावेत म्हणून प्रार्थना करावयाची. त्यासाठी भोंडल्याप्रमाणेच अनेक प्रकारची गीते म्हणावयाची. रोज खिरापत वाटायची. मात्र शेवटच्या दिवशी, म्हणजे कोजागिरीला फराळाचे करावयाचे आणि हळदीकुंकवाला खूप जणींना बोलावावयाचे हा फरक आहे. शिवाय भुलाबाईचे विसर्जन केले जाते ते आणखी निराळेच.

यावेळी म्हटल्या जाणाऱ्या गीतांचे विषय भोंडल्याच्या गीतांप्रमाणेच पुष्कळसे आहेत. परंतु काही गीतांच्यामधून भुलोबाचे व भुलाबाईचे वर्णनही आलेले आढळते.

भुलाबाईला काही कारणाने बोलावले. असता भुलोजी घरात नसल्याची कारणे जेव्हा पुढे येतात. आणि 'हळूच भुलाबाई पाय टाका, तोडे तुमचे भारी' असा तिला इशारा दिला जातो, तेव्हा मोठी बहार येते. मुलीबाळी अशा गीतांच्या वेळी विशेष रंगून जातात.

येथून दाणा पेरीत जाऊ माळीयाच्या दारी
हळूच भुलाबाई पाय टाका साखळ्या तुमच्या भारी
येथून दाणा पेरीत जाऊ माळीयाच्या दारी
हळूच भुलाबाई पाय टाका तोरड्या तुमच्या भारी
येथून दाणा पेरीत जाऊ माळीयाच्या दारी
हळूच भूलाबाई पाय टाका तोडे तुमचे भारी.

अशा प्रकारे भोंडला व भुलाबाई यांच्यावर लोकगीते गायली जातात व त्यातून सुखदुःखाची देवाणघेवाण केली जाते. ❒

# ज्ञानेश्वरी : एक अमृतकलश

**नंदकिशोर लोंढे**
द्वितीय वर्ष, कला

माऊली महावैष्णव, संतसम्राट चक्रवर्ती संत ज्ञानेश्वर महाराज यांचे अलौकिक असे तत्त्वज्ञान ही आम मराठी जनतेला मिळालेली अनमोल व अभिमानास्पद वाटावी अशी देणगी आहे. माऊलींची ज्ञानेश्वरी चिरतरुण आहे आणि ती चिरतरुण राहाणार आहे. याचे कारण तिच्यात असणारे ज्ञानभांडार ! माऊलींनी 'ज्ञानेश्वरी' लिहिली. कशासाठी आणि कोणासाठी, याचा विचार करणे आजच्या काळात गरजेचे आहे. काही लोक म्हणतील भगवान श्रीकृष्णाने गीता सांगितली ती अर्जुनासाठी. तिचा आम्हाला काय उपयोग ?

गाय दूध देते ते आपल्या वासराच्या वात्सल्याने; पण त्या दुधाचा उपयोग आपण सर्वजण अगदी हक्काने करतो. त्याचप्रमाणे माऊलीरूपी गायीने दिलेले 'ज्ञानेश्वरी' रूपी क्षीर आपणा सर्वांना अत्यावश्यक आणि पोषक असे आहे. ती कितीही वाचा, तिच्यातील माधुरी कधी संपतच नाही. नामदेवांनी सांगितल्याप्रमाणे ज्ञानेश्वरी न वाचता ती अनुभवली पाहिजे, तिचा अनुभव घेतला पाहिजे.

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी।।'

या ओवीप्रमाणे ज्ञानेश्वरीतील एका ओवीची अनुभूती तरी घेतली पाहिजे. ज्ञानेश्वरीची रचना होण्यापूर्वी भगवद्गीता ही संस्कृतमध्ये असल्याने सामान्यजनांना वाचणे ती कठीण जात होती. अडाणी, अशिक्षित जनता तिचा 'रसास्वाद' घेऊ शकत नव्हती. ज्ञानेश्वर महाराजांनी हे ओळखून नेवासा येथे भगवद्गगीता प्राकृत भाषेतून सांगितली आणि सच्चिदानंद बाबांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीने तिचे 'भावार्थदीपिके' रूपांतर केले. आपल्या विवेचनात त्यांनी जीवनावश्यक मूल्ये सांगितली, कर्मयोग — भक्तियोग सांगितला. ज्ञानेश्वरीत एकही विषय असा नाही की जो सागितला नाही. सुरुवातीलाच ते गणेशाच्या आराधनेने सुरुवात करतात

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या । जयजय स्वसंवेद्या आत्मरूपा ।
देवा तूचि गणेशु सकलार्थ मति प्रकाशु म्हणे निवृत्तिदासु अवधारी जो जी'।।

पहिल्या अध्यायातील या पहिल्याच ओवीतून माऊली गणेशाचे स्तवन करतात. गणेशाचे आत्मरूप प्रकट करतात. पण हे स्तवन करताना स्वतःला ते कोणी माठे समजत नाहीत. स्वतःला आपल्या गुरुंचा निवृत्तिनाथांचा दास समजतात. आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले असता. आपल्या ध्येयापर्यंत आपण सहज पोहचू शकतो.हे ज्ञानेश्वर महाराज नवव्या अध्यायात सांगतात —

तरी अवधान एकले दिजे । मग सर्वसुवासी पात्र होईजे ।।
हे प्रतिज्ञोत्तर माझे उघड ऐका ।।

हे सांगताना आपल्या श्रोत्यांना ते मानाचे स्थान देतात. श्रोत्यांना मान देऊन ते आपले कथन चालू करतात. ते म्हणतात,

का जे ललयांचे लले सरती । मनोरथांचे
मनोरथ पुरती
तरी माहेरे श्रीमंत होती तुम्हा ऐसी ।।

आज आपल्या समाजात धर्म आणि देव याविषयी काय संकल्पना आहेत ? कोणीही देव मानीत नाही त्याच्यात काहीही तथ्य. नसल्याचा दावा आज आमचे एकविसाव्या शतकातले स्वतःला विचारवंत, बुद्धिमान (?) समजणारे लोक करतात. त्यांना या ठिकाणी एवढेच सांगणे योग्य वाटते —

' कळो येईल अंतकाळी । प्राण प्रयाणचे
वेळी ।। '

नामदेव महाराज आपल्या एका अभंगात म्हणतात,

' काय सांगू देवा ज्ञानोबाची ख्याती । वेद
महिषामुखी बोलविले ।।

आणखी एका ठिकाणी म्हटले आहे,

"ज्ञानदेव बाळ माझा सांगे गीता भगवंता ।
लक्ष द्या हो विनविते मराठी मी त्याची
माता"

तर मराठी भाषेविषयी ज्ञानेश्वर महाराज अतिशय सार्थ अभिमानाने सांगतात,

'माझा मराठाची बोलू कवतुके । अमृतातेही
पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।।

ज्ञानेश्वरीचा हा अमृतकलश आपण वाचला पाहिजे—अनुभवला पाहिजे. 'न भूतो न भविष्यती' असा हा ग्रंथ आपल्या महाराष्ट्रात निर्माण झाला याचा अभिमान आपल्या मनात तेवत राहिला पाहिजे. आज जगभर ह्या ग्रंथाचा अभ्यास करत आहेत. आपण याची निश्चित जाणीव ठेवू.

ज्ञानेश्वरमाऊलींबाबत मी अल्पमतीने काय लिहावं ?

'नातरी बालक बोबडा बोली । वाकुडा
विचुका पाऊली।।
ते चीज करुनी माऊली । रिझे जेवी ।।'

या उक्तीप्रमाणे ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सप्तशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने माऊलींच्या आठवणी मनात दाटल्या म्हणून खटाटोप. ❑

## तो माझा ............

डोळयात अश्रू आले जेव्हा,
ते पुसायला तो जवळ होता तेव्हा.

ओठांवर हासू आले जेव्हा,
ते दाबायला तो जवळ होता तेव्हा.

गणिताचे पेपर मिळाले जेव्हा,
मार्क लपवायला तोच जवळ होता तेव्हा

हॉटेलात फिरायला गेलो जेव्हा,
माझ्याच जवळ बसला तो तेव्हा.

कसं सांगू तुम्हाला आता,
हरवलाय या जगात तो तेव्हा.

खरंच तो होता आणि माझाच होता,
कारण तो माझा ......... रुमाल होता.

**कांचन लोणकर,** अकरावी, कॉमर्स

# 'स्वर्ग–दारा'तील तारा : 'कुसुमाग्रज'

**मनस्विनी प्रभुणे**

तृतीय वर्ष, कला

गेली पन्नास वर्षे वि. वा. शिरवाडकर सातत्याने विविध प्रकारचे वाड्मय लेखन करीत आहेत व अजूनही त्यांचे लेखन चालू आहे. साहित्यविश्वात सर्वोच्च समजला जाणारा 'ज्ञानपीठ' पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. त्यांच्या साहित्याने त्यांना रसिकमान्य, लोकमान्य, समीक्षकमान्य केले. असे हे कुसुमाग्रज राष्ट्रीय स्तरावर त्यांचं नाव जाणार आहे.

'जीवनलहरी ते मुक्तायन' असा कुसुमाग्रजांचा काव्यप्रवास आहे. 'दूरचे दिवे' ते 'महंत' हा नाट्य प्रवास आहे. 'वैष्णव' ते 'कल्पनेच्या तीरावर' हा कादंबरी–प्रवास आहे. 'कल्याणात पेशवाई' ते 'दिवाणी दावा' हा एकांकिका प्रवास आहे. 'आहे आणि नाही' पासून 'रूपरेषा' पर्यंतचा मुक्तगद्याचा प्रवास आहे. इतकी विपुल निर्मिती गेल्या पाच दशकात शिरवाडकरांनी केली. त्यांच्या कवितांप्रमाणेच त्यांची नाटकेही गाजलेली आहेत.

आकाशाला जीव लावणाऱ्या, प्रकाशाचे वेड असणाऱ्या या कवीचे नाव आता एका ताऱ्याला देणार आहे. स्वित्झर्लंडमधील 'इंटरनॅशनल स्टार रजिस्ट्री' या ख्यातनाम अंतरराष्ट्रीय संस्थेने कुसुमाग्रजांच्या ८५व्या वाढदिवसानिमित्त या गौरवाची घोषणा केली. ज्या ताऱ्याला नाव दिलं जाणार आहे, तो 'स्वर्ग–दारा'तील तारा 'स्टार इन द गेट ऑफ द हेवन्स' म्हणून ओळखला जातो.

'युगा मागुनी चालली रे युगे ही,
करावी किती भास्करा वंचना,
किती काळ कक्षेत राहू तुझ्या मी,
कितीदा करू प्रीतीची याचना.

'पृथ्वी' रूपी प्रेयसीचे तिच्या 'सूर्य' रूपी प्रियकराबद्दलचे विचार 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत कुसुमाग्रज मांडतात. प्रतीक्षेतील अधीरता आणि तारुण्यातील चंचलता, प्रियकराकडे डोळे लावून बसलेली मनस्वी 'पृथ्वी' आणि दाहक तेजाचा पुतळा 'सूर्य' यांच्या अभोगी प्रीतीची अपुरी प्रेमकहाणी कुसुमाग्रज गुंफतात.

कुसुमाग्रजांना आकाश हाच जवळचा मित्र, सोबती वाटतो. कारण आकाशाजवळ शांती, वत्सलता, आनंद असतो. त्याच्याजवळ आपल्या अंतःकरणातल्या व्यथांची काळी गाठोडी घेऊन जाता येते आणि आपल्या मनातले गूढ आपण त्याला सांगितले तर तो त्याची वाच्यता कुठेही करीत नाही. त्याच्या अंधाराइतकीच तो गूढता पाळतो.

असा सन्मान मिळाल्याने एका कवीचा, साहित्यिकाचा सन्मान झाला आहे. एखाद्या ताऱ्याला कवीचे नाव देण्याचा प्रकार प्रथमच घडत आहे. कवी चंद्र–सूर्य–तारे यांच्यावर प्रेम करीत असतो, त्यांच्यात रमतो. पण त्याच कवीचे नाव 'अशा प्रकारे 'ताऱ्याला' दिले जावे हे विशेष.

'नक्षत्रापरि असीम नीलामध्ये संचारावे
दिशांचे आम्हाला धाम'

असं म्हणून कुसुमाग्रज आकाशात वावरण्याची इच्छाही प्रकट करतात. ही त्यांची इच्छा आता त्यांच्या नावाचा तारा पूर्ण करणार आहे.

'अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञात मी एक धुळीकण.

अलंकारण्याला परी पाय तुझे
धुळीचेच आहे मला भूषणे ।

स्वतःकडे कमीपणा घेऊन सूर्याचा अमर्यादपणा, थोरवी मान्य करतात. आकाशात झेप घेऊन ग्रह—ताऱ्यांमध्ये रमून जाणारे शिवरवाडकर जमिनीशी असणारे नाते विसरत नाहीत.

चांदणं मातीतलं । चांदणं पाण्यातलं ।
चांदणं रानातलं । पाखरांच्या गाण्यातलं ।
कळसावर चढणारं । शिरदथांवर लोळणारं ।
एकाकी सरणाच्या । ज्वालांवर जळणारं ।।

तर आकाशातील चांदण्यालाच जमिनीवर आणून सोडतात. चांदण्यांनी त्यांना इतकं व्यापून टाकलं आहे की, त्यांना जमिनीवर सर्वत्र चांदणं दिसतं आहे. प्रत्येक गोष्टीत दिसत आहे.

चिंब चिंब भिजतो आहे
भिजता भिजता मातीमध्ये
पुन्हा एकदा रूजतो आहे.
किंवा
मातीपण मिटता मिटत नाही,
आकाशपण हटता हटत नाही ।
आकाश—मातीच्या या संघर्षात
माझं जखमांचं देणं फिटता फिटत नाही !

माती आणि आकाशाचं नातं, कुसुमाग्रजांची मानसिकता यातून प्रकट होते. मातीप्रमाणेच स्वतःला निर्मितीक्षम मानत आहेत. आकाश—मातीच्या संघर्षात 'मी' च्या जखमांचे देणे फिटले जात नाही याची हुरहुर कुसुमाग्रज व्यक्त करतात.

प्रेमभावना, जीवनातील विरोध नाट्य,सामाजिक जीवनातील असंतोष, निसर्गाचे मानुषीकरण, आकाश आणि माती यांच्या नात्याचा शोध कुसुमाग्रजांच्या कवितेतून दिसतो. 'जीवनलहरी'पासून जीवनाची साथसंगत घेणारी कुसुमाग्रजांची कविता 'मुक्तायन'मध्ये मुक्त होऊ बघते आहे. मोकळी होऊ बघते आहे. एकाकीपणाचा, उदासीपणाचा सूर लावीत आहे. ही उदासी व्यक्तिगत पातळीवरची जशी असते, तशीच सामाजिक पातळीवरचीही असते.

'विशाखा' हे नक्षत्र असे शांत प्रकाश देणारे आहे. तशाचं कुसुमाग्रजांच्या कविता आहेत. क्रांतीचा जयजयकार करणारी, स्वातंत्र्याचा जयघोष करणारी, तर 'काढ सखे गळ्यातले चांदण्यांचे तुझे हात' असं प्रेयसीला समजावून सांगण्याचा प्रयत्न करणारी आहे. 'चांदण्यांचे हात' असलेली. 'पृथ्वीचे प्रेमगीत' गाणारी आहे. कुसुमाग्रजांची कविता आपल्याला कायम प्रोत्साहन, आनंद देत आली आहे आणि आता 'स्वर्ग—दारा'तील ताऱ्याच्या रूपाने कुसुमाग्रजही त्या अनेक नक्षत्रांच्या, तारकांच्या समूहात चमकत राहणार आहेत, आपला स्निग्ध शीतल प्रकाश सर्वांना देत. नक्षत्रांशी, आकाशाशी नाते सांगणारे कुसुमाग्रज म्हणतात.

कोणाला शंका असेल
पण मला निश्चित माहीत आहे
की माझे नाते
नऊ नक्षत्रांच्या मध्यावर
त्यांना आधार
आणि प्रकाश देत असलेल्या
त्या वैश्विक जाळाशी
सूर्याशी आहे........

कुसुमाग्रजांच्या ८५व्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'इंटरनॅशनल स्टार रजिस्ट्रीने' कुसुमाग्रजांच्या बरोबर रसिकांनाही एक अनोळखी भेट दिली आहे. जी कायम स्मरणात राहण्यासारखी आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेप्रमाणे दृश्य, गोचर रूपाने. ❑

# सी. डी. : एक असामान्य

**निवेदिता देशमुख**
प्रथम वर्ष, कला

सन १९१२ सालची घटना. त्या वेळी शिक्षणाच्या फारशा सोयी नसलेल्या 'अलिबाग' या आडगावातली काही मुले खेळत होती. तेवढ्यात एका मुलाने धावत येऊन शालांन्त परीक्षेचा निकाल लागला अशी बातमी सांगितली. खेळणाऱ्या एका मुलाने विचारले, "दुसरा क्रमांक कोणाचा आला ?" उत्तर देणाऱ्याने नाव सांगून विचारले, " पहिल्या क्रमांकावर कोण आहे ते नाही विचारलेस ? " त्या वेळी खेळणारा मुलगा उत्तरला, "पहिला क्रमांक माझाच असणार." इतके आत्मविश्वासपूर्वक उत्तर देणाऱ्या मुलाचे नाव होते चिंतामणी द्वारकानाथ देशमुख. ज्यांनी पुढे संसद गाजवली ते डॉ. सी. डी. देशमुख.

डॉ. चिंतामणराव देशमुख हे शाळा महाविद्यालयातच पहिले आले असे नाही, तर रिझर्व बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर होते आणि सर्वात विशेष म्हणजे मुंबई केंद्रशासित करण्याच्या महाराष्ट्रावर घोर अन्याय करणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या निर्णयावर तडकाफडकी राजीनामा देणारे ते पहिले अर्थमंत्री होते.

आयसीएस झाल्यानंतर इंग्लंडमध्ये लोकमान्य टिळकांना भेटून देशकार्य करण्याची इच्छा बाळगणाऱ्या डॉ. देशमुखांना लोकमान्यांनी 'आयसीएस्' झाला आहात; तर प्रशासनातच राहा. देश स्वतंत्र झाल्यावर तुमची गरज अधिक आहे असा सल्ला दिला आणि डॉ. देशमुख प्रशासनात आपल्या कर्तृत्वाने चमकले. त्यासाठी त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कारही मिळाला. रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर म्हणून त्यांनी अर्थकारणाला दिशा दिली. आयुर्विम्याचे राष्ट्रीयकरण करून त्या क्षेत्रात सुसूत्रता आणली. देशाचे अर्थमंत्री म्हणून पंचवार्षिक योजनांचा पाया घातला.

डॉ. देशमुखांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आपल्या स्थानाचा—अधिकाराचा फायदा त्यांनी जवळच्या माणसांना कधीही मिळवून दिला नाही. आजच्या युगात हे विचित्र वाटेल; पण दुरान्वयानेही कोणी फायदा घेऊ नये याबाबत ते जागरूक होते. कधी कधी याचा अतिरेक होई; पण देशमुख स्वतःच्या भूमिकेवर ठाम असत.

आज सर्व क्षेत्रात मूल्यांची घसरण चालू आहे. राजकारण तर जास्तच. देशमुखांचे राजकारण नेकीचे होते. निवडून येण्यावर त्यांचा कटाक्ष होता. उच्चपदस्थांनी मूल्ये जपली पाहिजेत असा आग्रह होता. म्हणूनच १९५६ साली श्रीमती इंदिरा गांधी या पक्षाध्यक्षा असताना 'उटकमंडच्या' कॉंग्रेस अधिवेशनात त्यांनी समाजवादी समाजरचनेबरोबर मूल्याधारित राजकारणाचा आग्रह धरला.

दृष्टी नोहे मिणधी
बोलणे नाही संदिग्धी ।।

असे ज्यांचे योग्य प्रकारे वर्णन करता येईल असे देशमुखांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यात विद्वत्ता व तत्त्वनिष्ठेचा

अजोड संगम होता. सीमाप्रश्नी त्यांनी जो तडकाफडकी राजीनामा दिला, त्या वेळी केलेल्या भाषणाने सर्व देश ढवळून निघाला होता. लोकांना वाटत होते की विनयशील डॉ. देशमुख संस्कृत सुभाषितयुक्त गुळगुळीत भाषण करून निघून जातील; परंतु एरवी कुसुमासारखा मृदू असणारा हा माणूस अन्यायाविरोधी कसा 'वज्रादपि कठोराणि' होऊ शकतो हेच त्या भाषणाने दाखवले. पट्टीचे संसदपटू व उत्कृष्ट भाषणांबद्दल आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या पं. नेहरूंचे उत्तराचे भाषण आयुष्यात प्रथमच अगदी निष्प्रभ झाले. २५ जुलै १९५६ रोजी देशमुखांचा राजीनामा स्वीकारला. त्यांच्या कार्याची फारशी दखल घेतली गेली नाही. परंतु भारतीय जनतेने मात्र त्यांना डोक्यावर घेतले.

विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष म्हणून मद्रास विद्यापीठात केलेल्या भाषणात राजकारणातील भ्रष्टाचार, दुराचार, वशिलेबाजी याबद्दल उच्चपदस्थांवर त्यांनी जोरदार टीका केली. उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराचे पुरावे मिळणे कठीण असते. पण याचा अर्थ ते शुद्ध आहेत असा होत नाही, असे सांगताना केंद्रिय मंत्र्यावरील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी एखादी समिती किंवा न्यायालयीन आयोग अशी एखादी स्थायी यंत्रणा असावी असे देशमुख यांनी सुचविले होते. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीही या सूचनेचे स्वागत केले. सी. डी. देशमुखांच्या सूचनेप्रमाणे केंद्रिय मंत्र्यांचे भ्रष्टाचाराची कायम यंत्रणा असती तर सर्वोच्च न्यायालयाला आज हवाला प्रकरणाचा पाठपुरवठा करण्याची गरज पडली नसती. देशमुखांच्या द्रष्टेपणाचे हे उत्तम उदाहरण होय.

पण आज १९९६ साली, सी. डी. अपेक्षित अशा मूल्याधिष्ठित स्वच्छ राजकारणाचा ऱ्हास झाला आहे. ज्यांच्यामुळे आज मुंबई महाराष्ट्रात आहे, त्या धडाडीच्या व्यक्तीची, त्यांच्या कार्याची आज त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षीही बूज राखली जात नाही ही खेदाची गोष्ट आहे.

ज्या महाराष्ट्राच्या प्रेमापोटी सी. डीं.नी राजीनामा दिला, त्याच महाराष्ट्रातील युवा पिढी आज 'आता हे सी. डी. कोण ?' असा प्रश्न विचारते! ही गोष्ट अत्यंत गंभीरपणे घेण्यासारखी आहे. सी. डीं.चा करारीपणा, सत्यप्रियता अंगी बाळगण्याचा प्रयत्न करणे हेच त्यांच्या स्मृतीला खरेखुरे अभिवादन ठरेल. ❐

## भांडण

नवरा व बायकोचं रात्री जोरदार भांडण झालं. ती नवऱ्याला म्हणाली,

"या घरात आहे तरी काय तुमचं ? फर्निचर, दागिने, कपडे, भांडी वगैरे सर्व काही मला माझ्या वडिलांकडून मिळाले आहे."

रात्र झाल्याने नवरा मुकाट्याने झोपी गेला. परंतु दुर्दैवाने पहाटेच्या सुमारास घरात चोर शिरले. बायकोने नवऱ्याला जागे केले. पण तो म्हणाला, "या घरात चोरण्यासारखे माझे काय आहे, सर्व काही तुझंच आहे ना ? मग तुझं तू बघ!" असे म्हणत तो चादर ओढून शांतपणे झोपी गेला.

**मिनाक्षी माने,** अकरावी, कला

# जीवन आणि माणूस

**अजित गाढवे**
प्रथम वर्ष, वाणिज्य

"जिंदगी का सफर है ये कैसा सफर
कोई समझा नहीं कोई जाना नहीं"

खरंच, जीवन म्हणजे काय ? किंवा जगणे म्हणजे काय ? याबद्दल कधी तुम्ही किंवा इतर कुणी तरी विचार केला आहे काय ? जीवन म्हणजे काय हे जाणण्याचा प्रयत्न कधी कोणी केला आहे काय ? पण माझ्या मनात मात्र असा विचार येतो की जीवन म्हणजे काय ? जगणे म्हणजे काय ? किंवा आयुष्य म्हणजे काय ?

जिवंत असणे म्हणजे काय फक्त त्या प्राण्याचे किंवा माणसाचे हृदयाचे स्पंदन चालू असणे किंवा त्याच्या शरीराची हालचाल होणे एवढेच ? रोज उठून आपली नित्यकर्मे करणे, कामावर जाणे किंवा उद्योगधंदा करणे व दिवस मावळल्यावर घरी येणे ? दुसऱ्या दिवशी पुन्हा रोजच्याप्रमाणे करणे म्हणजे जीवन जगणे ? असेच कायम करीत राहणे. यालाच आयुष्य जगणे म्हणतात का ?......वाचून विचारात पडलात ना ? सहाजिकच आहे, असा विचार कधी चुकूनही तुमच्या डोक्यात आला नसेल ना ! .....

तसे पाहता जीवनाचे सागर अथवा समुद्र हे प्रतिक आहे. कसे ? ..... नाही ना लक्षात येत. जीवन म्हणजे एक सागर आहे. सागरात जशा लाटा निर्माण होतात, त्या लाटांचे एकच ध्येय असते व ते म्हणजे किनाऱ्याला जाऊन मिळणे व तेथेच अंतर्धान पावणे. तसेच या जीवनरूपी सागरात उद्या काय होईल याची जिज्ञासा, आशारूपी लाटांचे तरंग उठतात. त्या किनाऱ्यावर येऊन विलीन होतात. याचा अर्थ उद्या काय होणार याची आशा धरून चालणारे तो दिवस उजाडल्यापासून मावळेपर्यंत. त्याकडे जिज्ञासू वृत्तीने पाहतात. तरी त्यांच्या समोर एक प्रश्न असतोच. तो म्हणजे 'उद्या काय होणार' ? अशा या जीवनरूपी सागरात आपल्याला एक 'नाव' दिसते. ती असते अनुभवाची. अनुभव माणसाचा सर्वात मोठा गुरू ! ही अनुभवाची नाव जीवनरूपी सागरात उठणाऱ्या लाटा, ज्या 'आज' गोष्टी घडतात त्यापासून मिळणाऱ्या सुखदुःखाच्या तरंगावर हेलकावे, हिंदोळे घेत पुन्हा उद्याच्या आशेवर किनारारूपी ध्येयाकडे—वाटचाल करीत आपला मार्ग आक्रमित असते.

अशी ही अनुभवाची नाव—शिदोरी घेऊन, माणूस उद्याच्या आशेवर जगतो, जगत आहे आणि जगत राहील. जर उद्याची आशा, पुढे घडणाऱ्या गोष्टींबद्दलची माणसाच्या मनात जिज्ञासा नसेल, तर त्याचे जीवन व्यर्थ आहे. निसर्गाने किंवा देवाने आपल्याला हा मानवाचा जन्म दिला, हा व्यर्थ घालविण्यासाठी नव्हे.

'जिंदगी कैसी है पहेली हाऽऽऽऽऽए
कभी ये हसाएँ कभी ये रूलाएँ"

जीवनरूपी कोडे सोडविण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करतो. जे यशस्वी होतात ते पुढे जातात. जे

अपयशी होऊन खचून जातात व आत्महत्येसारखा पर्याय निवडतात त्यांच्यासारखे दुर्दैवी तेच! ठीक आहे. आत्महत्या करण्यास धाडस लागते. त्यापेक्षा अनुभवाच्या जोरावर दुःखांना सामोरे जाण्याच्या धाडसापेक्षा श्रेष्ठ नाही.

धाडसाबरोबर आत्मविश्वासासही आयुष्यात महत्त्व आहे. अनुभव माणसाचा गुरू तर आत्मविश्वास हा माणसाचा मित्र आहे. कुठलीही गोष्ट करण्यासाठी माणूस इतरांना विचारण्याअगोदर स्वतःच्या मनाला विचारतो. त्याचा आत्मविश्वास त्याचे सामर्थ्य वाढवतो. या सामर्थ्याच्या बळावर माणूस काहीही करू शकतो.

आपल्या आयुष्यात अशा काही घडामोडी होतात की त्यांना विसरणे आपल्याला अशक्य असते. ते सुखाचे किंवा दुःखाचे क्षण निघून गेले तरी त्यांच्या आठवणी कायम आपल्या मनात घर करून बसतात. जखमा भरल्या तरी त्याचे व्रण तसेच राहतात. असेच माणसाच्या मनाचे असते. आपल्याला मिळालेल्या दुःखाचे शल्य कायम त्याला टोचत राहते. अशा दुःखाच्या प्रसंगी माणसाला संयमाने वागावे लागते. कारण तो जे काही बोलतो किंवा वागतो त्याच्यातून निष्पन्न होणाऱ्या परिणामांना त्याला सामोरे जावे लागते; पण वेळ गेल्यावर तो काही करू शकत नाही.

"जिंदगी के सफर में गुजर जाते है जो मकाम
वो फिर नहीं आते वो फिर नहीं आते."

आयुष्याकडे नेहमी जिज्ञासू व खेळकर वृत्तीने पाहिले पाहिजे. मानवाच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक क्षणाकडे जिज्ञासू वृत्तीने पाहणे, ते क्षण व्यतित करणे, ही मानवी वृत्ती ज्या माणसात असेल, त्या माणसाने त्या क्षणाचा पूर्ण आस्वाद घेतला हे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. येणारा प्रत्येक क्षण माणसाने जसा जिज्ञासूपणे आस्वाद घेतला, तसेच येणाऱ्या क्षणाबरोबर दुःखाला त्याने खेळकर वृत्तीने स्वीकारल्यास, तो माणूस सर्वात नशीबवान माणूस ठरेल. म्हणजेच असे सांगता येईल,

"जिंदगी हसने गाने के लिए है पल दो पल."

शेवटी जीवनात कधी, कुठे, कसे, काय होईल हे कोणाला सांगता येत नाही. जीवनाचे व माणसाचे अतूट असे नाते आहे. असे वाटते की जीवन व माणूस यांना एकमेकांसाठीच निर्माण केले आहे. हे शब्द एकमेकांशिवाय अपूर्ण वाटतात. जीवन हा माणसाचा एक प्रकारचा प्रवास आहे. या प्रवासात सुख—दुःखरूपी प्रवास त्याच्या मृत्यूबरोबरच संपतो. तरी तो जीवन म्हणजे काय हे कोडे सोडवतच राहतो व सोडवतच राहील !......

ये जीवन है, इस जीवन का
यही है, यही है यही है रंगरूप
थोडा गम है थोडी खुशियाँ
यही है, यही है छाँव—धूप. ☐

## आजाराचे औषध

पेशंट : डॉक्टर, माझे पोट खूप दुखत आहे.
डॉक्टर : कधीपासून दुखत आहे ?
पेशंट : शेजाऱ्यांनी फ्रिज आणल्यापासून

**अनिता वैरागर**
प्रथम वर्ष कला

# मानवाचे भवितव्य एक मुक्तचिंतन

**वैशाली जाधव**
द्वितीय वर्ष, शास्त्र

आजकाल प्रत्येकाचे जीवन संघर्षमय झालेले आहे. ज्या वाईट विचारांमुळे रामायण, महाभारत घडले किंवा जागतिक महायुद्धे झाली, त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रश्न आहे तो चालू समस्यांचा, त्यांच्या मागील कारणमीमांसांचा आणि त्या सोडवण्यासाठी योग्य मार्गदर्शनाचा. सध्या प्रत्येकजण स्वतःच्या समस्या सोडवण्यात इतका गर्क झाला आहे की त्या न सुटल्यामुळे तो नैराश्याकडे झुकू लागला आहे.

आज आर्थिक क्षेत्रात भ्रष्टाचाराचे स्तोम फारच माजले आहे. जीवनावश्यक वस्तू कोट्यवधी रुपये मोजून तिचा मन मानेल तसा बाजार सुरू आहे. मानवातील माणुसकी कवडीमोल ठरवून, मानवाचे पैशात मूल्यमापन सुरू आहे. विश्वातील सर्व उपभोग्य वस्तू, गुण व अवगुण, सद्गुण हे सर्व पैशाने विकत घेऊ शकतात. इतकेच काय पण पवित्र मंदिरातसुद्धा जास्त पैसे दिले की देवसुद्धा पैसेवाल्यांना आधी भेटतो. सर्वच क्षेत्रात पैसा या संस्कृतीची अराजकता माजली आहे. मनुष्यप्राणी फार मोठ्या संख्येने या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पशूवत जीवन जगतो आहे. फक्त पोट भरणे हा उद्देश आज ८०टक्के मानवी जातीपुढे आहे. जिथे आपल्या ताटातील घास दुसऱ्याला देणे ही संस्कृती आहे, तिथेच एकाने मिळवायचे व दहा जणांनी ते खायचे या ऐवजी, दहांनी मिळवायचे व दहांनी कसेतरी खायचे. पण त्यात आणखी एका भुकेलेल्यालासुद्धा सामावून घेऊ शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रगत विज्ञान, विविध सुविधा, हजारो साधने उपलब्ध असूनसुद्धा जीवनसंघर्षात प्रचंड विषमता निर्माण झाली आहे व त्यासाठी अनेक वाद, शक्ती, सत्ता, महासत्ता यांच्यात स्पर्धात्मक चढाओढ सुरू आहे. ही चढाओढ आजची नाही तर परंपरागत रीतीने चालत आलेली असून त्यामध्ये तीव्र जीवन कलहात लढणारे राम, कृष्ण, पैगंबर, ख्रिस्त इ.सारखे सदाचारी दिसतात. तर दुसऱ्या बाजूला अंतर्गत यादवीत स्वतःचा विनाश करणारे कौरव–पांडव किंवा अनेक यदुवंशीय जगात दिसून येतात.

लोकांमधील सामाजिक भावना, सहजीवन, धैर्य, शौर्य, पराक्रम, दया, माणुसकी हे सर्व सद्गुण जाऊन व्यभिचारी वागणे, प्रचंड अहंपणा, लाचारी, भ्रष्टाचार, अनीती यांची प्रचंड प्रमाणावर वाढ झालेली आहे. सामान्य माणसाला जेथे मानवी जीवनाचे आदर्श धडे संतजनांनी शिकविले होते, तेथे भ्रमाचे मायाजाल, बनवाबनवी, व्यसनाधिनता, खोट्या प्रतिष्ठा व वेगाची नशा फार जोराने वाढत आहे. मोटारसायकल, कार, ट्रक चालविताना वेगाचे वाढते प्रमाण, मनाचा वेग व वाहनाचा वेग यांची चढाओढ सुरू आहे.

या सर्व समस्यांचे निराकारण ही अचानक घडणारी क्रांती नसून ती हळूहळू घडणारी उत्क्रांती असून, ती होणे ही एक काळाची गरज आहे. नाहीतर ह्याच समस्या २१व्या शतकातील आव्हाने बनून आपल्यापुढे उभ्या राहतील. या उत्क्रांतीसाठी सर्वांच्याच प्रयत्नांची गरज आहे. आपण सर्वजण एकत्र आलो तर विश्व ऐक्याची कल्पना प्रत्यक्षात येईल आणि जीवन –संघर्षाच्या अंधारात विश्वशांतीरूपी प्रकाशाचा मार्ग सापडेल. ❐

# देवमाणूस

**राहुल बोरकर**
तृतीय वर्ष, शास्त्र

सकाळचा तो अंक वाचला अन् मन सुन्न झालं. 'राठी कुटुंबातल्या सात जणांची हत्या', माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य होते. निर्दयी मारेकऱ्यांनी निरागस मुलांनाही ठार केलं होतं. त्यांना तर त्यांचे आई–बाबा एवढंच विश्व! त्यांनाही सोडलं नव्हतं.

वाचून अतिशय वाईट वाटलं. कलियुग कलियुग म्हणतात ते हेच का ? कुणा माणसात माणुसकी, दया, प्रेम, शांती नाही का ? मग आपल्या मनुष्य जन्माचा काय उपयोग ? सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे मिळत असतानाच, अचानक आठवण झाली ती आम्हाला भेटलेल्या देवमाणसाची ! या प्रसंगाने असे वाटलं की आजही काही देवमाणसं आहेत, त्यामुळे आपण सर्वजण टिकून आहोत.

७ डिसेंबर १९८० चा दिवस होता तो! त्या वेळेस मी ५–६ वर्षाचा असेन. मी, माझे आईबाबा, आजी (वडिलांची आई),आत्या काशीयात्रेला गेलो होतो. २१ दिवसांची 'यात्रा–ट्रेन' होती. २१ दिवस ट्रेनमध्येच. आम्ही सर्व यात्रेकरू एका कुटुंबासारखेच झालो होतो. तिथे कुठली जात, धर्म ? त्याचा विचार कुणाच्या मनातसुद्धा नव्हता. वेगवेगळ्या धर्माचे लोकही होते आमच्याबरोबर. बघता बघता दिवस संपले. आमची अनेक शहरे, प्रेक्षणीय स्थळे बघून झाली. परतीचा प्रवास सुरू झाला.

७ डिसेंबर रात्री ११ वाजण्याचा सुमार! आम्ही पत्ते खेळत होतो. काहीजण झोपले होते. इतक्यात आमच्या आजीला हार्ट–ॲटॅक आला अन् पुढच्याच क्षणी तिने आपली जीवनयात्रा संपविली. झालं! सर्वत्र गोंधळ. आई, आत्या रडू लागल्या. बाबाही सुन्न झाले. आम्ही गार्डला बोलावले. आमच्या यात्रा कंपनीचा व्यवस्थापकही बरोबर होता. सर्वांच्या मते अजून पुण्याला जायला २ दिवस लागणार होते. तोवर डेडबॉडीबरोबर कसे राहणार ? यावर असा तोडगा काढण्यात आला. आम्हाला मध्येच 'रतलाम स्टेशनवर' खाली उतरविले. आम्ही आत्याला इतर सर्व नातेवाइकांना कळविण्यासाठी पुण्याला पाठवून दिले.

रात्रीचे १२ वाजले. गाडी निघून गेली होती. मी, आई–बाबा व आजीची डेडबॉडी ! बापरे ! अनोळखी स्टेशन, शहर, कोणीही ओळखीचं नाही. निम्मेअधिक स्टेशन अंधारात बुडालेलं. मधूनच कुत्र्याचं ओरडणं. वारा सुटलेला. मी व आई घाबरलेलो. बाबा एकटे (बरोबर २ बॅगा). चोरांची भीती. एकवेळ मला त्या वयात पाहिलेले प्रेक्षणीय स्थळे (ताजमहल व इतर .....) व शहरे आठवणार नाहीत; पण हा प्रसंग अगदी जसाच्या तसा आठवतोय.

'रात्र तर या इथे काढता येणार नाही' बाबा आम्हाला सांगून अगदी जवळपास काही सोय होते का ते पहायला गेले. मी व आई एका दिव्याखाली उभे राहिलो, समोरच आजीची डेडबॉडी, छे! मला परत रडू कोसळलं ! आईने समजावलं मला. इतक्यात एक चिचुंद्री आजीच्या डेडबॉडीपाशी फिरू लागली. आम्हाला बघवेना. आईने कसेबसे तिला हाकलले.

बराच वेळ झाला होता. बाबांचाही पत्ता

नव्हता. इतक्यात आमचे लक्ष लांबून येणाऱ्या टॉर्चच्या प्रकाशाकडे गेले. तो आमच्याच दिशेने येत होता. कोण असावं ? मनात अनेक प्रश्न. आई एकटीच. मी लहान. एव्हाना ती व्यक्ती समोर आली. एक उतार वयाचा माणूस होता तो. वय सुमारे ५०—५५ असेल. ते होते त्या स्टेशनचे माजी स्टेशनमास्तर श्री. भट. त्यांना सर्व प्रकार कळला होता.

" हे बघा, तुम्ही दोघेही माझ्या घरी चला. ही डेडबॉडी इथेच राहू दे. मी माझा माणूस इथे ठेवतो. तुमचे मिस्टर आले की त्यांना तो माझ्याकडे घेऊन येईल. मग आम्ही पुढचे ठरवू." त्यांनी आईला अतिशय मृदू शब्दात धीर दिला.

आम्ही त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या मुलाने व पत्नीने आमच्या राहण्याची सोय केली. थोड्या वेळाने श्री. भट बाबांनाही घेऊन आले. रात्र कशीबशी पार पडली.

दुसऱ्या दिवशी आम्ही आजीवर योग्य प्रकारे अंत्यसंस्कार केले कालपर्यंत माझ्याशी बोलणारी आजी, बाबांना लहानाचा मोठं करणारी आई.......आम्हाला सोडून गेली होती. त्यांना रडताना पाहून माझाही धीर सुटला. भट आजोबा व आजी त्यांनी आम्हाला खूप धीर दिला. आमचे सांत्वन केले. त्यांच्या मुलाने मला 'रडू नको' वगैरे प्रेमळपणे समजूत घातली.

दोन दिवस उलटले. आम्ही पुण्यास परत यायला निघालो. ते तिघेही आम्हाला सोडवायला स्टेशनवर आले होते. मला जास्त कळतही नव्हतं. पण आई—बाबा दोघेही त्या दांपत्याच्या पाया पडले. त्या २—३ दिवसात त्यांनी आम्हाला सर्व प्रकारची अगदी खाण्यापासून ते राहण्यापर्यंतची मदत केली होती. अगदी देवदूत/ देवमाणूस बनून अगदी योग्य वेळी ते आमच्या मदतीला धावले होते.

कुठल्या शब्दांत त्यांचे आभार मानायचे ? आम्ही त्यांचे कोण ? पण तरीही त्यांनी आम्हाला मदत केली होती. थँक्स, धन्यवाद, भेटवस्तू इ. शुल्लक गोष्टीं पलीकडे होते. ते कसे फेडायचे ? आजतागायत आम्ही हा प्रसंग स्मरणांत ठेवून आहोत. जेव्हा असा विषय निघतो, तेव्हा आमच्यापैकी प्रत्येकजण हा प्रसंग इतरांना सांगतो.

आज रोजच्या कामाच्या, धकाधकीच्या जीवनात व दूर असल्यामुळे भट कुटुंबियांशी पाहिजे तेवढा संपर्क राहिला नाहीय; पण तरीही त्यांची आठवण आमच्या स्मरणात आहे.

सध्याच्या कलियुगात श्री. भटांसारखी देवमाणसं समाजात आहेत हे आठवून मनाला दिलासा मिळतो. ❑

## आसवांनो तुम्ही

आसवांनो तुम्ही मज काय पुसता ?
काय सांगू तुम्हा मी, उत्तर नसता.

मज जग हे सुंदर भासत होते,
कुरूपता त्याची मी जाणीत नव्हते.

जे दिसते, असते ते खोटे सारे,
लावुनि फिरती सगळे चेहऱ्यावर चेहरे.

पदोपदी इथे सदैव वचने,
सत्याचे तर इथे सदैव उणे.

असते खोटी मधाळ वाणी,
बोल असती अळवावरचे पाणी.

गरीबाला इथे अन्न मिळेना,
गोळीविना कुबेरा झोप येईना.

सुखशांतीचा जिथे ठाव न लागे,
जगात असल्या व्यर्थ जगणे.

**सुनंदा कोतवाल**, द्वितीय वर्ष, वाणिज्य

# एक अविस्मरणीय घटना

**लीना घोडेकर**
तृतीय वर्ष, वाणिज्य

२७ डिसेंबर १९९४. मंगळवार! आम्ही सर्वजण उरुळीकांचनहून आनंदाने आदल्या दिवशीच्या सगळ्या चांगल्या आठवणी लक्षात घेत संध्याकाळी रिक्षानं घराकडे निघालो. आम्ही जेमतेम ७—८ कि.मी. अंतरावर पोहोचलो असू. तेवढ्यात एक ट्रक वेगाने दुसऱ्या गाडीला ओव्हरटेक करीत आमच्या दिशेने समोरून आला. आणि काही कळायच्या आतच आमच्या रिक्षाला जोरदार धडक बसली. सगळं काही क्षणार्धात घडलं. डोळ्यांची पापणी लवते न लवते तोच बाबांची एक पुसटशी किंकाळी ऐकू आली. आणि तिथेच आमचं सारं काही संपलं! तो बाबांचा शेवटचा आवाज ठरला.

धडक बसली त्या मांजरी फार्मपाशी आम्हाला मदत मिळेल असं एकही साधन उपलब्ध नव्हतं. सुदैवाने दादा व मी बाहेर फेकले गेल्यामुळे बचावलो. पण आईबाबा गाडीतच अडकले गेले व बेशुद्ध झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आम्ही हडपसरच्या रुग्णालयात जायचे ठरविले. दादा व मी खूपच घाबरलेल्या मनःस्थितीत होतो ! पुढे काय होणार याचं एक मोठं प्रश्नचिन्ह आमच्यासमोर होतं !

अशातच आम्हाला नजीकच्या पोलिस चौकीत जाब द्यायला अर्धा तास थांबावं लागलं. आम्हाला रुग्णालयात जायला आणखीनच उशीर होत होता. पण दुसरा मार्ग नव्हता.

आम्ही तासाभरांनी हडपसरच्या खासगी रुग्णालयात पोहोचलो. तेथील डॉक्टरांना घडलेली घटना सांगितली व त्यांना आई—बाबांना तपासण्याची विनंती केली. त्यांनी तेव्हाच ते दोघेही हयात नसल्याचं कळवलं. पण माझं मन हे सत्य स्वीकारायला तयार नव्हतं.

मी लगेच फोन करून हा प्रकार मामाला सांगितला. त्याने मला धीर दिला. मला काळजी वाटत होती. पण भीती वाटत नव्हती. मला आत्मविश्वास होता की आपण आई—बाबांना वाचवू.

हडपसरच्या स्थानिक डॉक्टरांनी कुठल्याही मदतीला साफ नकार दिला. त्यामुळे आम्हाला ससून रुग्णालयात जाणं जरुरीचं होते. त्यासाठी आम्ही रुग्णवाहिका मागविली. रुग्णवाहिका येईपर्यंत आम्हाला आई—बाबांना त्याच (बेशुद्ध/मृत) अवस्थेत हडपसरमधील रुग्णालयाच्या बाहेरील आवारात ठेवावं लागलं.

रात्री आठच्या सुमारास रुग्णवाहिका मिळाल्यावर दादा व मी त्या दोघांना घेऊन ससूनला जायला निघालो. आई—बाबांना आम्ही अशा अंत्यअवस्थेत आम्ही बघत होतो. ३—४ तासांपूर्वीचे चेहऱ्यावरचे हास्य पूर्णतः निमाले होते. त्याची जागा मानसिक दडपणाने घेतली होती.

ससूनच्या बाह्य रुग्ण विभागात जायला रात्रीचे नऊ वाजले. आम्ही पोहोचेपर्यंत सर्व शेजारी आमच्या मदतीसाठी आले होते. मला थोडा मार लागल्यामुळे तेथील विभागात विश्रांतीसाठी ठेवले. मला जाग आली ती रात्रीचे दोन वाजता, पोलिसांच्या पंचनाम्याच्या वेळेस. आई—बाबांचा भूतकाळी उल्लेख होत होता यावरूनच

मला परिस्थितीची खरी जाणीव झाली. डोळ्यातून अश्रूदेखील येईनात. मन सुन्न झालं !

आईने स्वतःचे बोल खरे केले. ती बाबांच्या सुखात, दुःखात व मरणातही सहभागी झाली.

बाबांनी मला शाळेत असताना 'माधव ज्युलियन' यांची 'आई' ही कविता शिकवली होती. कारण बाबा तेच दुःख तेव्हा अनुभवत होते. पण देवानं आता असं शिकवायला बाबांना आमच्यापासून हिरावून घेतलं होतं व 'आई' हे शब्द संबोधणाऱ्यालाही !

या सर्व प्रसंगावरून आपण नियतीच्या हातातील बाहुले आहोत हे जाणवले. जगात सगळ्या गोष्टी उपलब्ध होऊ शकतात, पण आईची ममता व वडिलांचा आधार देणारं खंबीर मन मात्र दुर्मिळ आहे.

आता या घटनेला एक वर्ष होऊन गेलं. पण आम्ही तिघं भावंडं कधीच मनानं खचून गेलो नाही. आम्ही ही परिस्थिती आत्मविश्वास न गमवता स्वीकारली. या प्रसंगी जवळच्या मित्रपरिवारापासून कॉलेजच्या प्राध्यापकांपर्यंत सर्वांनी आम्हाला आधार दिला. परिस्थितीवर मात करून आयुष्यात यशस्वी होण्याचा मार्ग प्रा. श्री. चिटणीससरांनी दाखविला. ज्यांनी आम्हाला या प्रसंगी धीर दिला, मदत केली त्यांचे आम्ही सदैव ऋणी राहू.

या प्रसंगातूनही काही व्यक्तींचे खोटे हळहळणे व खोटी सहानुभूती मात्र खूप जाणवली. असे असले तरी आम्ही डगमगलो नाही. आम्ही आमच्यातील आत्मविश्वास कायम ठेवला आणि कोणावर अवलंबून न राहता, आपण आपल्या जीवनाची वाट आम्हा भावंडांच्या साथीने तरून जाण्याचे ठरविले.

ज्या परमेश्वराने आमच्यावर हा प्रसंग आणला, त्याने असा प्रसंग दुसऱ्या कोणावर आणू नये. आम्ही ज्या वेदना भोगल्या, त्या कोणालाही सहन करायला लागू नयेत. हीच आमची परमेश्वराला अगदी मनापासून प्रार्थना आहे.



# पर्व 'नाट्यपर्वा'तील

**मनस्विनी प्रभुणे**
तृतीय वर्ष, कला

'नाट्यपर्व' या नावाने संबोधण्यात आलेला, थिएटर ॲकेडतर्फे आयोजित करण्यात आलेला, पहिला राष्ट्रीय स्तरावरील नाट्यमहोत्सव पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात साजरा झाला. पुण्यातील नाट्यरसिकांसाठी 'नाट्यपर्व' एक वेगळीच पर्वणी ठरली.

१२ ते १८ फेब्रुवारी ९६ या काळात, भारतातील विविध राज्यांतील, विविध भाषांतील उत्तमोत्तम, ख्यातनाम दिग्दर्शकांच्या नाट्यकृती सादर करण्यात आल्या. या कलाकृतींच्या अनुषंगाने त्या त्या नाट्यकृतींवर चर्चा, त्याच्या शैलीवर चर्चा, रंगमंचीय दृष्टिकोणावर चर्चा, मुलाखती या पर्वात रसिकांसाठी, अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरल्या. या चर्चासत्रांसाठी अभ्यासकांनी, रसिकांनी चांगलीच गर्दी केली होती.

एकूण आठ नाटकं या नाट्यपर्वात सादर करण्यात आली. सर्वप्रथम भोपाळच्या 'बन्सी कौल' या दिग्दर्शकाचे 'रंगविदूषक' या नाट्यसंस्थेतर्फे 'सीढी दर सीढी' ऊर्फ' तुक्के पे तुक्का' नाटक सादर झाले. बन्सी कौल यांना 'विदूषक' हे पात्र आवडतं. आणि म्हणूनच गेले काही वर्ष ते 'विदूषक' या संकल्पनेवर अभ्यास करीत आहेत. 'सीढी दर ....... तुक्के पे तुक्का' या नाटकातील सर्व पात्रांना विदूषकांचीच रंगभूषा आणि वेशभूषा आहे. विदूषकांच्या नजरेने आपण जगाकडे पाहिले पाहिजे. त्यामुळे सभोवतालच्या परिस्थितीकडे पाहण्यासाठी आपणांस वेगळाच दृष्टिकोन सापडतो.

बन्सीलाल कौल यांची मुलाखत प्रा. महेश एलकुंचवार, प्रा. पुष्पा भावे आणि शान्ता गोखले यांनी घेतली. मुलाखतीत बोलताना ते म्हणाले, "प्रत्येक शोकात्मिकतेमागे एक हास्यही लपलेली असते. त्याशिवाय त्या शोकात्मिकतेला उंची आणि अर्थ प्राप्त होणार नाही. हे हास्य केवळ विदूषकाच्या नजरेतून टिपता येईल. या विदूषकाच्या नजरेने पाहिल्यास एखादी शोकात्मिका विनोदी पद्धतीने सादर करता येते आणि तरी देखील परिणामकारक ठरते.

दिल्लीतील 'नया थिएटर' ने लेखक दिग्दर्शक—अभिनेता हबीब तन्वीर यांचे 'देख रहे नैन' हे नाटक सादर केलं. हबीब तन्वीर यांनी सुरुवातीला मुंबईतील 'इप्टा' या नाट्यसंस्थेत काम केले. १९७० नंतर मात्र प्रामुख्याने 'छत्तीसगढी' लोककलेकडे वळले. त्यांनी या लोककलेचा अभ्यास केला. या भागातील लोककलांचा त्यांच्या नाटकावर प्रभाव दिसून येतो. तन्वीर हे 'मूर्तिभंजक' म्हणून ओळखले जातात.

ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील 'तमाशा' त्यातील वगनाट्य किंवा आपली संगीत नाटकं ही सांस्कृतिक वैशिष्ट्ये ठरतात; त्याप्रमाणे 'छत्तीसगढ' (जिल्हा) मधील लोककलेला धरून, लोकशैलीला धरून हबीब तन्वीर आपलं नाटक तयार करतात. छत्तीसगढ हे त्या जिल्ह्यावरून, तिथे राहात असलेल्या लोकांच्या संस्कृतीवरून नाव प्रचलित झालं. 'देख रहे नैन' या नाटकातील कलाकार ही याच भागातले आहेत. या नाटकातील कथेचं बीज

जर्मन कथाकार स्टीफन झ्वाइग यांच्या एका कथेवरून घेतलेले आहे. एका लहानशा राज्यात घडणारे युद्ध, युद्धामुळे पसरणारी अशांतता, अस्वस्थता यातून हे नाटक पुढे जाते. पौराणिक संदर्भ घेऊन सद्य परिस्थितीशी सांगड घालणारे हे नाटक. लोकसंगीत, लोकनृत्यांचा वापर या नाटकात तन्वीर यांनी केलेला दिसून आला. छत्तीसगढी संस्कृती जशीच्या तशी रंगभूमीवर पाहण्यास मिळाली. 'नांदी'प्रमाणे सर्व कलाकार एकत्र येऊन गीत म्हणतात, तर त्यातीलच काहीजण प्रत्येक प्रवेशांच्या सुरुवातीला पुढील घटनांचा क्रम गीतातून सांगतात. नाटकाचा विषय तसा लहान होता; परंतु या विशिष्ट नाट्यपद्धतीमुळे ते लांबले गेले.

नाटकानंतरच्या मुलाखतीत हबीब तन्वीर म्हणाले, "नागरी कलाकारांपेक्षा ग्रामीण कलाकारांमध्ये अधिक मोकळेपणा असतो. ग्रामीण कलाकारांचा अभिनय हा सहजतेतूनच केला जातो." तन्वीर यांच्या नाटकातून नागरी आणि ग्रामिण संस्कृतीचे मिश्ररूप दिसते. छत्तीसगढी नाटक बघणे एक वेगळेच अनुभव ठरला.

'ज्ञानपीठ' विजेते डॉ. शिवराम कारंथ यांचे 'यक्षगान' या नाट्यप्रकारातील नृत्य—नाट्यशैलीतील 'चित्रंगदा' हे नाटक झाले. महाभारताततील कथेवर आधारित असा हा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. नृत्यनाट्य असल्यामुळे त्यातील नृत्य, लय, ताल यामुळे भाषेची कुठेही उणीव जाणवली नाही. यातील पात्रे नृत्यातून व अभिनयातून भाव प्रकट करतात. आणि यामुळेच 'यक्षगान' लक्षवेधी ठरले.

शंभू मित्रांची मुलगी सावली मित्रा हिने 'नाथवती — अनाथवत' हा एकपात्री नाट्यप्रयोग सादर केला. द्रौपदीचे महाभारतातील सुरुवातीपासून शेवटपर्यंतची अनेक रूपं तिनं सादर केली. बंगाली भाषेतील गोडवा आणि त्यातील चढ—उतारांमुळे हा नाट्यप्रयोग स्मरणात राहतो.

मणिपुरी लोककला मांडणारे असेच नाटक रतन थिय्याम यांचे 'उत्तरप्रियदर्शिनी' होते. कलिंगच्या युद्धानंतर परतल्यावर राजा अशोकाच्या मनोवृत्तीचे चित्रण यात केले आहे. प्रयोगातील ताल — लय याची वेगळीच भाषा तयार होत होती.

सर्व नाटकं पाहिल्यानंतर, त्यांचे विषय लक्षात घेतल्यानंतर असं लक्षात येतं की, नाटकांचे विषय पौराणिक आणि ऐतिहासिक, लोककलेशी सांगड घालणारे आहेत. याच कारणामुळे, वेगवेगळ्या भाषेतील ही नाटकं असून देखील प्रेक्षकांना भाषेची कुठलीच अडचण जाणवली नाही.

या नाट्यपर्वाच्या निमित्ताने वेगवेगळ्या राज्यांतील लेखक—दिग्दर्शक — कलावंत एकत्र आले. ह्या निमित्ताने वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चा झाल्या. मान्यवरांच्या मुलाखतीही उपयुक्त ठरल्या. या पर्वाला जाणकार पुणेकर रसिकांनीही चांगलीच दाद दिली, बालगंधर्व रंगमंदिर परिसर गजबजून गेला होता. उणीव मात्र जाणवत होती ती एका गोष्टीची मराठी नाटकाची. या नाट्यमहोत्सवात एकही मराठी नाटकाचा समावेश नव्हता; सर्व संयोजक महाराष्ट्रीयन होते. एकही नाटक नाही की जे या महोत्सवात दाखवता आलं असतं ? इतरांनाही आपल्या लोककलेचं दर्शन झालं असतं.

या आधुनिक काळातही अशा नाटकांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचं, लोककलेचं दर्शन या नाटकांद्वारे घडते. या लोककला टिकविण्यासाठी, जिवंत राहण्यासाठी हबीब तन्वीर, डॉ. कारंथ, रतन थिय्याम यासारखे नाटककार —लेखक — दिग्दर्शक प्रयत्न करतात. आजच्या घडीला आपल्याला बघायला मिळतं हे भाग्यच आहे असे म्हटले पाहिजे. ❒

# जगणे कठीण होत आहे

**अनघा बापट.**
अकरावी, शास्त्र

कशास भाषा व्यर्थ बोलता
एकविसाव्या शतकाची ?
एक विसावा ही न दिसावा
व्यथा आजच्या आयुष्याची ।

आज सुखाची विपुलता असतानाही ही व्यथा फार बोलकी वाटत आहे. कारण श्वसन, भोजन आणि शयन ह्यापलीकडेही माणसाला काही हवे असते आणि ते म्हणजेच मनःशांती! परंतु सभोवतालच्या परिस्थितीचे निरीक्षण केले असता आज 'तीच' हरवलेली दिसून येते.

'काळजी' हा महागाईपासून निर्माण झालेला शब्द आज प्रत्येकाच्या मुखी दिसतो. हल्ली तर सर्वच वस्तूंचे भाव सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे झाले आहेत. कधी दुष्काळ, कधी दंगल, कधी युद्ध, तर कधी संप. कुठलंही कारण पुरे. रॉकेलची टंचाई हे तर अगदी नित्याचे झाले आहे.........

रॉकेलची रांग प्रत्येक दुकानात दिसते. आजकाल, " बुध्यावर घाव घाला, फांद्या आपोआप पडतील" या न्यायाने माणूस केवळ पैसा मिळविण्याच्याच मागे लागला आहे. मग तो मिळविण्याचा मार्ग कोणता का असेना. यातूनच जन्माला आला भ्रष्टाचार ! शाळेच्या प्रवेशापासूनच राष्ट्राची लष्करी गुपितं फोडण्यापर्यंत भ्रष्टाचाराची मुळं पसरली आहेत. पोलिस, सरकारी अधिकारी, मंत्री—ही कुंपणंच शेती खात आहेत.

खुर्चीच्या या स्पर्धेत जीव मात्र सामान्य लोकांचाच जातो. सार्वजनिकरीत्या निरनिराळ्या गोंडस नावाखाली हे सर्व चालते.

माणसाने निसर्गाचा समतोलही बिघडवला आहे. निसर्गापासून तो अधिकाधिक दूर चालला आहे. प्रदूषणाच्या छायेत त्याचे जीवन घडत आहे. पृथ्वीचे तापमान ओझोनच्या कमी झालेल्या थरांमुळे वाढत आहे. सिमेंट—कॉंक्रीटच्या जंगलांनी सांस्कृतिक जीवन सौंदर्यहीन बनत चालले आहे. 'Block System' मुळे माणसा—माणसातसुद्धा भिंती उभारल्या गेल्या आहेत. आजची तरुण पिढी गर्द आणि मादक पदार्थांच्या गराड्यात अडकत आहे. दोन पिढ्यांच्या संघर्षातून 'वृद्धाश्रम' निर्माण होत आहेत. परंतु हे मात्र खरं की, वाढत्या महागाईप्रमाणेच लोकांकडे पैशाचे प्रमाणही वाढत आहे. पु. लं.नी म्हटल्याप्रमाणे प्रत्येकाच्या 'ध्यानी' आज फक्त 'मनी'च आहे. परंतु हे सर्व सारेजण सोशिकतेने सोसत आहेत. आणि कालचा दिवस बरा होता असे म्हणत दुसरा दिवस उजाडत आहे.

कलियुगात प्रलय होऊन जगबुडी होणार असं सांगते मनुस्मृती. हा प्रलय महागाईचा तर नसेल?..... द्वापारयुगात सुदाम्याला दारिद्र्य हटवायला श्रीकृष्ण भेटला. आजसुद्धा कलियुगात त्या "संभवामि युगे युगे" असे वचन सांगणाऱ्या युगपुरुष श्रीकृष्णाचीच वाट पाहावी लागेल. ❑

# समाजातील वाढती गुन्हेगारी, कारणे व उपाय

**सोपान गाडे**
तृतीय वर्ष, कला

जगातील प्रत्येक संस्कृतीत आणि समाजात तेथील लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण करणारे काही प्रचलित कायदे व नियम असतात. तेथील कायद्यानुसार तेथील लोकांचे वर्तन घडावे अशी त्या संस्कृतीची व समाजाची अपेक्षा असते. परंतु काही व्यक्ती त्याला अपवाद असतात. "प्रचलित कळत–नकळत समाजहितविरोधी वर्तन घडते. म्हणजेच "प्रचलित कायद्याविरूद्ध केलेले कोणतेही वर्णन गुन्हा या सदरात मोडते." समाजात समाजव्यस्थेसाठी शासन किंवा कायदेसंस्था काही कायदेशीर व्यवस्था करीत असते. या कायद्याविरूद्ध एखाद्याची कृती घडल्यास त्या कृतीलाँ व वर्तनाला गुन्हा असे म्हणतात." गुन्हा हा अगदी उच्च समाजापासून ते मागासर्वर्गीय समाजापर्यंत तसेच इंग्लंड, अमेरिकेसारख्या देशापासून ते श्रीलंका, नेपाळसारख्या देशात सर्वत्र आढळतो. फक्त गुन्ह्याचे स्वरूप तेवढे वेगळे असते.

गुन्हेगारी वृत्तीची वाढ होण्यास तेथील परिस्थिती कारणीभूत ठरते. दारिद्र्य, असहाय्यता, नितीमत्तेचा अभाव, निकृष्ठ चारित्र्य, स्थलांतर आणि कौटुंबिक अस्वास्थ इ. घटक दृष्ट प्रकृतीस प्रोत्साहन देत असतात व त्यातून गुन्हेगारी वृत्ती वाढते व जोपासली जाते. आजच्या परिस्थितीचा विचार करता आपणाला असे आढळून येईल की काळाप्रमाणे गुन्ह्यांचे स्वरूपही बदलते आहे. केवळ जुगार, मद्यपान, चोरी, खून, जाळपोळ इ. प्रकारचेच गुन्हे समाजामध्ये घडत नसून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व सामुहिक पातळीवरील गुन्ह्यांचे प्रमाण आज समाजामध्ये वाढत आहे. अशाा या गुन्ह्यांची वेगवेगळी कारणे आपणाला सांगता येतील व त्यावर प्रभावी उपायही योजता येतील.

गुन्हेगारीची कारणे

१) भ्रष्ट राजकारणी : राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकरण हेच आजचे सर्वात मोठे व महत्त्वाचे कारण आहे. आज राजकारणात गुन्हेगारांचा सुळसुळाट झाला आहे. स्वच्छ चारित्र्यवान नेता सापडणे आज कठिण झाले आहे. भ्रष्टाचार, गुंडगिरी, खून, बलात्कार इ. प्रकरणांमध्ये राजकीय नेते अग्रेसर आहेत. उत्तर प्रदेशामधील बुलंद शहर मतदारसंघामधून तीन वेळा निवडून आलेले आमदार डी. पी. यादव हे या विभागातील दारूधंद्याचे प्रमुख सुत्रधार आहेत. मुलायमसिंग यांना ते आपला गुरू मानतात. म्हणजे गुरू किती मोठा असला पाहिजे. सतान यादव या नावाचा बिहारचा एक आमदार दरोडे घालण्याच्या प्रकरणी सध्या तुरूंगात आहे. तरी नौमन मतदारसंघातून तो निवडून येतो. अखिलेश सिंग नावाच्या आमदारावर २७ गुन्हे आहे. तसेच बजरंग दलाचे नेते खासदार विनय कटियार यांच्यावर बलात्काराचा खटला सध्या कोर्टामध्ये चालू आहे.

'आंधळं दळतं आणि कुत्रं पिठ खातं' अशी आज भारतामध्ये कायद्याची अवस्था झाली. ती कुणाच्या हस्तक्षेपामुळे ? भ्रष्टाचार, गुंडगिरी, वशिलेबाजी इ. गोष्टींच्या जोरावर कोर्टाचे निकाल

बदलले जातात.' ते कोणासाठी ?' 'कुंपणाने शेत खाल्ले तर दाद मागावी कुणाकडे ? या प्रमाणे नेता आणि गुन्हेगार यामध्ये काहीच फरक राहिलेला नाही. अनेक पुढाऱ्यांनी देशसेवेच्या नावाखाली दाऊद इब्राहीम सारख्या गुंडाशी मैत्री केलीं. मग अशाच गुंडांनी बॉम्बस्फोट घडवून, खून करून, दरोडे टाकून गुन्हेगारीचा कळसच गाठला. अनेक गुन्हेगार पुढाऱ्यांनीच निर्माण केले व समाजस्वास्थ धोक्यात आणले. अबिद हुसेन यांनी म्हटल्याप्रमाणे "रशियात गुन्हेगारांना सरळ गोळ्या घालतात. इटलीत तुरूंगात टाकतात तर भारतात ते लोकप्रतिनिधी बनतात." असं आजच्या भारतीय समाजाचे गुन्हेगारीच स्वरूप आढळते.

२) लोकसंख्येचा भस्मासूर :

आज समाजाला सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे वाढलेली अवाढव्य लोकसंख्या. या वाढलेल्या लोकसंख्येमुळे लोकांना सर्व सुविधा मिळणे अवघड झाले आहे. त्यातच सरकारचे अयोग्य धोरण, आळशी प्रवृत्तीचा समाज यामुळे देशातील बेकारीचे प्रमाण वाढत आहे. यामुळे कित्येक लोकांना आज अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा पुरवणेही अशक्य झाले आहे. साहजिकच या गरजा भागविणे अपरिहार्य असल्याने त्यांच्या पूर्ततेसाठी काही लोक अयोग्य मार्गाचा वापर करतात व गुन्हेगार बनतात. यातूनच मग कित्येक तरूण गुंडांच्या टोळ्या स्थापन करतात किंवा टोळ्यामध्ये सामील होतात. यांच्याच हातून मग मोठमोठ्या चोऱ्या होतात, खून होतात, दरोडे घडतात. एवढेच नाही तर देशद्रोही कारवाया होतात व समाजाच्या दृष्टीने त्या गुन्हेगार बनतात.

३) अमर्याद लोभ :

माणसाचा अमर्याद लोभ हे समाजातील वाढत्या गुन्हेगारीचे मुख्य कारण आहे. आज समाजामध्ये सर्वत्र चोऱ्या, गुन्हेगारीचे मुख्य कारण आहे. आज समाजामध्ये सर्वत्र चोऱ्या, घरफोड्या, खून, हुंडाबळी या गुन्ह्यांचे प्रमाण वाढते आहे. कष्ट न करता जास्तीत जास्त व लवकरात लवकर पैसा कशा रितीने मिळवता येईल याकडे माणसाचे लक्ष असते. कष्टापेक्षा युक्ती योजून अशी गुन्हेगारी कृत्ये केली जातात. जक्कल सुतारासारख्या अनेक गुन्हेगारांनी टोळ्या निर्माण केल्या. अमानुष खून केले, पैसे लुटले ते पैशाच्या लोभापोटीच. कोथरूडसारख्या ठिकाणी अगदी दोन वर्षाच्या बालकापासून ते प्रौढ व्यक्तींचे खून केले, ते पैशाच्या लोभाने. एवढेच नाही तर आज बँकावरदेखील दरोडे टाकले जातात. यावरून माणूस लोभापोटी कोणता गुन्हा करेल हे सांगता येत नाही.

४) लैंगिक स्वैराचार :

समाजातील वाढत्या गुन्हेगारीमध्ये लैंगितकेसंबंधीच्या गुन्ह्यांची व गुन्हेगारांची संख्या वाढती आहे. संस्कृती, परंपरा, निती—नियम विसरून, घाणेरडे चित्रपट पाहून मनुष्य आज पशु बनत चालला आहे. लैंगिक सुखाच्या हव्यासापोटी कुठल्याही स्तराला जाईल याची कल्पना करवत नाही. या कारणामुळे समाजात खून होतात, मारामाऱ्या होतात व समाजस्वास्थ बिघडते. केवळ बलात्कारच नाही तर जळगांव वासनाकांडासारख्या प्रकरणातून मनुष्य पशू झाल्याचे जाणवते. केवळ जळगावंच नाही तर प्रत्येक लहान, मोठ्या शहरात असे कितीतरी प्रकार घडतात आणि समाजातील गुन्हेगारांची संख्या या कारणाने किती वाढते हे लक्षात येते.

**गुन्हेगारीवरील उपाय**

१) संधीसाधू पुढाऱ्यांचे उच्चाटन :

राजकारण आणि गुन्हेगारीकरण एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्याने राजकारणातील गुन्हेगारांचे उच्चाटन केले पाहीजे. गुन्हेगार लोकांना मत देणार नाही असे लोकांनी ठरविले पाहिजे. झटपट श्रीमंत होऊन, मोठ्या इस्टेटी करून जगणाऱ्या संधीसाधू समाजाला गाडून टाकायला हवे. यासाठी काहीजणांना प्राणाचे बलिदान करावे लागेल. असे हे समाजातील कठोर गुन्हेगार आहेत, हिटलर आहेत, मानवाचे शत्रू आहेत. अशा ठगांचा वेळीच बंदोबस्त केला पाहिजे.

२) गुन्हेगारांचे पुनर्वसन :

गुन्हेगारी वृत्ती ही काही जन्मजात असत नाही. ती एकतर संपादित किंवा परिस्थितीमुळे निर्माण होते. म्हणून गुन्हेगार व्यक्तीला सुधारणे हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न असून त्यांचे समाजात पुनर्वसन करणे जरूरीचे आहे. गुन्हेगार व्यक्तीची स्थिती नेहमीच नाजूक असते. सर्व समाज त्यांच्याकडे गुन्हेगार म्हणून पाहतो. हा सामाजिक दृष्टीकोन बदलणे जरूरीचे आहे. गुन्हेगाराला आर्थिक दृष्ट्या सबल करणे, व्यवसाय सुरू करून देणे, भीती कमी करून स्वावलंबी करणे हे महत्त्वाचे उपाय आहेत. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी काही वेळा शिक्षा देणे अपरिहार्य असते. तरी त्या शिक्षेतून त्या व्यक्तीने भावी जीवन उत्तम होण्यासाठी काही शिकावे हा शिक्षेचा मुख्य हेतू असला पाहिजे.

३) शिक्षेची कडक अंमलबजावणी :

आज स्थितीला कितीतरी देशामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय गुन्हे करणारे अतिरेकी प्रकृतीने गुन्हेगार आढळतात. अशा गुन्हेगारांच्या शिक्षेसाठी कडक शिक्षा दिली जावी. त्यांच्याशी सहानुभुतीने वागल्यास त्यांचे अधिक फावते व ते मग मोठ्या स्वरूपाचा गुन्हा करतात. काही गुन्हेगारांना झालेली शिक्षा पाहून बाकीच्या गुन्हेगारांना दहशत बसेल व असे गुन्हे करण्यास त्यांचे धाडस होणार नाही. असे झाल्यास मोठमोठ्या गुन्हेगाराला शिक्षा म्हणून तुरूंगात पाठवल्यानंतर शिक्षा भोगण्याबरोबरच सुधारण्याचे प्रयत्नही केले पाहिजेत. तुरूंगवास म्हणजे चार प्रचंड भिंतीच्या आतील असह्य जीवन अशीच कल्पना जर मनात राहिली किंवा तुरुंगवास म्हणजे कैद्यांकडून अवघड काम करून घेणे असे जर त्यांना वाटले तर केवळ शिक्षा भोगल्याने त्यांच्यात परिवर्तन होणार नाही. म्हणून तुरूंगात अधिक सुधार पोषक वातावरण तयार करणे महत्त्वाचे आहे. तुरूंग हा गुन्हेगारांना गुन्ह्याबाबत 'करावे तसे भरावे' या नात्याने केवळ शिक्षा देण्यासाठी नसून ते एक सुधारणागृह आहे असे वाटले पाहीजे.

'रॅमन मॅगसेसे' पुरस्कार विजेत्या किरण बेदी यांनी योजलेले उपाय जर सर्व तुरूंगात राबवले गेले तर तुरूंगातून बाहेर पडणाऱ्या व्यक्ती ह्या गुन्हेगार म्हणून न पडता सुसंस्कृत, स्वावलंबी नागरिक म्हणून बाहेर पडतील व समाजातील गुन्हेगारांची संख्या नक्कीच कमी होईल.

अशा प्रकारे समाजामध्ये वाढत्या गुन्हेगारीची कारणे भरपूर असली तरी त्यावर उपायही तेवढेच आहेत. फक्त ते उपाय राबवणारे पाहिजेत. सर्व जगाच्या दृष्टीने गुन्हेगार ठरलेल्या 'हिटलर'च्या देखील बंदोबस्त करता येतो हे इतिहासाने दाखवून दिले आहे. ज्याप्रमाणे कुठलाही रोग आला की तज्ञ डॉक्टर त्यावर प्रभावी औषध शोधून काढतात व उपचार करतात. त्याचप्रमाणे समाजातील गुन्हेगारीवर ताबा मिळवणे अवघड असले तरी अशक्य मात्र नाही. ❑

# विवाह पद्धती विषयी माझे विचार

**शितल कुलकर्णी**
तृतीय वर्ष शाखा

दिसते मजला सुखचित्र नवे
मी संसार माझा मांडिते

किशोर अवस्थेतून तारुण्याात प्रवेश करताना प्रत्येक युवतीच्या मनात हेच विचार येत असावेत. विवाह ही मानवी जीवनातील एक महत्वाची घटना आहे. आयुष्यातील ते एक फार मोठे वळण आहे. दोन तरुण मनांचे ते मीलन आहे. त्या दोघांनी त्यांच्या भावी जीवनाचे पाहिलेले ते स्वप्न आहे.

हिंदू धर्मात विवाह हा सोळा संस्कारातील एक संस्कार आहे. आपल्याकडे मुलींने विशी आणि मुलाने पंचविशी ओलांडली की 'संशोधन' सुरु होते. प्राचीन काळच्या विवाहपध्दती सध्याच्या पध्दतीपेक्षा थोडया निराळया होत्या. त्याकाळी मुलींची लग्ने लहानपणीच होत असावीत असा समज आहे, परंतु महाभारतात जितकी विवाहाची वर्णने आहेत, त्या सर्व कन्या उपवर म्हणजे प्रौढ दशेत असतानाच त्यांचे स्वयंवर आयोजिले जात असे. महाभारतात प्रथम ब्राम्ह म्हणजे मुलीच्या पित्याने वराला बोलावून धनधान्य देऊन कन्या अर्पण करावी. क्षत्रियाने एखादा पण जिंकला अथवा वीरकर्म केल्यास त्याला मुलगी देणे म्हणजे क्षात्रपध्दत. गांधर्वविवाहात मुलीला तिच्या इच्छेने 'वर' पसंत करण्याचे स्वातंत्र्य असे. विवाहाचा चौथा प्रकार म्हणजे आसुर—यामध्ये कन्येच्या आप्तांना धन देऊन कन्या विकत घेतली जात असे. पाचवा प्रकार हा राक्षसांमध्ये रूढ असल्याने त्यास राक्षस असे नाव पडले. यात कन्येच्या आप्तांशी लढून ते विलाप करत असताना कन्येचे हरण केले जात असे. हे सर्व विवाह प्रथम निरनिराळया जातीत रुढ होते परंतु नंतर त्याचे रुपांतर ब्राम्ह पध्दतीत झाले. ब्राम्ह पध्दत हीच विवाहाची सर्वश्रेष्ठ पध्दत होती.

आपली सध्याची विवाहपध्दती हे ब्राम्ह पध्दतीचे बदलते स्वरुप आहे. सर्व साधारणतः पूर्वीच्या काळाप्रमाणेच बहुतेकवेळा मुलींचे मत ग्राहय धरले जात नाही. घरातील वडीलधारी मंडळींनी विवाह ठरविण्याची चाल अजूनही आहे. मुलगी २० वर्षाची झाली की तिच्या घरात विवाहाची चर्चा सुरु होते. मग पत्रिका दिल्या जातात त्या जुळतात का ते पाहिले जाते. पत्रिका जुळताच मुलाकडचे लोक मुलीला पाहायला येतात. मुलगा केवळ मुलीला पाहून व २—४ जुजबी प्रश्न विचारुन आपली पसंती ठरवितो. त्या दोघांमध्ये संवाद तर होतच नाही. मग त्यातंनर ते दोघे फारतर ३—४ वेळा भेटतात आणि थाटामाटात त्यांचा विवाह संपन्न होतो.

वरवर पाहता सर्वकाही आलबेल दिसते. परंतु नंतर विसंवाद आढळून येतो. आणि त्याची परिणती घटस्फोटात होते. हे सर्व टाळण्यासाठी विवाहापूर्वीचे सर्व काही आजमावून पाहायला हवे. इतरांनी नव्हे तर ते ज्यांना भावी पती—पत्नी म्हणून राहायचे आहे त्यांनीच लग्नाचा निर्णय अत्यंत सावकाशीने व खोलवर विचार करुन घ्यावा म्हणजे विवाह ही लॉटरी किंवा जुगार ठरणार नाही. यावर कदाचित असे म्हटले जाईल की पूर्वीही

परस्परसंमतीविना असे विवाह होत होते. तेव्हा हा प्रश्न कसा उद्‌भवला नाही यावर असे म्हणता येईल की त्यावेळी स्त्रिया शिक्षीत नव्हत्या. त्यांना स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव नव्हती. त्या स्वतःच्या पायावर उभ्या नव्हत्या. यामुळे व कदाचीत एकत्र कुटुंबपध्दतीमुळे असे विवाह निभावले जातात. पण आज स्त्री शिकत आहे, आर्थिकदृष्टया ती स्वतंत्र होत आहे. या बदलत्या परिस्थीतीत असे विवाह निभावून नेणे त्या नाकारु लागल्या आहेत. स्त्री—पुरूषांचा एकमेकांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

विवाह—पध्दतीमध्ये बदल सुचविताना प्रथम पत्रिकांचे अवडंबर टाळणे व परस्परसंमतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. मुलगा व मुलगी दोघांनाही एकमेकांचे बाहय सौंदर्य पाहण्यापेक्षा, स्वभाव व कर्तृत्व जाणून घ्यावे. एकमेकांचे विचार जोखून घ्यावेत. तसेच विवाह जुळविताना पत्रिका पाहण्यापेक्षा रक्तगट अनुरुप असणे आवश्यक आहे. असे असल्यास तो विवाह शास्त्रीय व वैज्ञानिकदृष्टया सफल होईल. एका विवाहामुळे आपल्यावर येणाऱ्या जबाबदारीची मुलगा व मुलगी या दोघांनाही जाणीव ठेवावी.

गेल्या दशकापासून थोडी स्थिती बदलल्यासारखी दिसते. कित्येक कुटुंबातून मुलीच्या मतालाही प्राधान्य दिले जात आहे. पूर्वीच्या काळी लोकसंग्रह अधिक असल्याने विवाह शक्यतो जवळच्या नात्यात ठरविले जात. पण हल्ली विभक्त कुटुंबपध्दतीमुळे वर—वधू सूचक केंद्राची निकड झाली आहे. बरेचसे विवाह वधू—वर सूचक केंद्रामार्फत ठरविले जातात ते यशस्वी होतात. विवाहसंस्थेतील हा एक चांगला बदल आहे. विवाहपध्दती निर्दोष करण्यासाठी काही लोकांनी ट्रायल मॅरेजची कल्पना सांगितलीं आहे यात मुलीने विवाहाशिवाय मुलाकडे काहीकाळ राहावे आणि सर्वकाही जूळून आल्यास, विवाह करावा किंवा करु नये. ही कल्पना स्वैराचाराला निमंत्रण देते. भारतीय संस्कृतीचा पाया म्हणजे उत्तम चारित्र्य यालाच धक्का बसतो. यामुळे अनैतिक संबंधांची शक्यता निर्माण होईल आणि मग विवाहाची गरजच उरणार नाही. पाश्चिमात्यांचे अनुकरण, टिव्हीवरील वाढत्या चॅनेल्सचे जनमनावर आक्रमण चित्रपटातील अधिक स्वैरदृश्ये या गोष्टी तरुण व तरुणीच्या मनावर परिणाम घडवितात यातूनच प्रेयसीचा खून करणे, आत्महत्या करणे या गोष्टी उद्‌भवतात. वास्तविक मुली आज शिक्षण घेत आहेत. तेव्हा त्यांनी त्यांची वैचारीक बैठक निश्चीत केली पाहिजे. समाजातील वाईट प्रवृत्तीचे अनुकरण त्यांनी करु नये. विवाह करण्यापुर्वी सर्व गोष्टींचा विचार करुन आपला जीवनसाथी निश्चीत करावा व तो प्रतिस्पर्धी ठरणार नाही याची दक्षता घ्यावी.

विवाहपध्दतीविषयी बोलताना आंतरजातीय प्रेमविवाहाबद्दल बोलणे ओघानेच आले. अजूनही आपल्याकडे हा विवाह निषिध्द मानला जातो. वास्तविक पाहता मुलीचा विवाह स्वजातीत अगदी पत्रिका वगैरे पाहून थाटामाटात झाला तरी तिचा काही ठिंकाणी पैशांसाठी बळी जातोच. हुंडाबंदीचा कायदा होऊन कित्येक वर्षे झाली तरी वर्तमानपत्रात रोज एक तरी हुंडाबळीची बातमी असे. तेव्हा अशा ठिकाणी विवाह करण्यापेक्षा, चांगल्या विचारांच्या मुलाशी विवाह करावा मग तो परजातीय का असेना. आपल्या धर्मात अनेक जाती आहेत. त्यांच्याच निरनिराळया जीवनपध्दती आहेत. काही ठिकाणी त्या अगदी परस्परविरोधी आहेत. यामुळे आंतरजातीय प्रेमविवाहात विसंवाद निर्माण होतो.

आंतरजातीय प्रेमविवाहांना समाजमान्यता नसल्याने नोंदणीपध्दतीची विवाहपध्दती पुढे आली. यामुळे विवाहासारख्या खाजगी गोष्टीतही कायदयाचा प्रवेश झाला. आपल्या धर्मात अनेक विवाहपध्दतीमधील निरनिराळे विवाहविधी वराला व वधूला एकमेकांवर प्रेम करण्याची, समर्पण करण्याची शक्ती मिळवून देतात. नोंदणी पध्दतीमुळे हा प्रकार आता मागे पडत आहे. विवाहाची पध्दत कुठलीही असो – धार्मिक अथवा नोंदणी पध्दती . शेवटी दोन मनांच्या तारा जुळणे अधिक महत्वाचे आहे. नाहीतर मग विसंवाद, भांडण आणि घटस्फोट असे दुष्टचक्र सुरू होते.

विवाहपद्धतीमधील दोष सांगताना एक मुद्दा लक्षात घेण्याजोगा आहे. तो म्हणजे विवाहात केला जाणारा अनाठायी व भरमसाठ खर्च. लग्नात आपण आप्तांना, मित्रेष्टांना बोलावितो ते त्यांचे मंगल आशीर्वाद नवपरिणित वधूवरांना मिळावेत म्हणून! हल्ली हा समारंभ मात्र श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याचा एक भाग होऊन बसला आहे. वरपक्षाचे हट्ट पुरविण्यासाठी वधूपक्ष बेदम खर्च करतात. पण तरीही तो विवाह यशस्वी होईल याची शाश्वती नसतेच. तेव्हा मुलाने व मुलीने एकमताने हा अनाठायी खर्च टाळावा, आपल्या हौसेला मुरड घालावी. कारण विवाह यशस्वी व संसार सुखी होण्यासाठी गरज असते ती फक्त प्रेमाची व समजूदारपणाची.

विवाहविधी हा विवाहातला एक अनन्यसाधारण भाग आहे. भारतीयपद्धतीत कन्यादान, पाणिग्रहण व सप्तपदी हे प्रमुख विधी मानले जातात. बहुतेक लोक लग्नाकडे वरवरच्या दृष्टीने पाहतात. लग्न करण्यासाठी अशीच व्यक्ती पात्र आहे. जिच्यात प्रेम करण्याची ताकद आहे आणि प्रेमाचे दुसरे नाव आहे सहनशीलता. लग्नामध्ये मुलापेक्षा मुलीला अधिक महत्त्व आहे कारण तिला स्वतःचे जीवन दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनाशी एकरूप करायचे असते. सप्तपदीच्या संस्कारात पतीबरोबर सात पावले चालून ती सुखी जीवनासाठी सात प्रतिज्ञा करते.

एक लग्न स्त्रीला अनेक प्रकारांनी बदलून टाकते. सप्तपदीच्या सातव्या पावलाने नवरा सखा होईल याची शाश्वती नसताना, लज्जाहोमात ती स्वतःच्या बालपणाची आहुती देते. ते आयुष्य पुन्हा नाही. आईवडिलांच्या सान्निध्यात जीवनरसावर फुलणारी ही कळी आपल्या सर्वस्वाचं दान करते तेव्हाच तिचा विवाह सफल होतो. पतिपत्नीचे संबंध प्रेमयुक्त, भावार्द्र व विश्वासपूर्ण असावेत. संसारात हे सर्व मधुरभाव निर्माण झाले तर वैवाहिक जीवन खऱ्या अर्थाने पूर्णत्वास जाईल. MARRIAGE हा शब्दही वैवाहिक जीवनात आवश्यक गुण सुचवितो.

| | | |
|---|---|---|
| M | Mergine | आत्मसमर्पण |
| A | Ambition | महत्त्वाकांक्षा |
| R | Respect | सन्मान |
| R | Response | प्रतिसाद |
| I | Intimacy | दृढपरिचय |
| A | Accereditition | विश्वास |
| G | Gaiety | आनंद |
| E | Eternity | शाश्वतता |

निसर्गाने माणसाला अफाट शक्ती दिली आहे. स्वतःत असलेली निर्मितीची शक्ती त्यानं स्त्री–पुरूषांना बहाल केली आहे. म्हणून पती–पत्नी जेव्हा तादात्म्य पावताता, तेव्हा त्यांच्यासारखाच एक जीव ते निर्माण करू शकतात. इतकी एकरूप जर ती वैचारिक व भावनिकदृष्ट्या होतील तर विवाहसंस्था एक आदर्श संस्था होईल. ❐

# आन्तरजातीय विवाह : राष्ट्रीय एकात्मता

**स्वाती आमोदे**
एम. ए. (मराठी)

"दिसते मजला सुख चित्र नवे
मी संसार माझा रेखिते"

'आन्तरजातीय विवाह' या शब्दाला आता बऱ्यापैकी महत्त्व आलेले आहे. म्हणजे पहिल्या सारखे आता राहिले नाही. पूर्वी दुसऱ्या जातीत लग्न करणे ही कल्पनाच मुळी सहन केली जात नसे. परंतु आता या काळात कुणी फारसा विचार करीत नाही. शेवटी काही लोक नकारात्मक आहेत म्हणा ती गोष्ट वेगळी. परंतु आता लोकांच्या विचारात बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे. शिवाय त्यामधून 'राष्ट्रीय एकता' घडून येते.

अती प्राचीन काळी विवाहाचे स्वरूप 'स्वयंवर' पद्धतीने होत असे. उदाहरणादाखल द्यायचे झाले तर महाभारत, रामायण हे आहे. स्वयंवर रचणे म्हणजे देशोदेशींचे राजकुमार आपल्या राज्यात बोलविणे व त्यांच्यासमोर कठीण अशा शर्यतीचा प्रस्ताव मांडणे. जो ती शर्यत जिंकेल त्याला राजकुमारी वरमाला घाले. अशी पद्धत होती. इतर विवाह पद्धतीचे स्वरूप महाभारतात सांगितले आहे.

'शकुंतला व दुष्यंत' यांनी ज्या पद्धतीने विवाह केला, त्याला 'गांधर्व विवाह' असे म्हणतात. हा विवाह म्हणजेच आजचा 'प्रेमविवाह' असेही आपण म्हणू शकतो.

प्राचीन काळी 'स्वयंवर' या पद्धतीने जे विवाह होत होते, त्यामुळे देशादेशातील संबंध सलोख्याचे राहात असे. तसेच नेहमी एकमेकांच्या देशात येणे—जाणे. त्यामुळे प्रेम व एकता वाढत असे व याकारणाने राष्ट्रीय एकता वाढत असे.

थोडा मध्य काळाचा जर आपण विचार केला तर त्या काळामध्ये वडील व आई म्हणेल त्या मुलाशी लग्न करायचे अशी धारणा होती व मग याबाबत मुलींची मुलाबद्दल पसंती वगैरे विचारण्याची पद्धत नव्हती. म्हणजे अक्षरशः मुलींवर विवाह लादण्यात येत असत व त्यातच मुलींना शिक्षणही मर्यादित देत असत. कारण पुढचे महाविद्यालयातले शिक्षण जर मुलींना दिले; तर मुलांशी बोलणे व परिचय वाढणे व नंतर विवाह वगैरे प्रकार घडत असे. त्यामुळे आईवडील या सर्व गोष्टीपासून मुलींना वंचित ठेवत असत. परतु तरीही अगदी बोटावर मोजण्याइतक्या मुलींनी या काळात आन्तरजातीय विवाह केलेले आहेत. परंतु त्यांना कुणीही चांगले म्हणत नसत व समाजाचा अगदी प्रखर विरोध त्यांना सहन करावा लागत असे.

आताच्या या काळात मात्र बरीच सुधारणा झाली आहे. मुलगी आपल्या मनपसंत वराबरोबर विवाह करू शकते. तसेच मुलाबद्दल आपले विचार, आपली पसंती दर्शवू शकते. या सर्व गोष्टीला आईवडील व समाज आता बऱ्यापैकी मान्यता देतात. म्हणजे स्त्रीला बऱ्याच काळाने का होईना परंतु स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे याची जाणीव आलेली दिसते.

आंतरजातीय विवाहामुळे जातीचे बंधन धुतले जाते. म्हणजे मुलगी किंवा मुलगा कोणत्याही जातीतील

मुलामुलीशी लग्न करू शकतो, म्हणजेच जातीयता पुसली जाते. त्यामुळे जातीमध्ये हलकी व भारी, उच्च—नीच हा भेद नष्ट होतो. जातीजातीमध्ये प्रेम व एकता, तसेच सलोख्याचे संबंध वाढण्यास मदत होते. त्यामुळे 'राष्ट्रीय एकात्मतेला'सुद्धा मदत होते.

शिवाय अशी एक योजना आहे की, जर एखादा मुलगा किंवा मुलगी यामधील दोघे वेगवेगळ्या जातीचे असतील व ते विवाहइच्छुक असतील; तर त्यांना सरकारतर्फे पैसे मिळतात. ही योजना परत एकता घडवून आणण्यासाठी मदत करते.

तसेच चित्रपट व नाटक यांमधूनही 'आंतरजातीय' विवाहाचे दर्शन घडवितात. त्यामुळे याचा प्रभावसुद्धा समाजातील मुलामुलींवर प्रबोधक म्हणून होतो.

तसेच शिक्षणाच्या किंवा नोकरीच्या निमित्ताने परदेशी मुले किंवा मुली तिथल्या परदेशी स्त्री किंवा पुरुष यांच्याशी लग्न करतात. त्यामुळे त्यांची संस्कृती व आपली संस्कृती यांचा थोड्याफार अर्थाने मेळ होतो. आपल्याला त्यांच्या व त्यांना आपल्याकडील गोष्टी, रूढी, परंपरा कळते. शिकायला मिळते. यामधूनही 'राष्ट्रीय एकात्मता' घडून येते.

सर्वांच्या आपापल्या जातीत काही रिती, पद्धती असतात. आंतरजातीय विवाहामुळे एकमेकांच्या जातीतील रीती, पद्धती पहायला व शिकायला मिळते. तसेच खाणे—पिणे व वेशभूषा याबाबतही आपल्याला नविन काही शिकावयास व पाहावयास तसेच खाण्यास व वेश घालण्यास मिळतात. त्यामुळे जाती वगैरे आपण विसरून जातो.

आता तर 'आंतरजातीय विवाह वधूवर मंडळ' तसेच 'आंतरजातीय विवाह वधूवर मेळावा' असेही काही समाजातील प्रतिष्ठित लोकांनी चालू केले आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकता वाढते.

आता बऱ्यापैकी 'आंतरजातीय विवाहाची' कल्पना अस्तित्वात आली आहे. तरी अजूनही काही चांगले कार्यक्रम राबवून आपल्याला या विषयाचा विस्तार वाढविता येऊ शकतो. आंतरजातीय विवाहाचे एक मोठे उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतः बौद्ध धर्माचे असूनही त्यांनी ब्राम्हण कन्येशी लग्न केले होते. ❒

## भ्रमण

अनंत काळाच्या प्रवासावरचा मी एक प्रवासी
अनंत दुःखे सोबतीला अन् सुखेही काही
अश्वत्थाम्याचे शल्य मनी, परी मुखी गीत हर्षाचे
हे गीत गाता गाताच प्रवासाची वाट चालावयाचे
चंद्राची शीतलता, तळपत्या ऊन्हाचे मी घेतले तेज
मन अश्रूंना सोबत करिती श्रावणातील बरसती मेघ
मंद लयीतील गीता सारखे मंद माझे जीवन
कधी कधी जपणे अवघड जाते मजला माझे मीपण
धुक्याची चादर कधी लपेटी कधी पावसांत होई चिंब
हरवून जाते माझे मी—पण पाहता मावळत्या
दिनकराचे प्रतिबिंब.

**बिपीन इनामदार**, एम.ए. इंग्लिश

# वैदिक गणित–गणितच नव्हे तर एक नवा विचारही!

**आदित्य खेर, सचिन जाजू**
अकरावी, शास्त्र

वैदिक गणित म्हणजे वेदांतील सूत्रांवर आधारलेले गणित. हे गणित अभ्यासत असताना,

लोह परीसा रुसले । सोनेपणासी मुकले ।।
तेथे कुणाचे काय गेले । ज्याचे तेणे अहित केले।।

या तुकारामांच्या उक्तीची आठवण येते. कारण वैदिक गणिताच्या सोप्या, रंजक आणि आकर्षक पद्धती अस्तित्वात असताना, आपण त्याच सरधोपट, लांबलचक पद्धती वर्षानुवर्षे शाळांमध्ये कशाकरिता शिकवीत असतो तेच कळत नाही. म्हणून आजवर केलेल्या दुर्लक्ष्यामुळे आपण स्वतःचेच अहित करून घेत आहोत असे वाटते.

वैदिक गणिताचे आद्य संशोधक असलेले स्वामी भारती कृष्णतीर्थ यांचा जन्म १८८४ साली केरळमध्ये झाला. वेंकटरमण हे त्यांचे मूळ नाव होते. लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धी असलेल्या वेंकटरमण यांनी १९०२ साली बी. ए. आणि १९०४ साली एम. ए. ही पदवी मिळविली. या परिक्षेत त्यांनी विज्ञान, तत्त्वज्ञान, इतिहास, इंग्रजी, गणित व संस्कृत या सर्व विषयांत प्रथम क्रमांक मिळविला. हा अजूनही न मोडला गेलेला विक्रम आहे. त्यानंतर त्यांनी काही वर्षे बंगलोर येथे प्राचार्य म्हणून काम केले व नंतर स्वातंत्र्य चळवळीत कार्य केले. १९११–१९ पर्यंत त्यांनी शृंगेरी भोवतालच्या अरण्यात योगसाधना करून वैदिक ग्रंथातून जगाला अज्ञात अशा सूत्रांचा अभ्यास केला. ती शोधून काढली व जगापुढे मांडली. 'समत्वं योग उच्यते' ही व्याख्या ज्याच्या बाबतीत सर्वांशाने लागू पडते, असा हा महात्मा २ फेब्रुवारी १९६० साली महासमाधिस्त झाला.

वैदिक गणित म्हणजे वेदांतील सूत्रांचा आधार घेऊन सोडविलेले गणित. या प्रकारच्या गणितात १६ मुख्य सूत्रं व त्यांची १३ उपसूत्रं यांच्या सहाय्याने गणिताच्या कक्षेतील कुठलाही प्रश्न कमीत कमी वेळात व अत्यल्प श्रमात सोडविता येतो. या पद्धतीचे वैशिष्ट्य असे आहे की मानवी मन कसे काम करते याचा पूर्ण विचार यात केला आहे. त्यामुळे या गणिताचा एक प्रमुख फायदा असा की मनावर ताण न पडल्यामुळे ते सतत ताजेतवाने व कार्यक्षम राहते.

उदा : 'निखिलम' पद्धतीत आपण सर्व संख्यांचा संबंध १० किंवा १०चा घातांक असलेल्या संख्यांशी जोडतो. इथे मनाची जी प्रवृत्ती असते नेमके तेच आपण करतो. म्हणूनच मानवी मनाच्या विकसनात वैदिक गणिताचा महत्त्वाचा वाटा आहे.

इथे एक गोष्ट सांगाविशी वाटते की जे गणित पारंपरिक पद्धतीने शिकायला कमीत कमी १० वर्षे लागतात, तेच गणित वैदिक सूत्रांच्या आधारे एखादा ८–१० वर्षीय मुलगा सहज १०–१२ महिन्यात शिकू शकतो. म्हणून या गणिताला स्वामीजींचे 'अश्रूंशिवायचे गणित' हे नाव अगदी सार्थ वाटते. वैदिक गणिताचे आणखी एक वैशिष्ट्य असे की गणितातील सर्व शाखांमध्ये एकच

सूत्रे लागू पडतात. त्यामुळे या ज्ञानभांडारात पूर्ण रीतीने कृत्रिमतेचा अभाव आढळतो.

पण एक मुद्दा आवर्जून उपस्थित करावासा वाटतो की वैदिक पद्धतीतील वेदाची आणि गणकयंत्राच्या वेगाची अजिबात तुलना करता कामा नये. कारण गणकयंत्र हे पूर्णतः यांत्रिक पद्धतीने गणित सोडवीत असते तर वैदिक गणितात मानवी प्रज्ञा अर्थात गणितकर्ता हा या प्रक्रियेचा अविभाज्य भाग असतो. म्हणूनच सर्वांगिण दृष्टीने विचार केल्यास गणनक्षमतेच्या व्यायामाविना मानवी बुद्धी बंद पडली तर होणारे नुकसान हे गणकयंत्रे बंद पडली तर होणाऱ्या नुकसानाच्या कित्येक पट असेल.

आता आपण वैदिक सूत्रांवर आधारीत काही उदाहरणे पाहू या :

१) ३,९८,४९,२७३ ÷ २०,१२,३५३

| | |
|---|---|
| १२३५३ : | ३९८ /४९२७३ |
| २० | ३१९ १७ ३१०१४ |
| | ०१९. ८०२३..... |

२) १/१९ चे नेहमीच्या पद्धतीप्रमाणे २४ पायऱ्या उत्तर येते. तर वैदिक गणिताने

१/१९ = ०५२६३१५७८९४७३६८४२०५२६.

असे एका ओळीत उत्तर मिळते.

लंडनमधील 'सेंट जेम्स इनडिपेंडेंट स्कूल फॉर बॉईज' या शाळेत संस्कृत आणि वैदिक गणित हे विषय गेले दहा वर्षं अनिवार्य आहेत. का? तर त्यामुळे मन ताजेतवानं राहून आत्मिक शांती मिळते.

पाश्चात्यांना अनुकरणीय वाटू लागलेल्या या संस्कृतीच्या, जी एके काळी श्रेष्ठतम स्थानावर होती अशा तिच्या गुणांचे गोडवेच आपण गात बसणार की वैदिक गणितासारख्या गोष्टींद्वारे आजही उपयोग करून घेणार ? ❑

## ते थडगं

दूर ओसाड रानात
एक बाभळ उभी
उन्हातान्हात
तिच्या पायाशी आहे
तिच्याच काट्यांचं अंथरूण
तिच्या पायाजवळच
आहे ते —
हो, अगदी पायाशीच
एक भग्न थडगं
त्याच्या भेगांनी
मोठ्या प्रेमानं लपेटून
घेतलंय त्या गवताला
प्रयत्नात आहे जणू
आपलं दारिद्र्य
झाकण्याच्या
कोणी चार फुलही
नाही वाहत कधी
पण एकच
व्यक्ती आहे
या उभ्या आयुष्यात
फुलं वाहणारी
ती व्यक्ती म्हणजे
ते बाभळीचं झाड
पडतात कधी मधी
त्याची फुलं थडग्यावर
सुखावतं थडगं
आणि हसतं समाधानानं
आयुष्यात काही तरी कमावल्यासारखं
आणि त्याच्या भेगा
अजूनच पसरतात
ते एकुलतं एक सुख ही
गमावू नये म्हणून

**ललितगौरी बुवा**, अकरावी, शास्त्र

# विज्ञान युग की अंधार युग ?

**निवेदिता देशमुख**
प्रथम वर्ष, कला

आज आपण एकविसाव्या शतकाकडे झेप घेण्यास सिध्द झालेलो आहोत. म्हणजेच पूर्णतः विज्ञानयुगात आपण प्रवेश करणार आहोत. पण मंडळी विज्ञान आम्हाला काही नवे नाही. अश्मयुगापासून निरनिराळे शोध विज्ञानात लागूनच तर आपण आज प्रगतीच्या या टप्प्यावर आहोत.

आगीच्या शोधापासून मानव विज्ञानात कार्य करत आला आहे. आणि अथक परीश्रम करुन, निरनिराळी संशोधने करुन आजचे हे विज्ञानयुग अवतरले आहे. विज्ञानामुळे आज आमच्या हाताशी अनेक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. आम्हाला कपड्यांचा षौकच फार (एकनूर आदमी दस नूर कपडा) विज्ञानाने या क्षेत्रातही क्रांती करुन आमच्या सेवेला / आम्हाला खुलवायला आमच्या पुढे कापडातील अनेक प्रकार आणले आहे. निरनिराळ्या प्रकारच्या हिऱ्यात, मौल्यवान खड्यातही आता संशोधन होत आहे. ती शाखा 'जेमॉलॉजी ' या नावाने उदयास येत आहे. निरनिराळया खडयांचे, हिऱ्यांचे निरीक्षण करुन त्यात संशोधन करुन काही नवीन प्रकार आहेत काय ? असल्यास त्यांचे गुणधर्म काय आहेत हे ही तपासले जावे.

दूरदर्शनचा शोध लागल्यामुळे आम्हाला ज्ञानाची नूतन कवाडे उघडी झाली आहेत . दूरदर्शनवर आम्हाला प्रत्येक क्षेत्राची इत्यंभूत माहिती मिळते. राजकारण, पाककला, अर्थकारण, मनोरंजन म्हणजे सर्वच शाखांना सारखाच न्याय दिला जातो. तसेच यु.जी.सी. सारख्या कार्यक्रमांतून रोज आम्हाला अद्ययावत माहिती मिळते.

संगणकामुळे तर आम्ही अक्षरशः ज्ञान नभात भराऱ्या मारत आहोत. आज या संगणकाने सर्व क्षेत्रात प्रवेश मिळवलेला आहे. आज बहुतेक सर्व बँका, कचेऱ्या, महाविद्यालये, बस—रेल्वे स्थानके सर्व ठिकाणी 'संगणक' आढळतो.संगणकामुळे सर्व गोष्टी सुलभ झाल्या आहेत. तसेच त्यामुळे श्रम व वेळेची बचत होते. तसेच सॉफ्टवेअर तयार करुन ते परदेशी पाठवल्याने परदेशी चलनही मिळते.

क्ष किरणाच्या शोधामुळे कृषी क्षेत्रात जणू क्रांतीच झाली आहे. निरनिराळया खतांची निर्मिती झाली आहे. व पिकांच्या प्रमाणातही सुधारणा झाली आहे. तसेच वैद्यकीय क्षेत्रातही याचा वापर होतो. काही असाध्य रोगांवर या पध्दतीचा आधार घेऊनच उपचार केले जातात. व त्याचा फायदाही होतो. निरनिराळ्या वैद्यकीय चाचण्यातही याचा वापर होतो. विशेषतः शरीरांतर्गत चाचण्यात याचा प्रामुख्याने वापर होतो. विज्ञानात नुकताच लागलेला एक आश्चर्यकारक शोध म्हणजे ' व्हर्च्युअलरिॲलिटी' किंवा 'आभासी वास्तव ' म्हणजे काय ? तर आपण स्वप्नात पाहतो ते जागेपणी विरुन जाते. परंतु जागेपणी 'स्वप्न' पाहणे म्हणजे स्वप्नातील कल्पना प्रत्यक्षात पाहणे म्हणजे 'आभासी वास्तव' उदा. तुम्हाला परदेशातील स्थळ बघायचे असेल तर तुम्ही डोक्यावर 'क्रिस्टल आइस' हा उपकरण संच घालून बसल्याजागी ते स्थळ पाहू शकाल. विज्ञानाची ही झेप बुध्दीला चक्रावणारी आहे.

आज विज्ञानाच्या कृपेमुळे सर्व सुखे आमच्यापुढे हात जोडून उभी आहेत. आम्हाला कमीत कमी शारिरीक कष्ट करावे लागण्यासाठी नित्यनवी उपकरणे बाजारात येत आहेत पण आज या विज्ञानयुगात आम्ही खरंच सुखी आहोत का ? दुर्देवाने याचे उत्तर 'नाही' असेच

आहे.

नवीन तंत्रज्ञान उदयास येत आहे पण आम्ही मात्र दिवसेंदिवस दुःखी होत चाललेलो आहोत. एकीकडे भौतिक सुखामध्ये अत्युच्च शिखरावर पण आत्मिक आनंदापासून वंचित राहिलेला मनुष्य असा विरोधाभास आज पाहावयास मिळतो. निरनिराळे शोध लागतात. विज्ञान जास्त प्रगल्भ होत जाते पण त्याच वेळी मानवाचे मन, भावना यांचा विचार मात्र अभावानेच होताना दिसतो.

आमचे ज्ञानकवाड दूरदर्शन (ज्याला आज 'इडियट बॉक्स' म्हटले जाते.) तो हत्ती आम्हाला त्याच्या वाढलेल्या निरनिराळया वाहिन्यांमुळे इतर ज्ञान (?) देतो. निरनिराळ्या वाहिन्यांवर आपल्या संस्कृतीत न बसणाऱ्या मालिका अनेक वर्षे दाखवत असतात आणि आमचे तथाकथित सुजाण प्रेक्षक ते सुखेनैव पहात असतात. ही स्थिती बघितली की साहजिकच यंत्र माणसासाठी की माणूस यंत्रासाठी असा प्रश्न पडतो. पण अनेक व्यक्ती असेच स्वतःला टी.व्हीं. समोर बसण्यात धन्य मानतात. त्यामुळे अवांतरवाचन, फिरणे, बौध्दिक चर्चा (टी.व्ही. वरील कार्यक्रम बघूनही बुध्दी शाबूत राहिलेली असल्यास) या सर्व आघाड्यांवर 'आनंदी आनंदच' आहे.

विज्ञानयुगाची आणखी एक काळी बाजू म्हणजे जीवघेणी स्पर्धा. या विज्ञानयुगात जाहिरातीला आलेले अवास्तव महत्व ( जाहिरात कुठल्याही गोष्टीची असो ) मीच दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ कसा हे पटवून देण्याचा चाललेला आटापिटा. या सर्वांचा येणाऱ्या पिढीवर खोल परिणाम होत असतो. विज्ञानयुगाने आम्हाला काय दिले ? हे पाहण्यापेक्षा आपण काय गमावले हेच आपण हल्ली बघत आहोत.

अणुउर्जा ही विधायक कार्यासाठी न वापरता मानवाने हिरोशिमा, नागासाकीवर त्याचा उपयोग करुन जणू अंधारयुगाला प्रारंभ केला त्यातून झालेला दुष्परीणाम जपान अजूनही भोगत आहे. या युगात मनुष्यही यांत्रिकच झाला आहे का ? त्याच्या संवेदना, भावना लुप्त तर झाल्या नाहीत ? निरनिराळया ठिकाणी विशेषतः प्रसारमाध्यमातून मृत्यू वा तत्सम दृश्ये बघून आम्ही सरावलो आहोत. खरोखर आमचे काळीज म्हणजे 'पत्थर' आहे का ?

आज या विज्ञान युगाचे रूपांतर अंधारयुगात होऊ पहात आहे. याचा धोका प्रख्यात शास्त्रज्ञ जयंत नारळीकरांनी "शतकातील विज्ञानप्रगती विनाशकारी ठरु शकते. यापुढे भीतीच्या छायेतच मानवाला रहावे लागणार आहे. अणुशक्ती अतिरेकी प्रवृत्तीच्या मानवांच्या हातात गेल्यास पृथ्वीचा विनाश काही तासात होईल". अशी भिती व्यक्त केली आहे.

आज आम्ही आमचा आत्मिक आनंद पूर्णपणे हरवला आहे आम्ही भौतिक / लौकिक सुखाच्या मागे लागून मनःशांती पूर्ण गमावली आहे. प्रदूषणामुळे पर्यावरणास धोका निर्माण होऊ पहात आहे. आपण आज खरोखरीच तमोयुगात जाण्याच्या मार्गावर आहोत. आज आम्ही या गतिमान, यंत्रयुगाला इतके बांधून घेतले आहे की आम्ही भावनाहीन / दगडी यंत्रयुगात राहून यांत्रिक मनाचे झालेलो आहोत काय ? असा प्रश्न वेळोवेळी पडतो. आम्ही या सर्व गदारोळात आमची संस्कृतीही विसरत चाललो आहोत. मध्यंतरी उठलेल्या जाहिरातीच्या मोहोळावरुन आज आम्ही संस्कृतीबाह्य गोष्टही किती अलिप्तपणे घेतो ते दिसले. यांत्रिक माणसाची मानसिकताही कळली.

आज अंधार युगाकडे आपण वेगानेजात असताना 'तमसो मा ज्योतिर्गमय' असा संदेश देणाऱ्या आमच्या संस्कृतीकडे लक्ष देउन आचरण करण्याचा प्रयत्न केल्यास या आपल्याला खाईत नेणाऱ्या वेगाला थोडीफार खीळ बसेल . पण आपण याच गतीने पुढे जात राहिलो तर आपण या मोहक भुलाण्याच्या धुंदीत विनाशाच्या खाईत पडू व शुध्दीवर येऊ त्यावेळी सूर्याजीने दोर कापलेले असतील.................... ❑

# विशुद्धी पर्यावरण–आजची गरज.

**शितल कुलकर्णी**
तृतीय वर्ष शाखा

मानवाने आपल्या प्रगतीसाठी अनेक क्षेत्रात प्रगती व विकास केला. त्याने केलेला हा विकास पर्यावरणाला तारक असा आहेच परंतु तसाच तो मारक सुद्धा आहे. मानवाच्या विकासामुळे त्याचा दृष्टीकोन विज्ञानाकडेच वळला. त्याने आपल्या उन्नतिसाठी अनेक शोध लावले.

विकासामुळे मानवाला पर्यावरणाचे महत्त्व समजले आणि त्याने पर्यावरण राखण्यासाठी अनेक उपाय–योजना शोधून काढल्या. विकासामुळे त्याने कृषि क्षेत्रात फारच महत्त्वाची क्रांती घडवून आणली. हा विकास पर्यावरणाला आणि मानवाला लाभदायक ठरला. शेतीच्या अवजारात खूपच बदल झाले. या विकासामुळे शेतीच्या कामामध्ये अनेक सुधारणा झाल्या. आजच्या युगात यंत्रांच्या सहाय्याने शेती केली जाते. या यंत्रांच्या सुधारणेमुळे शेतकऱ्यांचे श्रम कमी झाले आहे.

मानवाने दळणवळणाची फार मोठी वाढ केली. आणि या दळणवळणासाठी त्याने लोहमार्ग, हवाईमार्ग, जलमार्ग या मार्गातून जीवनावश्यक वस्तूंची ने–आण सुरू केली. त्यामुळे अनेक खेडे–गावांचा विकास झाला. आणि अनेक गावे एकत्र येऊन नवीन नवीन शहरे उदयास आली. जळणासाठी लाकडाऐवजी त्याने अनेक उपकरणांची निर्मिती केली. स्टोव्ह, गॅस यासारख्या उपकरणांचा शोध लावला. या उपकरणांच्या विकासामुळे इंधन म्हणून लाकूड वापरल्याने पर्यावरण समतोल राहिले. नदीवर धरणे बांधून त्या पाण्यावर मानवाने वीज निर्मितीचा शोध लावला. त्यामुळे प्रत्येक घरी अंधारात प्रकाशाच्या ज्योती लखलखू लागल्या आणि त्याच पाण्यावर त्याने शेती केली.

परंतु मानवाने प्रत्येक क्षेत्रात आपलाच स्वार्थ साध्य करण्याचा प्रयत्न केला. काही विकासामुळे त्याच्या मनातील स्वार्थ अधिक बळकट बनून तो पर्यावरण विसरून गेला. त्याने पर्यावरणाला दूषित करून टाकले. वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने इमारतींची मागणी फार वाढली आणि त्यामुळे त्याने जंगले नष्ट करून त्या ठिकाणी आकाशाला भिडणाऱ्या इमारती उभारल्या. जंगले तोडल्यामुळे प्राण्यांचा निवारा नष्ट होऊ लागला. आणि ते प्राणी सुद्धा नष्ट होऊ लागले. त्यामुळे निसर्गाचा समतोल ढासळला.

आकाश खरोखरच निळे आहे का ? असे कुणीतरी विचारले. या उपहासात्मक वाटणाऱ्या प्रश्नांतच खरे उत्तर दडलेले आढळले. थोड्या बारकाईने जर आपण आकाशाकडे पाहिले तर आपला नैसर्गिक निळा रंग टाकून आकाश करडा रंग पांघरू लागल्याचे लक्षात येईल. या मानवनिर्मित करड्या रंगाने हळूहळू आपला अंमल आकाशावर सुरू केल्याचे आढळेल. शहराच्या अनेक रस्त्यांवरून होणाऱ्या वाहतुकीमुळे, वाहनांच्या धुरामुळे हवेतील विषारी घटक वाढयला मदत होते. शहरभर फिरणाऱ्या अनेक वाहनांमुळे कार्बन मोनॉक्साईड व इतर विषारी घटक द्रव्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. यांच्यामुळे दररोज अनेक किलोग्रॅम विषारी न जळलेले हैड्रोकार्बन हवेत मिसळले जातात. वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस प्रचंड वाढच होत आहे. विषारी वायूंचेही प्रमाण त्याच प्रमाणात वाढत आहे. सारा विचार केला

असता लोकसंख्येच्या वाढीच्या तिप्पट वेगाने वाहनांची संख्या वाढत आहे.

शहरी आरोग्यावर फार मोठा विपरीत परिणाम यामुळे घडत आहे. दमा, सर्दी, खोकला, ब्रॉकायटीस, डोकेदुखी या आजारांनी बेजार झाले. त्यांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. श्वसनसंस्थेच्या रोगांची निर्मिती ही सल्फर डायऑक्साईड, नैट्रोजन ऑक्साईड व हवेत सोडली जाणारी विषारी घटकद्रव्य यामुळे मोठ्या प्रमाणात होत असते. सतत होणाऱ्या सर्दीला ही विषारी घटकद्रव्ये कारणीभूत ठरतात. श्वासावरोध नैट्रोजन ऑक्साईडमुळे होऊ शकतो. हवेतील कार्बन डायऑक्साईडचे वाढणारे प्रमाणही चिंताजनकच आहे. सूर्यामुळे मिळणारी उर्जा (सौरउर्जा) या वायूमुळे टिकते व पृथ्वीपासून निघणारी उर्जा या वायूमुळे अडून राहते. त्यामुळे पृथ्वीच्या तपमानात वाढ होते. परंतु जसजसे हे प्रमाण वाढेल तसतशी आपली भूमि शुक्रासारखी तप्त व्हायला वेळ लागणार नाही. संशोधकांच्या मते हवेत सध्या असलेले कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण २००० सालानंतर दुपटीने वाढणार आहे. म्हणजे पृथ्वीच्या तपमानात केवढी वाढ होईल पाहा.

महाराष्ट्रात असणाऱ्या एकोणपन्नास धोकादायक रासायनिक अथवा दारूगोळा तयार करणाऱ्या कारखान्यांपैकी पुण्यात तीन कारखाने आहेत. त्यात अत्यंत स्फोटक अशा दारूगोळा कारखान्याच्या आवारात असलेल्या मानवी जीवनास उपायकारक अशा अमोनिया, हैड्रोजन फ्लोराईड, सल्फर डायऑक्साईड, लेड ऑक्साईड, लेड स्टायफनेट, मर्क्युरी फुलमिनेट, एन मिथेल, टेट्रानिट्रालिन, नैट्रोजन ऑक्साईड या वायूंच्या निर्मितीसाठी कारखान्याची कमाल क्षमता उपलब्ध नाही. 'ग्रीन हाऊस इफेक्टस' हे शास्त्रज्ञांच्या मोठ्या काळजीचे कारण झाले आहे. सभोवतालच्या वातावरणात होणारी सरासरी तापमान वाढ काळजी निर्माण करत आहे. प्रत्येक घनमीटर मागे १५ मिलीग्रॅमपेक्षा जास्त प्रमाण झाल्यास धोका संभवतो. सध्या असलेले वाहनांचे प्रमाण हे असेच वाढले तर, २००१ वर्षी सध्याच्या अडीचपट वाहने रस्त्यावर दिसतील. सध्या शहरातील हवेचे पन्नास टक्क्याहून अधिक प्रदूषण या वाहनांमुळे झाले आहे.

वाहनांप्रमाणे इतरही घटक त्यात मुख्यत्वे कचरा, रासायनिक उद्योगधंदे, उर्जाकेंद्र, घरगुती वापरात असणाऱ्या कोळशावर किंवा लाकडावर चालणाऱ्या शेगड्या व शेतीसाठी वापरात असलेली जंतुनाशके हवा प्रदूषित करत असतात. शहरात असणाऱ्या निरनिराळ्या चिमण्यांतून निघणारा धूर आपल्या परीने हवा प्रदूषित करण्यास हातभार लावत असतो. मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात हे प्रमाण प्रचंड आढळते. जास्त वर्दळीच्या वेळी नेहमी वाहतुकीची कोंडी होते. पण इंजिन चालूच ठेवले जाते. अशा वेळी इंजिनातून जास्त धूर बाहेर फेकला जातो. अनेक मार्गावरील खोळंबलेल्या वाहतुकीमुळे व धीम्या गतीने मोठी वाहने जात असल्याने अनावश्यक जळणारे इंधन हवा प्रदूषित करत असते. धूर, धुके व धूळ यांचे मिश्रण (स्मॉग) याची बाधा होऊन डोकेदुखी, चक्कर येणे, मळमळणे व डोळ्यांची आग होणे हे सुरू होते.

वनक्षेत्रात होणारी घट ही चिंतेची बाब झाली आहे. वनक्षेत्र सतत कमी होत असून देशाच्या क्षेत्राच्या १०.८८ टक्के जमीन प्रत्यक्ष जंगलाखाली राहिली आहे. वनीकरणासाठी व जंगलतोड थांबवण्यासाठी आतार्यंत केलेले प्रयत्न फारच अपुरे आहेत. युद्धपातळीवर या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ओझोन वायुचे शत्रु म्हणजे नैट्रोजन व क्लोरीन. कारखान्यांतून हे वायू प्रचंड प्रमाणात हवेत सोडले जात आहेत. विमानाच्या धुरातून बाहेर पडणारा, नैट्रोजनही ओझोन थर विस्कळीत करण्यास हातभार,

लावत आहे. हे असेच चालू राहिले तर, सूर्यापासून निघणाऱ्या अतिनील किरणापासून तुम्हा — आम्हाला त्वचेचा कर्करोग होईल.

शहरातील दूषित हवा ग्रामीण भागात पसरत असून त्याचे दुष्परिणाम झाडे, पिके, जलचर प्राणी यांच्यावर होत आहे. शहरात वाढणारे सिमेंट काँक्रिटचे जंगलही नैसर्गिक शक्तींना पळवून लावत आहे. या सदोष परिस्थितीमुळे निरामय जीवन जगू इच्छिणाऱ्या आपणा सर्वांची स्थिती ओलिसांसारखीं होत चालली आहे. प्रचंड वेगाने वाढणारे हे प्रदूषण आपले पट्टे शहराभोवती घट्ट आवळत चालले आहेत.

जॉन शटलवर्थ या निसर्गप्रेमींचे विचार आठवतात, "आपल्या अविचारी व अविवेकी मनोकामनांच्या पूर्तीसाठी निसर्गाला राबवण्याचे सोडून त्यांच्या अप्रतिम सुंदर रचनेत आपण स्वतः जोपर्यंत जाऊन बसत नाही; तोपर्यंत आपण अभिमानाने छातीवर, मिरविणाऱ्या 'निसर्गवादी', 'पर्यावरणवादी', नवजीवन पद्धतीवादी' वगैरे बिरूदांना काहीच अर्थ नाही.

नदीच्या पाण्यात सांडपाणी मिसळल्याने ते पाणी दूषित होऊन ते मानवाच्या, प्राण्यांच्या आरोग्यास धोकादायक बनले. जंगले तोडल्यामुळे निसर्ग मानवावर रूसला आणि पाऊस वेळेवर पडेनासा झाला. त्यामुळे अतिवृष्टी, अनावृष्टी होऊ लागली. त्यामुळे शेतातील पिके पूर्णपणे वाढू शकत नाहीत. वाहनांमधून निघणारा धूर वातावरण दुषित बनवू लागला आणि या धुरामुळे मानवाला अनेक पिडांनी ग्रासून टाकले. या धुरामुळे वातावरण दूषित बनून मानवाला स्वच्छ व निर्मळ हवा न मिळाल्याने त्याचा श्वास गुदमरून गेला. या विकासामुळे मानव निसर्गापासून फार दूर गेला आणि त्याने जग प्रदूषण बनविले. त्याने स्वतःच्याच हाताने सर्व निसर्गाचे स्वरूपच पालटून टाकले. जागोजागी रोगट वातावरण दिसू लागले. लोकसंख्येच्या वाढीमुळे तो स्वतःच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकला नाही. गाड्यांच्या धूराच्या प्रदूषणाने आणि त्यांच्या कर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषणाने पर्यावरण माखले गेले. परिसरात हवा स्वच्छ न मिळाल्यामुळे मानवाने अनेक रोगांना आमंत्रण दिले. नद्यांत सांडपाणी मिसळल्याने जलचर प्राणी सुद्धा नाहिसे होऊ लागले.

मानवाने स्वसंरक्षणासाठी शस्त्रांचा शोध लावला. आजच्या युगात या शस्त्रांचा फार मोठा विकास झालेला आहे. परंतु हे शस्त्र आज निसर्गाचे रूप बदलून टाकत आहे. वारंवार होणारी प्राण्यांची हत्या त्यामुळे अन्नसाखळी नष्ट होऊन प्राणी माणसांच्या शस्त्रांना बळी पडू लागले आहेत. आणि हीच शस्त्रे आज युद्धात निष्पाप बळी घेतात.

लोकसंख्येच्या वाढीमुळे जागोजागी झोपडपट्ट्या वाढू लागल्या आणि या झोपडपट्ट्यांच्या अनेक गटारांमुळे रोगजंतूंची पैदास होऊन वातावरण रोगट बनले. त्यात गाड्यांचा धूर, गाड्यांचा कर्कश आवाज यामुळे वातावरण दूषित होते. म्हणून आजच्या नवीन बालकास जन्मताना प्रदूषणास तोंड देण्याची कवचकुंडले घातली पाहिजेत.

विकास हा पर्यावरणाला तारक तसा आहेच, परंतु हा विकास आज पर्यावरणाला मारकच बनला आहे. मानव आज निसर्गापासून फार दूर येऊन पोहचला आहे.

पण आज मानवाला या निसर्गाचे महत्त्व पटले आहे. म्हणून त्याने तोडलेली जंगले पुन्हा बसविण्यासाठी वृक्षारोपणाच्या मोहिमा काढल्या आहेत.

मानवाने गाड्यांच्या धूरावर नियंत्रण ठेवले पाहिजे. आणि रस्त्यांच्या कडेने वृक्षारोपण केले पाहिजे. तरच मानवावर रूसलेला निसर्ग खूष होऊन पुन्हा बरसू लागेल आणि मानवाचा विकास सफल होईल.

असाच विकास करा की पर्यावरण राहील स्वच्छ
आणि निसर्ग बनेल सशक्त. ❒

# इंधन बचत समस्या व उपाय

**अजय आडसुळ**
तृतीय वर्ष, कला

आज जग एकविसाव्या शतकाच्या मार्गावर असताना समस्त मानवापुढे तीन अत्यंत गंभीर समस्या उभ्या आहेत. पृथ्वीवर भयानक वेगाने वाढणारी लोकसंख्या, पर्यावरणाचे असंतुलन व वाढते प्रदूषण आणि प्रचंड वेगाने वापरले जात असलेले खनिज तेलाचे साठे. वाढत्या लोकसंख्येबरोबर इंधनाच्या गरजाही वाढत आहेत. पृथ्वीच्या गर्भात असलेले खनिज तेल व वायूंचे साठे मोठ्या प्रमाणात वापरले जात आहेत. आता जर त्यावर कडक निर्बंध घातले नाही तर हे साठे ३०—४० वर्षांहून अधिक काळ टिकणार की नाही याबाबत शंका वाटते.

पृथ्वीच्या पोटातील तेलाचा साठा हा ऊर्जेचा सर्वात मोठा मुख्य स्त्रोत म्हणून जगभर मानला जातो. हे तेल बनवण्यास लाखो वर्षांचा अवधी लागला हे विसरून चालणार नाही. या सर्व समस्या मानवनिर्मित अशा आहेत. खनिज तेलाचे काटकसरीने नियोजन केले नाही, तर उभ्या मानव जातीचे भवितव्य धोक्यात येईल. म्हणून 'इंधन बचत ' केल्या शिवाय मानवाला तरणोपाय नाही. ही बचत करणे काळाची गरज होय. प्रत्येक देशाचे शासन जनतेला कळकळीचे आवाहन सातत्याने करीत असते, पण अजूनही त्याबद्दल समाजामध्ये प्रखर जाणीव निर्माण झालेली नाही.

इंधनाचा सर्वात जास्त वापर हा दळणवळणासाठी होतो. मोटार वाहनांचा कमी वापर केल्याशिवाय गत्यंतरच नाही. आठवड्यातून एक दिवस वाहन बंद ठेवले तरी मोठी बचत होऊ शकते. भाड्याच्या वाहनाने घर ते स्टेशन प्रवास रिक्षाने करणारे अनेक प्रवासी, हे प्रत्येकी वेगळी रिक्षा न करता तिघांनी मिळून एकत्र प्रवास करावा. आपल्या गाडीचे इंजिन नियमितपणे तपासणे, गाडीचा वेग ताशी ४५ ते ५५ किलोमीटर एवढाच ठेवावा, गाडी योग्य गियरमध्ये चालवावी, ब्रेकचा वापर योग्य वेळी करावा. क्लचचा उपयोग फक्त गियर बदलण्यासाठी करावा. गाडीचा वापर करताना एकाच वेळी अनेक कामे करण्याची सवय लावून घ्यावी. टायरमध्ये योग्य प्रमाणात हवा ठेवावी थोडक्यात सांगायचे तर तेलाच्या, पेट्रोलच्या प्रत्येक थेंबाचा पुरेपूर वापर करण्याचा प्रयत्न करायला हवा.

घरामधील गृहिणीही इंधनाची मोठ्या प्रमाणात बचत करू शकतात. स्वयंपाकाची पूर्ण तयारी करून त्यानंतरच गॅस किंवा स्टोव्ह पेटवावा. स्वयंपाक करताना प्रेशर कुकरचा वापर करावा. यामुळे इंधन व वेळ दोन्हीची बचत होते. डाळ, भात व भाजी या तीन गोष्टी एकाच वेळी शिजल्या जाऊ शकतात. पदार्थ एकदा उकळू लागला की शेगडीची आच कमी करावी. पदार्थ शिजवताना भांड्यावर झाकण ठेवावे, तसेच फ्रीजमधील पदार्थ गॅसवर ठेवण्यापूर्वी थोडा वेळ बाहेर काढून ठेवावे. त्याचप्रमाणे कुटुंबाची जेवणाची वेळ शक्यतोवर एक ठेवावी. अशा अनेक लहान—सहान कामातून आपण इंधन वाचवू शकतो.

तेल ही नाशवंत ऊर्जा आहे. ती एक दिवस संपणार आहे. म्हणून मानवाने इतर अन्य मार्गाने इंधन निर्मितीचे स्त्रोत शोधले व शोधत आहे. आता वाऱ्याचा उपयोग वीज निर्मितीसाठी केला जात आहे. विंड फार्म / विंड पार्क म्हणजे ' पवन मळा ' हे तंत्र होय. गुजरातमधील पोरबंदरजवळ लंबा येथे २८ मेगॅवॅटचा पवन ऊर्जा प्रकल्प हा आशियातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. तीस मीटर उंच स्टीलच्या मनोऱ्यावर लावलेले पंखे वाऱ्याने फिरत राहतात. यांचा आवाज येत नाही. धूर निघत नाही, ज्वाला निर्माण होत नाही यामुळे पवन वीज ही स्वच्छ व शुद्ध वातावरण निर्माण करते.

बायोगॅसवर आधारित उसाची चिपाडे यापासून वीज निर्मिती केली जाणे शक्य आहे. याची सूप्त शक्ती ३५०० मेगॅवॅट इतकी असेल. त्याचप्रमाणे आपणास सूर्याकडून दररोज ४००० ट्रिलियन किलोवॅट इतकी ऊर्जा पृथ्वीवर पोहचते. तिचा वापर हा सौर ऊर्जा म्हणून करता येतो. ही प्रदूषण मुक्त असते, हिचा पुरवठा कधीही न संपणारा आहे. सिलिकॉन या अधातू निमवाहक अणूच्या उपयोगाने फोटो व्होल्टॅइक तंत्रज्ञान सूर्यप्रकाशाचे विजेमध्ये रूपांतर करू शकते व नंतर सौर सेलमध्ये ठेवले जातात.

समुद्राच्या लाटांपासून वीजनिर्मिती होऊ शकते. कच्छच्या खाडीतील लाटांवरील ९०० मेगॅवॅट वीजनिर्मितीसाठी एक अर्थशास्त्रीय आणि तांत्रिक रिपोर्ट तयार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे भूगर्भातून उष्ण पाण्याचे प्रवाह आढळतात. अशा ठिकाणी भू—औष्णिक ऊर्जा निर्मिती शक्य आहे. अशा प्रकारे निरनिराळे शोध लावून ऊर्जा निर्मिती करण्याचे प्रयत्न मानव करीत आहे व त्याच्या प्रयत्नांना यश दिसून येत आहे. ❒

## जीवन म्हणजे काय ?

जीवनाचे अर्थ दोन —
'पाणी' व 'आयुष्य'
दोघे एकमेकांना पूरक
सतत वाहत राहणारे,
न थांबणारे.
दोघांच्याही मार्गात
प्रचंड अडचणी
पण न डगमगता
पुढे जाणारे.
अनेक वळणे घेत
चढ — उतार सहन करत
मार्गक्रमण करणारे
हे वीर !
पण अखेर
कुठपर्यंत हे चालणार ?
जिथपर्यंत झगडणे
शक्य आहे तिथपर्यंतच !
आणि त्यानंतर ?
त्यानंतर ........
"दीर्घ विश्रांती"
"चिरकालची झोप"
पाण्याची विश्रांती "धरण !"
तर आयुष्याची विश्रांती " मरण !! "

**ललितागौरी बुवा**, प्रथम वर्ष, शास्त्र

# एड्स : एक जीवघेणा रोग !

**अनिल पवार**
तृतीय वर्ष, शास्त्र

एड्स म्हणजे काय ?

एड्स (AIDS) म्हणजे ॲकवायर्ड इम्युन डिफिशियन्सी सिन्ड्रोम). एच आय व्ही (HIV) (ह्युमन इम्युनो डिफिशियन्सी व्हायरस) नामक विषाणूमुळे होणारा व शरीरातील रोगप्रतिकारशक्ती नष्ट करणारा रोग म्हणजेच एड्स ! एड्स विषाणू (HIV) शरिरात शिरल्यानंतर पांढऱ्या रक्तपेशींवर हल्ला करतात व त्यामुळे आपली रोगप्रतिकारशक्ती कमी होऊ लागते आणि साधे रोगजंतूही शरीरात मोठे रोग करतात. त्यावर नेहमीच्या औषधांचा इलाज चालत नाही व मृत्यूही ओढवतो. जगातील प्रत्येक भागात या रोगाचा प्रसार वाढतो आहे. जगातील दोन ते अडीच कोटी लोकांना या विषाणूंची लागण झालेली असून, अंदाजे २०लाख लोकांत प्रत्येक दिवशी ५००० लोकांना या विषाणूंची लागण होत असावी असा अंदाज आहे.

एड्सची लागण कशी होते ?

एड्सचे विषाणू माणसाच्या शरीरात प्रवेश करतात आणि शरीराचे रोगांपासून संरक्षण करण्यास मदत करणाऱ्या प्रतिकारपेशींना नष्ट करतात. विशिष्ट काळानंतर सरासरी ८ ते १० वर्षात एच.आय.व्ही. चा संसर्ग झालेल्या व्यक्तीची, संसर्गाशी सामना करण्याची क्षमता कमी होते आणि त्या व्यक्तीच्या शरिरात अनेक रोग बळावतात. या टप्प्यावर त्या व्यक्तीला एड्स झाला असे म्हणतात. खालील तीन मार्गांनी एड्स होऊ शकतो : (१) असुरक्षित संभोग : HIV चा संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या संभोग द्रवामध्ये विषाणू असतात. म्हणून HIV ची दुसऱ्या व्यक्तीला लागण HIV चा संसर्ग झालेल्या व्यक्तीबरोबर केलेल्या असुरक्षित संभोग क्रियेद्वारे, म्हणजेच कंडोम न वापरता केलेल्या संभोगाद्वारे होते. (२) HIV चा संसर्ग झालेले रक्त : HIV चा संसर्ग झालेल्या व्यक्तीचे विर्य आणि योनीद्रव याखेरीज त्याच्या रक्तातही विषाणू असतात. या रक्ताद्वारे HIV ची लागण होऊ शकते. HIV रक्ताने दूषित सुया आणि सिरींज यांच्या वापरामुळे HIV ची लागण होऊ शकते. (३) एका HIV संसर्गित मातेकडून गर्भातील आपत्याला, स्त्री HIV ची वाहक असेल तर तिच्याकडून गर्भातील मुलाला एड्स होण्याचा संभव असतो.

एड्सची सुरवातीची लक्षणे : सौम्य स्वरूपात वारंवार ताप येणे, वजन कमी होणे, नियमित जुलाब होणे, अतिशय थकवा येणे, मानेत, काखेत, जांघेत किंवा इतरत्र गाठी येणे, तोंडावर किंवा त्वचेवर पांढरा डाग येणे.

एड्स कोणाला होऊ शकतो ? : एकापेक्षा जास्त व्यक्तीशी शरीर–संबंध ठेवणाऱ्या व्यक्ती, शिरेमधून मादक द्रव घेणाऱ्या व्यक्ती, एड्स चा प्रादुर्भाव झालेल्या मातांची मुले.

HIV यापासून संरक्षण :

(१) सुरक्षित संभोग

संभोग क्रियेत नेहमी कंडोम वापरावे. तुम्ही किंवा तुमचा जोडीदार अशा दोघांनाही संसर्ग नसल्याची पक्की खात्री असेल; आणि परस्परांचे नाते निष्ठेचे असेल तर गोष्ट वेगळी. (२) सुरक्षित रक्त : रक्त स्वीकारण्यापूर्वी त्याची एच.आय.व्हीसाठी तपासणी झाली आहे याची खात्री करून घ्या. सुरक्षित रक्त प्रमाणात असून, त्याच्या लेबलवर पुढील छाप असतात. HIV, HBS Antigen, VDRL negative. यापुढे तुम्ही किंवा तुमच्या परिचयाचे कुणी रक्त किंवा प्लाझ्मासारखी रक्त उत्पादने स्वीकारणार असाल तर लेबल नीट पाहून घ्या. HIV की हेपॅटायसिस बी यासांरख्या संसर्गापासून ते रक्तमुक्त असल्याचे या लेबलवर प्रमाणित केलेले असते.

(६) आपण काय करू शकता ? :

एड्स विषयी परिस्थिती जाणून घ्या व इतरांना त्याची माहिति द्या. प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी जनजागृतीचे काम चालू ठेवा. लोकांचे वाईट आचार, विचार, सवयी बदलण्याचे काम समाज व स्वतः चांगल्या प्रकारे करू शकतो. समाजाच्या सहभागाशिवाय या रोगाच्या प्रसारावर आळा बसणार नाही.

## ऑटोमॅटिक

गिऱ्हाईक : वेटर, एक कप चहा दे.
वेटर : साहेब, हल्ली आम्ही ऑटोमॅटिक चहाचे यंत्र वापरतो. ते हिरवे बटण दाबा.
गिऱ्हाईक : कप–बशी आली ! अरे वा !
वेटर : ते पिवळे बटण दाबा साहेब.
गिऱ्हाईक : अरे वा ! चहा आला !
वेटर : आता ते लाल बटण दाबा.
गिऱ्हाईक : चहा गायब ?
वेटर : चहा गायब नाही झाला साहेब, तो आपोआप तुमच्या पोटात गेला. !

## काटकसर

पती : (आनंदाने) आज मी एक रुपया वाचवला.
पत्नी : फक्त एकच ! तो कसा ?
पती : माझ्या स्टॉपपासून पुढच्या स्टॉपपर्यंत बसच्या मागे धावत येऊन.
पत्नी : तुम्ही इतके बावळट असाल याची मी स्वप्नातदेखील कल्पना केली नव्हती. बस ऐवजी टॅक्सीच्यामागून धावत आला असतात तर पंचवीस रुपये वाचले असते.

**मिनाक्षी माने**, अकरावी, कला



# क्रिकेटमधील नवलाई

**विशाल पाटील**
अकरावी, वाणिज्य

❑ कसोटी सामन्यातील दोन्ही डावात शतकं झळकविण्याचा पराक्रम जास्तीत जास्त वेळा करणारा खेळाडू. सुनिल गावस्कर – असा पराक्रम त्याने तीन वेळा केला.

१९७०–७१ मध्ये त्रिनिदादला वेस्ट इंडीज विरुद्ध (१२४ आणि २२०)
१९७८–७९ मध्ये कराचीला पाकिस्तान विरुद्ध (१११ आणि १३७),
१९७८–७९ मध्ये कलकत्ता इथे वेस्ट इंडीज विरुद्ध (१०७ आणि १८२)

❑ कसोटी क्रिकेटमध्ये एका दिवसात एका सामन्यात वैयक्तिक ३०० धावा काढणारा फलंदाज सर डॉन ब्रॅडमन : ११ जुलै १९३० रोजी ब्रॅडमनने इंग्लंडविरुद्ध एका दिवसात ३०९ धावा केल्या. त्यातील वैशिष्ट्य म्हणजे पहिल्या १०६ धावा १६ चौका मारून जेवणाच्या सुट्टीपूर्वी केल्या. नंतर एकूण २२० धावा चहाच्या सुट्टीपूर्वी केल्या त्यात त्याचे ३१ चौकार होते. व हा खेळ संपला तेव्हा त्याच्या नावावर ३०९ धावा होत्या.

❑ प्रत्येक क्रमांकावर फलंदाजी केलेले कसोटीपटू: इंग्लंडचा विल्फ्रेड र्‍होड्स आणि भारताचा विनू मंकड या दोघांनीही एक ते अकरा या सर्व क्रमांकावर फलंदाजी केली आहे.

❑ कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान अर्धशतक कोणी केले ?
न्यूझीलंडच्या लॉर्न्स केन्स ने ऑस्ट्रेलियाविरुद्ध मेलबोर्न १३ फेब्रु. १९८३ रोजी, २१ बॉलमध्ये केले.

❑ कसोटी पदार्पणात सर्वाधिक धावा करणारा कसोटीपटू : वेस्ट इंडीजचा लॉरेन्स रो याने १९७१–७२ मध्ये जमेकात न्यूझीलंडविरुद्ध एकूण ३१४ धावा केल्या. (२१४ आणि नाबाद १००)

❑ एकदिवशीय सामन्यात एका षटकात सर्वाधिक धावा कोणी केल्या ?
इयान बॉथोमने २६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियात पर्थ येथे. सायमन डेव्हीसच्या गोलंदाजीवर ४,४,२,४,६ आणि ६ अशा धावा काढल्या.

❑ दिवसभराच्या खेळात सर्वाधिक बळी मिळवणारा कसोटीपटू :
इंग्लंडचा जे ब्रिग्स याने १९८८–८९ साली दिवसभरात २८ धावात दक्षिण आफ्रिकेच्या १५ फलंदाजांना बाद केलं. पहिल्या डावात ७ तर दुसऱ्या डावात ८ गडी त्याने बाद केले.

❑

# अगदी जरासंच दुखेल हं ......

प्रा. राजीव कुलकर्णी

## THIS IS GOING TO HURT JUST A LITTLE BIT

- Ogden Nash

One thing I like less than most things is sitting in a dentist's chair with my mouth wide open,

And that I will never have to do it again is a hope that I am against hope hopen.

Because some tortures are physical and some are mental.

But the one that is both is dental.

It is hard to be self-possessed.

With your jaw digging into your chest,

So hard to retain your calm.

When your fingernails are making serious alterations in your life line or love line or some other important line in your palm;

So hard to give your usual effect of cheery benignity.

When you know your position is one of the two or three in life most lacking in dignity.

And your mouth is like a section of road that is being worked on,

And it is all cluttered up with stone and concrete mixers and drills and steam rollers and there isn't a nerve in your head that you aren't being irked on.

Oh, some people are unfortunate enough to be strung up by thumbs,

And others, have things done to their gums,

## अगदी जरासंच दुखेल हं ..................

जगात माझी सर्वात अप्रिय गोष्ट कुठली असेल, तर ती म्हणजे

डेंटिस्टच्या खुर्चीवर तोंड उघडे ठेवून बसणे, कितीही निराश झालो

तरीही आशेने मी ठरवितो

की यापुढे कधीही डेंटिस्टचे तोंडही न बघणे! कारण काही वेदना असतात शारीरिक

अन् काही मानसिक,

पण ज्या दोन्हीही असतात

त्या असतात दांतीक !

आत्मप्रतिष्ठा जपणे अती कठिण असते

जेव्हा तुमचा जबडा रुतत असतो छातीत,

बोटाची नखे करीत असतात बदल

जेव्हा तळहातावरील जीवनरेषा, प्रेमरेषा

किंवा अशाच कुठल्याशा महत्त्वाच्या

रेषेमध्ये. नेहमीचा सुस्वभावी, आनंदी

स्वभाव टिकविणे असते कठिण,

जेव्हा तुमची अवस्था

जगातील अती नगण्य व्यक्तीसारखी असते,

तुमचे दात असतात जणू दुरुस्तीस काढलेला रस्ता,

ज्यावर जमलेली असते गर्दी

स्टोन क्रशर्स, काँक्रीट मिक्सर्स अन रोड रोलर्सची.

तुमच्या मस्तकातील अशी एकही नस नसते

की जिच्यामुळे मस्तकात नाही जात

आग तुमच्या तळपायाची.

काही लोकांना म्हणे अंगठे बांधून देतात फाशी

अन् माझ्यासारखे इतर पडतात हिरड्यांमुळे फशी.

दातांना होतंय पॉलिश अशी तुमची समजूत असते,

पण ते उद्ध्वस्त होतायत अशा शंकेला जागा असते

कळस म्हणजे ही सारी करामत आरशात बघून

केली जाते.

And your teeth are supposed to be being polished.

But you have reason to believe they are being demolished.

And the circumstance that adds most to your terror.

Is that it's all done with a mirror,

Because the dentist may be a bear, or as the Romans used to say, only they were referring to a feminine bear when they said it, an ursa,

But all the same how can you be sure when he takes his crowbar in one hand and mirror in the other he won't get mixed up, the way you do when you try to tie a bow tie with the aid of a mirror, and forget that left is right and vice versa ?

And then at last he says that will be all; but it isn't because he then coats your mouth from cellar to roof.

With something that I suspect is generally used to put a shine on a horse's hoof,

And you totter to your feet and think, Well it's all over now and after all it was only this once,

And he says come back in three monce.

And this, O Fate, is I think the most vicious circle that thou ever sentest,

That Man has to go continually to the dentist to keep his teeth in good condition when the chief reason he wants his teeth in good condition is so that he won't have to go to the dentist.

तुमचा डेंटिस्ट भासतो जणू एक अस्वल
(किंवा रोमन लोक समजतात त्याप्रमाणे–अस्वली!)
जेव्हा तो एका हातात घेतो धारदार, चकचकीत
हत्यार आणि दुसऱ्या हातात आरसा,
तेव्हा मनात पाल चुकचुकते,
की आरशात बघून टाय बांधताना
जसा डाव्या उजव्याचा गोंधळ होतो आपला,
तसाच झाला या डेंटिस्टचा
अन् तो जर बाजू चुकला जरासा ?
नंतर तुमच्या जबड्याला
तळापासून छतापर्यंत एक लेप लावला जातो,
मला तर शंका वाटते
की मोतद्दार घोड्याचे खूर चमकविण्यासाठी
हेच पॉलिश वापरतो.
अखेर धडपडत उठता तुम्ही
त्या काटेरी सिंहासनावरून,
अन् निःश्वास सोडता सुटकेचा,
तेव्हा डेंटिस्ट वादा करवून घेतो
तीन महिन्यांनी परत दात दाखवायला यायचा.
हाय दैवा ! हे कसले दुष्टचक्र
आमच्या नशिबी लिहिलेस ?
की डेंटिस्टकडे जाणे टळावे
म्हणून आम्ही दात चांगले ठेवू इच्छितो
अन् दात चांगले ठेवण्यासाठी
नाईलाजाने डेंटिस्टचेच तोंड पहातो ! ❐

# पालवी

**तुषार करमाळकर**
द्वितीय वर्ष, शास्त्र

आमराईतला तरुण आंबा, मूकपणे रडत होता.
शेजारच्या म्हाताऱ्यानं विचारलं त्याला,
"का रे बाळा, काय झालं ?"
"माझं एक पान गळालं," मुसमुसत तरुण म्हणाला.
"हत् वेड्या, त्यासाठी रडतोस ?"
अनुभवी म्हातारा हसत उद्‌गारला,
"अरे, पानगळती तर आपल्या नशिबी कायमचीच आहे,
पोरा, त्यात वाईट काय वाटायचं ?
आज एक पान गळलं, उद्या दुसरं तर परवा तिसरं
सारीच पानं एक दिवस गळतील.
पण मित्रा, रडू नकोस.
कारण तू पुन्हा बहरणार आहेस.
येणारा वसंत तुझ्यासाठी नवी पालवी आणेल."
"कधी येणार हा वसंत बाबा ?" तरुण अजूनही रडत होता.
"येईल पोरा येईल, थोडा धीर धर.
'सब्र का फल मिठा होता है।' हे कधीही विसरू नकोस."
तरुणाचं समाधान झालंच नव्हतं.
दिवसामागून दिवस जातच होते.
वसंत काही येत नव्हता.
दररोज तरूण विचारायचा, "आणखी किती दिवस ?"
म्हाताऱ्याचं उत्तर एकच—
"पोरा, थोडा धीर धर,
तू पुन्हा बहरशील, तारुण्याने रसरसशील.
पोरा, थोडा धीर धर."
तरुण मात्र गळणाऱ्या पानांकडे
हताशपणे पहात दिवस कंठीत होता
म्हातारा त्याला सांगतच रहायचा,
"आपलं जीवनच असं असतं
त्यात आपल्यासाठी काहीच नसतं
सगळं काही दुसऱ्याचं, आपली पानं, फुलं, फळं
सगळं काधी ना कधी द्यायचं
त्यांचा मोह न धरता!
अन् एक दिवस आपली तनुची कुडीही
मानवाच्या स्वाधीन करायची.
कुणाच्या भाळी मानवाघरची शोभा बनण्याचं येतं.
तर कुणी स्वतः जळून, मानवाला अन्न देतं !"
तरुण नुसतंच ऐकायचा. दीर्घ उसासे टाकायचा.
निराशेने भरलेल्या आपल्याच मनाशी म्हणायचा,
"म्हातारचळ लागलाय झालं !
काहीही बरळत असतो.
तडकलेली काच कधी सांधली जाईल?
जराजर्जराला कधी तारुण्याची चव चाखायला मिळेल ?
माझ्या ओक्या—बोक्या फांद्यांना नवी पालवी फुटेल !"
दिवसामागून दिवस गेले.
गेल्या रात्रीमागून रात्री.
एक दिवस तरुण आनंदाने ओरडला,
"माझ्या एका फांदीवर नवी पालवी फुटली.
अहाहा! मला नवी पालवी फुटली!
बाबा, मी आता पुन्हा बहरणार!"
पण म्हातारा ऐकण्याच्या स्थितीत होताच कुठे ?
अंगावर पडणारे कुऱ्हाडीचे घाव सोसत,
मोठ्या कौतुकाने तरुणाचा उत्साह न्याहाळत,
अश्रू आडून मूकपणे हसत होता. ❐

# नाट्य प्रशिक्षण शिबीर

पुणे विद्यापीठ कल्याण मंडळ आयोजित १९९५ — ९६

**महेश शिंदीकर**

नोव्हेंबर—डिसेंबरची थंडी आपला प्रभाव दाखवण्याची एकीकडे सुरुवात करते न् करते तोच वेध लागतात 'पुणे विद्यापीठाच्या' विदयार्थी कल्याण मंडळाच्या 'नाट्य प्रशिक्षण शिबीराच'. दरवर्षी सुमारे याच कालावधीत आयोजित होणाऱ्या या शिबीराच्या या वर्षीच्या कार्यक्रमाचा थोडाफार तपशील मी येथे देतो आहे.

यावर्षी या शिबीरासंबंधी माहिती कळताच प्रा. व्हनकळस सरांच्या सहकार्याने आपल्या महाविद्यालयाच्या एकूण ११ विदयार्थ्यांनी पात्रतेसाठी अर्ज केले पैकी ४ अर्जांचा विचार शिबीरासाठी केला गेला. त्यात सोनिया राव, मी, शिरीष कुलकर्णी व विश्वेश पेटकर यांचा समावेश होता. नाताळाच्या सणाला म्हणजे २५ डिसेंबर रोजी सुरुवात होणाऱ्या या शिबीरासाठी 'लासलगांव कला शास्त्र वाणिज्य महाविद्यालय, लासलगाव' (जि. नाशिव) या ठिकाणची निवड झाली होती. पुणे विद्यापीठातर्फे या शिबीराचे संयोजन दरवर्षीप्रमाणेच प्रा. श्रीधर राजगुरु या सदाबहार व्यक्तिकडेच होते. त्यामुळे शिबीराच्या यशस्वीतेबद्‌ल शंका उपस्थित होण्याचे कारणच नव्हते. महाविद्यालयाचे कलामंडळ प्रमुख — प्रा. जपे यांनी संपूर्ण शिबीराचे सुत्रसंचालन केले. स्थानीक कार्यकर्ते, प्राचार्य श्री. बिदारकर व अन्य सहकारी मार्गदर्शकांच्या अचूक मार्गदर्शनामुळे हे शिबीर अगदी यथायोग्य व उद्देशपूर्ती करणारे ठरले.

शिबीराच्या आदल्या दिवशी पुणे—माहेरघर सोडून आम्ही सकाळी ११ वा. उपरोक्त स्थळी पोहोचलो. सर्व कार्यकर्ते व सहभागी होणारे अन्य शिबिरार्थी यांची ओळख करून देण्याचा कार्यक्रम जेवणाच्या माध्यमातून साकार केला होता. नंतर सर्व कार्यक्रमाची माहिती, नियम महाविदयालयाच्या' जैन विद्यार्थी वसतीगृहात' देण्यात आली. निवासाची सोय तेथेच केली होती. थोड्याशा शारीरिक कसरती घेतल्यानंतर खऱ्या अर्थी शिबिरीस सुरवात झाली. मोकळ्या जागेमुळे थोडासा त्रास देणारी थंडी, पुण्यापेक्षा वेगळे भोवतालचे जग, घरापासून दूर परंतु काळजी घेणाऱ्या व आमच्या आवडत्या रंगभूमीबद्दल आम्हाला माहिती देणाऱ्या कुशल मार्गदर्शकांच्या सहवासात आता शिक्षण घेण्यास आम्हीही सज्ज झालो होतो.

पहिल्या दिवशी दुपारी शारिरीक हालचाली व सुविध, एकाग्रता व सुलभता या सर्व आवश्यक घटकांसाठी वैविध्यपूर्ण खेळ घेण्यात आले, नाटकाविषयीचे प्रत्येकाचे 'अंग' जाणण्यासाठी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही केले गेले. दुसऱ्या दिवशी व्यायामानं आमच्या शिबीर दिनाला सुरुवात झाली. शरीर तणावमुक्त होण्यासाठी गरजेच्या सर्व आंगिक हालचाली व त्यांचे महत्व पुण्याचे देवदत्तजी पाठक यांनी सोदाहरण पटवून दिले सत्तांतर नाटक या संकल्पनेची माहिती देण्याच्या माध्यमातून त्यांनी सुरु केलेल्या चर्चेमुळे आगळेच रंग एकत्र येऊन छानसा गट तयार झाला. याच गटाचे २ भाग करुन मुक्त विषयावर एक सादरीकरण असा रंगतदार कार्यक्रम झाला . सायंकाळी पुन्हा विविध सांस्कृतिक कार्यक्रम होऊन प्रार्थनेने दिवस संपला.

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी स्वतःचे 'स्व' पण बाजूला टाकून सर्वजण खऱ्या अर्थी शिबिराशी एकरुप झाले. याचे सर्व श्रेय प्रा. राजगुरु व पाठक यांच्याकडेच जाते. या दिवशी श्री. पाठक यांनी आवाज, स्वर, अक्षर यांची निर्मिती व मुलभूतता येथून सुरूवात करुन उच्चार,

आचार, संचार इथपर्यंत मजल मारली. याच दिवशी काल्पनीक व्यक्ति, त्यांचं व्यक्तिचित्रण, रेखाटन, माहिती त्याचे वर्गीकरण इ. गोष्टींवर आधारीत एक खेळ घेण्यात आला. त्या व्यक्तींच चिंतन त्याचे काल्पनिक रेखाटन व त्यासंबंधीचा एक प्रसंग यावर एक अभ्यासपूर्ण लेख आम्ही तयार केला. अशा सर्व लेखांचं एकत्रित काल्पनिक प्रदर्शन त्यावर विचार व त्या व्यक्तिचं आम्ही केलेलं सादरीकरण असा हा किचकट पण बहूस्पर्शी खेळ आम्ही ५–६ तास अभ्यासात होतो. विविध लोकांनी विविध व्यक्तिचित्रे जिवंतपणे रंगवली. फारसा उपदेश न करता हा खेळ बरंच काही शिकवून गेला, त्याच दिवशी नंतर 'नातीगोती' हा नाविन्यपूर्ण व परस्परसंबंध दृढ करणारा व विचारांना चालना दोणरा अभिनयसंपन्न खेळ निखळ आनंद देणारा ठरला, त्यानंतर रात्री अरूण गद्रे या नामवंत डॉक्टर व लेखक यांचे एक नवीन नाटक व नाटयवाचन असा एक नवीन अनुभव देणारा घटक झाला.

संयोजक व प्रशिक्षक यांनी अतिशय उत्तम प्रकारे शिकवलेल्या ज्ञानाचा भक्कम आधार घेवून आम्ही आता पाहुण्या मार्गदर्शकांच्या म्हणजेच प्रा. पोखरापूरकर या दूरचित्रवाणी, आकाशवाणी, चित्रपट व रंगभूमी अशा सर्व माध्यमांचा अनुभव असणाऱ्या व्यक्तिपुढे ज्ञानग्रहणास सिध्द् झालो. 'प्रसारमाध्यमांचा परस्परांशी संबंध' असा तुलनात्मक विषय अतिशय मार्मिक व गणिती पद्धतीने सोडवत त्यांनी विविध तांत्रिक माध्यमे त्यांचे उपयोग व आवश्यकता याचबरोबर त्याची टीकाही केली. याच मालिकेत पुढे त्यांनी प्रकाशयोजनाकार, ध्वनीसंयोजक, दिग्दर्शक, नेपथ्यकार या सर्वांची तांत्रिकता त्याची पद्धती याची सारासार कल्पना दिली. दुपारी प्रा. राजगुरु यांनी व्यवस्थापन या नाटकातील प्रमुख घटक व त्याची कार्ये व व्यवस्थापन याची सोदाहरण कल्पना दिली. सायंकाळी आमची गटवार विभागणी करुन रंगभूषा, वर्तमानपत्र, वेशभूषा व सांस्कृतिक खेळ अशी विविध गटात स्पर्धा घेतली.

शिबिराच्या शेवटच्या दिवशी प्रा. जपे यांनी उरलेल्या सर्व घटकांचा अभ्यासपूर्ण आढावा, दिग्दर्शन तंत्र व तांत्रिक आदि माहिती दिली आणि शेवटी समीक्षण क्षेत्रातील ज्ञानमहर्षी वि. भा. देशपांडे यांचे 'मराठी नाटयसृष्टीचा प्रवास' व 'भारतातील लोकरंगभूमी' या २ भिन्न विषयांचे महत्व समान अधिपत्याने शिकविले . नाटयप्रवासात १८४३ च्या विष्णूदास भावे यांच्या 'सीता स्वयंवर' या नाटकापासून अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद देवल, कृष्णाजी खाडीलकर, राम गणेश गडकरी ते पु. ल., अत्रे, तेंडूलकर पासून देवेंद्र पेम, चंद्रकांत कुलकर्णी, अभिराम भडकमकर आदिंपर्यंतचा १०० वर्षांचा प्रवास अगदी हसतहसत संपवला. याच संदर्भात संगीत नाटके, संगीतप्रधान नाटके, अभिनयप्रधान नाटके, शोकात्मिका, शोकात्मिका विनोदी, ऐतिहासिक इ. पासून प्रायोगिक, सत्यार्थदर्शक आताची नाटके यांचा विचार केला. तसेच विविध भारतीय प्रदेशातील लोककला त्यांचा विकास याचीही माहिती दिली.

